REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला रविवार ता० ४ माहे फेब्रुवारी सन १८७७ इ० अंक ५

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

देऊळगाव राजा—२१।१।७७इ०
रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि० वि० डेपुटी एजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. वामन गणेश परांजपे यांची स्वारी एथें तारीख १४ रोजीं आली. तीन मुक्काम करून तारीख १६ रोजीं सायंकाळीं मेहुण्यावरून चिखलीकडे गेली तारीख १९ पासून चार दिवस गारठा अतिशय पडला होता. एक दोन दिवस पाऊसही पडला. विजा चमकल्या. असा गारवा पर्जन्यकाळांतही कधीं पडला नव्हता. कालपासून हवा चांगली झाली आहे. आतां ऊन पडतें व रात्रीं चांदणेंही चांगलें पडतें. काल रोजीं रा. रा. बलदेवसिंव्ह पोलिस इन्स्पेक्टर यांची स्वारी आली होती. आज सकाळीं स्टेशन तपासून निघून गेली. तीन दिवसापासून होल्यांची गर्दी झाली. रात्रंदिवस ढमढम चाललें आहे. कसबी लोकांच्या पुतळ्यांचे थवे फकीरी मागण्याकरितां रस्तो रस्तीं फिरत असतात.

राजे मानसिंग यांची स्वारी निजाम सरकारास भेटून नांदगावाहून दोन चार दिवस झाले एथें आली. यांची अबदागीर व मोरचले वगैरे कांहीं सामान पहारेकऱ्यां जवळून चोरीस गेलें असें ह्मणतात. शाबास! वाहवारे पहारेकरी!! याचें पाहारा!!

गावांत देवीची साथ आली आहे देवीचे आजारानें पांच पंचवीसमुलें गावांत मेलीं असावीं. देवी खपल्या पडावयाचे बेतांत आल्या ह्मणजे मुलें मरतात. अजून देवी काढण्याविषयीं लोकांचे मनांत ईश्वर प्रेरणा करित नाहीं. बिचारे डाक्टर हशमत अली गल्लो गल्लीं फिरतात पण त्यांची देखील लोकांस करुणा येत नाहीं. मडक्याचें तारायंत्र एथें गल्लो गल्लीं झालें आहे. अडाणी लोक शिमग्याकरितां तमाशे तयार करण्यांत गुंतले आहेत. ताबुताचे संबंधानें दंगा फिसाद कांहीं झाला नाहीं. चीफ साहेबांनीं बंदोबस्त चांगला ठेविला होता कळावें.

एक क्ष

### हर! हर! शेवटीं उमरावती हायस्कूल बुडणार काय?

"जाळें तोडुनियां बळें हरिण तों
टाळोनि दावाग्निला ॥
व्याधाचे चुकवून बाणहि महा
वेगें पुढें चालिला ॥
तों घाईंत उडी फसोनि पडला
अडामधें जापडा ॥
होती सर्वही यत्न निष्फळ जरी
होई विधी वांकडा" ॥ १ ॥ अन्योक्ति क.

कैलासवासी डा. सिंक्लेर साहेब वऱ्हाडांतील विद्या खात्यामध्यें आपल्या विद्येच्या, शहाणपणाच्या व दयालुत्वाच्या योगानें अमर कीर्ति संपादून गेले यांत संशय नाहीं. दूरदर्शी विद्वानांचीं करणीं नामाहून त्यांचे शहाणपणाचे हेतु वारंवार मनामध्यें येऊन जितकीं आश्चर्योत्पादक वाटतात तितकीं साधारण लोकांस त्या त्यावेळीं तीं तशीं वाटत नाहींत; त्यांत आणखीं ती पुनः विपरीत केलीं जाण्याचा संभव असल्यास घर्षणेंकरून चंदनाचा सुवास ज्याप्रमाणें वृद्धिंगत होतो त्याप्रमाणें त्यांतील शहाणपण अधिकाधिक दिसूं लागतें. डाक्टर सिंक्लेर साहेबांनीं कित्येक गोष्टी वऱ्हाडांत अवेळीं केल्या असें कोणी ह्मणतात परंतु विचारी व दूर दर्शी लोकांचा हा उद्गार नाहीं. तथापि लोकांच्या ह्मणण्याप्रमाणें अवेळीं केलेल्या गोष्टींपैकीं २ हायकुलांची स्थापना ही एक होय. वस्तु पाहिल्या वांचून ती हवी अशी वाटत नाहीं. यदाशदाचित् ऐकून वाटली तरी तितपतच हिंदुस्थानांत अद्यापि आल्या नाहींत अशा ज्या कितीएक कला, विद्या, किंवा सुधारणा इंग्लंडांत असतील त्या आपणास हव्याशा वाटताहेत काय? वऱ्हाडांत हायस्कुलें असण्याची वेळ आतां कांहीं बहुत आली आहे असा ज्यांचा अभिप्राय आहे त्यांचें असें ह्मणणें काय कीं, आज तागाईत वऱ्हाडांत हायस्कुलें नसतीं तरीही आज त्यांची जितकी जरूरी वाटत आहे तितकी वाटली असती? किंवा लोकांनां शिकण्याची आपोआप अभिरुचि लागली असती? मी अगदीं खातरीनें सांगतों कीं असलेल्या शाळां पैकीं निमे किंवा पाऊण शाळा जर आज बंद केल्या तर लोक कांहीं त्या सरकारापाशीं मागत नाहींत. तिकडच्या लोकांनीं मात्र त्यांच्याकरितां खटपट करूं नये. इतकेंहीं असून कांहीं ठिकाणांहून अर्ज झालेच तर ते डा. सिंक्लेर साहेबांच्या श्रमाचें फळ. अज्ञान लोक एरवी कांहीं मागत नाहींत; त्यांना दाखवा ह्मणजे सर्व मागतात. दुसरें वऱ्हाड हा शेतकीचा मुलूख आहे; एथील लोकांस श्रेष्ठ प्रतीच्या शिक्षणाची जरूर नाहीं असें एक मत आहे. परंतु इकडच्या शेतकरी लोकांनां लिहिण्या वाचण्या पेक्षां अधिक शहाणपण असल्यास तें त्यांस कसें बाधक होईल समजत नाहीं. देश फार सुपीक असल्यामुळें अल्प श्रमानें शेतकऱ्यांस पुष्कळ फायदा होतो; यामुळें पुष्कळ लोक बरेच निरुद्योगी असतात ते कदाचित् कालांतरानें विद्येचा फैलाव अधिकाधिक होईल तस तसे श्रेष्ट प्रकारच्या विद्या संपादनाचा विचार करतील. विद्या वृद्धि वांचून बल व देश प्रीति उत्पन्न होणें कठीण व या वांचून देशोद्दार होणें कठीण. कनिष्ट प्रतीचें शिक्षण मोठमोठ्या उदार हेतूंच्या संपादनास निरर्थक होय. वऱ्हाडांत श्रेष्ट शिक्षण दिलें असतां ते शेतकीचा धंदा सोडून देतील व देशाचा तोटा होईल अशी भीति धरायास नको. कारण नौकरीचा दरवाजा बंद झाला आहे. हीं दोन्ही मतें थोडींशीं कोतीं आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तो विद्वान् ह्मातारा वेडा नव्हता. अस्तु. शाळाखात्याकडील खर्च कमी करण्याच्या संबंधानें साधारण व देशाभिमानी लोकांचें ह्मणणें असेंही आहे कीं, जो कांहीं सरकारचा खर्च ज्यास्ती होत आहे तो विद्याखात्यांतच काय? कातर लावण्यास विद्याखात्यावांचून कोठेंच जागा नाहीं काय? अरे! विलायतेतून साहेब लोक येऊन हजारों, शेकडों रुपये घेऊन चालले आहेत, व एथें चैन करतात ती आणखी शिवाय. आणि इकडच्या लोकांच्या लहान लहान पगारावर गदा! आतां शिक्षण मिळवून उद्या देशस्वातंत्र्य मिळवायाचें आहे असें नाहीं. दहा पांच वर्षें अधिक लागलीं तर लागलीं. ज्या मुंबई इलाख्याचे कित्त्यावर सर्व चाललें आहे त्याची आरंभीची स्थिति कोणास आठवते आहे काय? अस्तु.

शिरोलेखाच्या संदर्भास सोडून मी बराच दूर गेलों होतों परंतु आतां उद्दिष्ट विषयाकडे वळतों. वऱ्हाडांतील वर्तमान पत्रांच्या लिहिण्यावरून असें समजतें कीं, मे० रेसिडेंट साहेब बहादूर एथें आले त्या वेळीं ते, मे० रेविन्यू कमिशनर व मे० डायरेक्टर साहेब यांच्या विचारें उमरावती हायस्कूल बंद करावें असें ठरलें. आतां ही गोष्ट घडून आली असतां अतिशय दुःखास्पद होय. व ईश्वर करो आणि हा विचार निष्फळ ठरो. हर! हर! एका युरोपियनामुळें हें हाय स्कूल बुडत आहे ना? यावर नेटिव हेडमास्तर असून त्याची अशी अव्यवस्था असती तर त्या हेडमास्तराचा परिणाम काय झाला असता हें सांगायास नको. हायस्कूल बुडविण्यापर्यंत मजल आली नसती यांत संशय नाहीं. मे. रेसिडेंट साहेबांनीं अखेरचा निकाल सांगण्या पूर्वी मेहेरबानी करून आणखी एक वेळ कमेटी तर्फे या गोष्टीचा विचार करवावा. वाईट हेड मास्तरामुळें स्कुलाची स्तिथि बिघडली असें ठरल्यास त्यास काढून टाकून चांगल्याची योजना करावी, आणि मग हा. स्कू. सुधारतें किंवा नाहीं तें पहावें. मुंबई इलाख्यांत इतकीं हायस्कुलें आहेत तीं सर्व काय दिवे लावताहेत हें गेल्या चार पांच वर्षांची तारतम्य स्तिथि पाहिली असतां लक्षांत येईल. तिकडचीं तसेंच इकडचीं हायस्कुलें ज्यानें बारकाईनें पाहिलीं असतील तो इकडच्या हा. स्कू. चे कामाविषयीं सहज सांगू शकेल कीं इकडे शिक्षण फारच उत्तम प्रकारें मिळत आहे. तिकडचीं कांहीं हाय स्कुलें सोडून बाकीच्यांत आमच्या अकोला हा. स्कुलच्या बरोबरीची अशीं थोडींच सांपडतील. उमरावती हा. स्कुलची व्यवस्था चांगली ठेवली असतां तें अकोल्या प्रमाणें कां होणार नाहीं? सिंक्लेर साहेबांनीं मिळविलेली ही रकम आमचे धोरणी डायरेक्टरांनीं व निदान पूर्व वऱ्हाडच्या लोकांनीं सरकारच्या घशांत परत जाऊं देऊं नये. मास्तरांचे काय होईल हा सध्या विचार आपण सोडून देऊ या, परंतु प्रांताला मिळालेली एक गोष्ट मागें जात आहे. पुढें गरज लागल्यास हा. स्कू. पुनः मिळणें कठीण पडेल. मी सर्व वऱ्हाडच्या लोकांस अशी विनंती करितों कीं त्यांणीं, एक अर्ज तयार करून योग्य मार्गानें तो मे. रेसिडेंट साहेब यांजकडे पाठवावा व त्यांत हा. स्कू. बुडण्याच्या प्रसंगास येण्याचीं कारणें दाखवून सुव्यवस्था ठेवली असतां तें अकोला हा. स्कु. प्रमाणें चालेल अशी विनंती करावी. विद्याखात्याकडे दुर्लक्ष्य करून या कामाची हेळसांड न करितां अर्ज एकदम रवाना करून द्यावा. तिकडे पक्का विचार झाला नाहीं तोंपर्यंत घाई केली तर फायदा नाहीं तर व्यर्थ, वरील अर्जाच्या पुष्टीकरणार्थ सर्व वऱ्हाडांतील पत्रकर्त्यांनीं योग्य विचाराचे आपापले अभिप्राय द्यावे. सर्व औषधि उपचारांचा यत्न करूनही कार्यसिद्धि न होईल तर प्रारब्ध त्या बिचाऱ्या हायस्कुलाचें. त्याच्यावर मागें एक संकट आलें असतां श्रीरामाच्या कृपेकरून तें पार पडलें. परंतु आतांच्या संकटांतून त्यास जर नारायण न वांचवितां बुडवील तर त्याचें दैवच प्रतिकूळ यांत संशय नाहीं. विधी वांकडा अतएव तो बिचारा हरिण अखेरीस आडांत जाऊन पडला.

एक
देशहितेच्छु.

मंगरूळपीर ता. ३१।१।७७ इ०
रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० खालीं लिहिलेल्या चार ओ

क्षीस येथा अंकीं जागा द्याल अशी आशा धरून आपणाकडे पाठविल्या आहेत.

लिहिण्यास आनंद वाटतो कीं आमचे तालुका आफिसर मि. अबदुलहक्क साहेब एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर जिल्हा वाशीम हे तारीख २४ माहे जानेवारी रोजीं सकाळीं एथें आले. यांचे पेशवायीस गावांतील कांहीं सभ्य गृहस्थ व सरकारी हुद्याचे लोक बरेच गेले होते. गावांत येतांच प्रथम एथील प्रख्यात पीर हयात कलंदर अथवा बदरुद्दीन साहेब यांचे दर्शनास गेले. व तेथून थेट आपले तंबूवर गेले. पुढें ता. २५।२६ रोजीं सोलापुराकडील कांहीं दुष्काळ पीडित लोकांस पैसे व कपडे वाटले तसेंच एथें एक फकीर आहे त्यास मोहरमाचे दिवशीं ह्मणजे तारीख २६ रोजीं बक्षीस देऊन दरमहा पांच रुपये एथील प्रसिद्ध सावकार रा. देवीसिंग बाळाराम जमादार यांचे दुकानावरून देवविण्याचें कबूल केलें. ते आल्या कारणानें व तहशिलदार यांच्या हुशारीच्या योगानें एथें दरवर्षीस मोहरमास तंटा होत असे तो झाला नाहीं कारण सर्व ताबूद एके ठिकाणीं जमल्यावर उभयता अधिकारी घोड्यावर बसून आले होते व सर्व पोलिसचे शिपायास हुकुमानिशी येण्याचा हुकूम देऊन तंटा वगैरे हाऊं देऊं नये ह्मणून सांगितलें होतें व सदहू काम निर्विघ्नपणें शेवटास जाई पर्यंत हे बरोबर होते. या वेळेस सुमारे दीड हजारांवर मनुष्यें होतीं असा अजमास आहे.

पुढें तारीख २९ माहे मजकूर रोजीं एथील मराठी शाळेची आणि हिंदुस्थानी शाळेची परीक्षा घेऊन दोन्ही स्कुलांस मिळून सुमारें पांच रुपयांचीं पुस्तकें मंगरूळ एथील डेपोंतून घेऊन बक्षीस दिलीं. यावरून यांचे बरेंच विद्यावृद्धीकडे लक्ष दिसतें. हक्क साहेबाच्या प्रकृती विषयीं एथील सर्व लोकांस भीति होती परंतु कोणाचेंच मन खटू न करतां अगर नुकसान न होतां सर्व प्रकारें साहेब मजकूर आल्यानें आनंद झाला.

मागील आठवड्यांत सुमारें तीन चार दिवस पर्यंत आकाश अभ्रानें व्याप्त होतें व गारांचा पाऊस पडून बरीच रब्बीच्या पिकाची नासाडी झाली. सोलापुरा सारख्या दुष्काळ पीडित मुलखांत जर गारांचा पाऊस पडला असता तर तिकडे त्यापासून पाण्याचा तरी पुष्कळ फायदा झाला असता पण ईश्वरेच्छे पुढें उपाय नाहीं.

एक ग्रामस्थ
"क्ष"

## वऱ्हाडसमाचार

मिति माघ वद्य ७ शके १७९८

## आनंदाची गोष्ट.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं राव बहादूर गोपाळराव हरी देशमुख अमदाबादचे स्मालकाज कोर्टाचे जज्ज यांस सेशन जज्जाची जागा देण्याचा विचार झाला आहे व त्याप्रमाणें लवकरच नेमणूक होईल जानेवारीचे पहिले तारखेस सरकार कित्येक नेटिव गृहस्थांस जडजाच्या व कलेक्टरच्या जागा देणार ह्मणून वर्तमान होतें त्याच गोष्टीची हल्ली ही अमलबारी घडत आहे व याप्रमाणें कित्येक ठिकाणीं नेटिवांस अशा महत्वाच्या जागा खचीत मिळणार असें आधारयुक्त समजलें आहे. दिल्लीचे दरबारचे प्रसंगी लार्ड लिटन साहेब या संबधानें एक शद्बही बोलले नाहींत ह्मणून लोकांस फार वाईट वाटलें व कित्येकांनीं टीकाही केल्या पण सर्व खेदास्पद ढग वितळून जाऊन आनंद सूर्याचा प्रकाश दैदीप्यमान होऊं लागला आहे हें फार चांगलें आहे.

## काळें पाणी.

महाराणी साहेब जानेवारीचे पहिले तारखेस चक्रवर्तिनी झाल्या तेव्हां त्यांनीं सुमार १६००० कैद्यांचे बंद खुले केले हें आमचे वाचकांस समजलेंच आहे. यांतकाळे पाण्याचे शिक्षेचेही शेकडो कैदी सांडले त्यांत वऱ्हाडांतील वाशिमाजवळ टोहो ह्मणून गाव आहे तेथील तामाजी वल्लद मानाजी नावाचा एक कुणबी खुनाचे क्याज्यांवरून १६ वर्षां पूर्वीं काळेपाण्यावर गेला होता तो सुटून आला. त्याचे तोंडून जी तिकडील माहिती समजली ती आह्मी आपले वाचकां साठीं येथें घेतों.

हिंदुस्थानांतील कैदी दर सहा महिन्यानें शंभर दोनशे असे जमतील तितके जहाजांतून अंदामन बेटास नेतात व पोर्ट ब्लेर येथें त्यांस उतरतात. उतरल्या बरोबर त्यांच्या बेड्या काढून टाकतात. व त्या टोळीवर अधिकारी नेमून देऊन त्यांस कामास लावितात. सडकांचें, काम होतीचें काम, घराचें काम, अशा प्रकारचीं कामें त्यापासून घेतात. तेथें त्यांस तुरुंग नाहीं, त्यांनीं आप आपलीं घरें करून रहावें असें आहे. पहिल्यानें दर कैदीस १ रुपये महिना देत असत त्यांतून त्यानें आपला निर्वाह करावा. ती वहिवाट आलीकडे मोडून टाकून अन्न देण्याची वहिवाट सुरू केली आहे. सर्व टोळींतील लोकांस एकत्र जेवण्या बसण्यास व हसण्या खेळण्यास मोकळीक असते. याप्रमाणें बारा वर्षें टोळींत राहिल्या नंतर त्यांना स्वतंत्रता देतात. मग त्यानें पाहिजे तो धंदा करून त्या बेटांत रहावें. ही बारा वर्षांची मुदत जानेवारीचे पाहिले तारखेपासून नऊ वर्षांची ठरविली आहे. पोर्टब्लेअरमध्यें असे काळ्या पाण्याचे कैदी नेले आहेत त्यांची संख्या सुमार २१००० आहे. व बेटाचा प्रदेश सुमार ६० कोसांचा आहे. पांच पांच शें, किंवा चार चार शेंची टोळी दोन तीन कोसांवर एका टापूत रहाते. त्यावर युरोपियन अधिकारी आहेत. व सुखवस्तूही बहुत युरोपियन लोक तिकडे आहेत तेथील हवा पाणी फार चांगलें आहे व जमीन उत्तम पिकाऊ आहे. त्या देशचे जन्मलेलेही बहुत लोक तिकडे आहेत, तिकडील अधिकारी कैदी लोकांस मोठे दयाळुपणें वागवितात व खाण्यास भात, पोळी, तूप वगैरे चांगले अन्न देतात. तिकडील कैद इकडील कैदेपेक्षां पुष्कळपट चांगली आहे. काळे पाण्यावर ज्या स्त्रिया कैदी येतात त्यांच्या इच्छेवरून तिकडील कैदी लोकांशी त्यांचीं लग्नेंही अधिकाऱ्यांच्या संमतीनें होतात.

ही हकीकत सांगणारा कैदी तानाजी याला तिकडे जाऊन १६ वर्षें झालीं. १२ वर्षांनंतर त्यानें हलवायाचें दुकान घातलें होतें व ४ वर्षांत त्यास २५० रुपये फायदा झाला ती रकम तो घरीं घेऊन आला. पण विशेष गोष्ट ही कीं, या १६ वर्षांच्या अवकाशांत तो आपली मराठी भाषा अगदी विसरला व हिंदुस्थानी बोलूं लागला, तिकडे सर्व लोकांचा साधारण व्यवहार हिंदुस्थानी भाषेवर चालतो. सरकारानें या कैद्यांस पदरचा खर्च देऊन जहाजांतून कलकत्यास पोंचविलें, तिकडून मुंबईस जाऊन पोलिस शिपायाबरोबर आगगाडींतून तो एथें आला. व एथील पोलिस सु० साहेबांनीं त्यास खर्चास देऊन व शिपाई देऊन वाशिमाकडे त्याचे घरीं पोंचवून दिलें.

ही इंग्लिश सरकाची केवढी दयाभूतवृत्ती आहे! घातपात करणारे महान पातकी जे लोक त्यांस देखील सरकार इतक्या चांगल्या रीतीनें वागवितें यावरून यांची थोरवी सर्वांनीं मनांत आणावी!

## वऱ्हाडांतील वकील.

वऱ्हाडांतील वकिलाचे संबधानें नेटिव ओपिनियन पत्रांत एक आर्टिकल छापलें आहे. त्याचा भावार्थ बहुतेक आमचे मताशी मिळून आहे. आह्मी पूर्वीं ह्मटलें आहे कीं, इकडेस पूर्वीं परीक्षा घेऊन एक वेळ वकील नेमले त्या नंतर आजपावेतों कधीं परीक्षा झाली नाहीं व बाहेरचे लोकांस काम करण्याची परवानगीही मिळाली नाहीं हे कांहीं बरें नाहीं.

वकीला विषयीं मे. जुडिशियल कमि. साहेबांचें मत एकंदरींत चांगलें नाहीं. परंतु ते ह्मणतात तशीच केवळ सर्वथैव स्थिति आहे असें आह्मास वाटत नाहीं. कित्येक कोर्टांचे न्यायाधीश आपापल्या कोर्टांतील वकीलांची तारीफ करितात. वऱ्हाडांतील वकीलांत कांहीं वाईट आहेत तसे कांहीं चांगलेही आहेत व ही स्थिति सर्वत्र आहे. जेथें बरें तेथें वाईटही असायाचेंच. आह्मास वाटतें कीं बाकीच्या सर्व व्यवस्थेचा विचार केला असतां वऱ्हाडांत काम चालविण्यास आहेत हे वकील असावे तसे नाहींत असें नाहीं. व त्यांतूनही वाईट वकिलांची स्थिति सुधारणें झाल्यास त्यास उपाय मेहेरबान जुडिशियल कमिशनर साहेब व अलीशान रेसिडेंट साहेब यांनीं शोधून काढलेला कांहीं समजला नाहीं. आह्मी ह्मणतों कीं ही स्थिति सुधारणें जरूर आहे तर कांहीं निराळ्या प्रकारची व्यवस्था करावयास पाहिजे आहे सारांश आह्मी आशा करितों कीं आमचे प्रांताचे सरकारानें वकिलास एकंदरींत दोष न देतां त्यांच्या स्थितींत पालट पडण्यासाठीं कांहीं उपयुक्त उपाय योजावेत.

## च्यांपर्टी आणि मेन्टेनन्स.

च्यांपर्टी आणि मेन्टेन्स संबंधी विलायतचा कायदा किंवा नियम हिंदुस्थानास कितपत लागू आहेत ह्या बाबदींत पुष्कळ दिवसांपासून हिंदुस्थानांतील न्यायाचे कोर्टांतून वाद विवाद आहे. ह्या बाबदींत गेल्या नोवेंबर महिन्याचे २५ वे तारखेस रामकुमार कुंडी विरुद्ध चंद्रकांत मुकरजी या खटल्यांत प्रिव्ही कौन्सिलचे लार्ड यांनीं आपलें मत दिलें तें आह्मी आपले वाचकांस कळवितों.

"जरी च्यांपर्टी आणि मेन्टेनन्सचा ठरीव इंग्लिश कायदा हिंदुस्थानांत लागू केला नाहीं असें आह्मी मानितों तरी आह्मास आधारावरून असें दिसून येतें कीं या प्रकारचे करार सार्वजनिक हिता विरुद्ध असल्या कारणानें अव्यवहारोपयोगी असें ठरविलें पाहिजे. वर ज्या ज्या निवाड्याचा हवाला दिला गेला आहे त्यावरून व विशेषेंकरून ह्या कोर्टाचे निवाड्यावरून आह्मी असें कल्पितों कीं दावा चालविण्याकरितां पैसा देऊन त्याचे बदल्यांत वाद जिंकल्यास त्या वादाचे विषयाचा कांहीं अंश घेण्या बद्दलचे जे निर्दोष करार होतात ते सार्वजनिक हिता विरुद्ध ह्मणून कधींही मानू नयेत. असे मुकद्दमे पुष्कळ दाखवितां येतील कीं ज्यांत दावा करणाराचा मालमत्तेवर खरोखर हक्क असून त्या मिळकती संबंधी दावा चालविण्यास त्याजपाशी कांहीं ऐपत नाहीं तर तशा वेळीं न्यायाची वृद्धी व्हावी. आणि जुलूम जबरदस्तीस अडथळा व्हावा ह्या हेतूनें वर सांगिल्या रीती प्रमाणें त्यानला मदत मिळणें रास्त आहे. परंतु अशा स्वरूपाचे करार फार काळजीनें तपासून पाहिले पाहिजेत. आणि जेथें दिसून येईल कीं ते जुलमाचे आहेत आणि अविचारानें करून दिले आहेत आणि तेणें करून देणाराचे अनहित होत आहे, किंवा खऱ्या दाव्यास मदत करण्याचे व त्याच्या बदला योग्य मुबदला घेण्याचे निष्कलंक हेतूनें ते झाले नसून अप्रशस्त हेतूनें झाले आहेत. जसें— दाव्यासंबंधी जुव्याचे प्रकारचे किंवा कोणा एकाचें नुकसान व्हावें अथवा त्याजवर जुलूम व्हावा ह्मणून निराधार दाव्यास उत्तेजन देण्या स ठ. झाले आहेत तर ते अमलांत येऊं नयेत. कारण ते सार्वजनिक हिताविरुद्ध होत"

## जुडिशियल कमिशनर साहेबांचा ठराव

स्पेशियल अपील नंबर ३६ सन १८७७

स्पेशियल अपीलेंट प्रतिवादी

देवचंद बद्रीनाथ—वकील देवराव विनायक.

स्पेशियल रिस्पांडेंट वादी

जयराम सोनार—वकील गोपाळ खुशालराव

ह्या दाव्यांत एका शेताचे निमे हिस्से

दारानें आपला हिस्सा दुसरे निमेचे हिस्सेदारास न विकतां तिसऱ्या एका देवचंद नावाच्या मनुष्यास विकला. अव्वल कोर्टास वाटलें कीं शेताचा निमेचा हिस्सेदार ज्याचे नांवें खातें आहे ( वादी ) त्यास अग्रक्रयाधिकार होता व त्या कोर्टानें वादी तर्फे फैसल देऊन देवचंद याच्याशी झालेला विक्रीचा व्यवहार रद्द केला.

देवचंद यानें दिपुटी कमिशनर साहेब जिल्हे अकोलें यांचे कडेस अपील केलें त्यांनीं वऱ्हाड सेटलमेन्ट रुळांतील क० ७ हा दाव्यास लागू आहे असें ठरवून अव्वल ठराव कायम केला.

खरीदीदार देवचंद हा हल्लीं स्पेशियल अपील करितो. वऱ्हाडसेटलमेन्ट रुळांतील कलम ७ या तंट्यास कोणतेही प्रकारें लागू आहे असें आह्मास वाटत नाहीं. कोणी हिस्सेदार आपला हिस्सा सोडून देईल तर रिविन्यू अधिकारी यांणीं काय व्यवस्था करावी याजविषयीं ठराव सदरील कलमांत आहे. आणि "विकत देणें" याचा समावेश "सोडून देणें" ह्या शद्बांत होणार नाहीं.

हल्लींसारख्या दाव्यास लागू असें स्पष्ट कलम ९ वें आहे. हिस्सेदार आपला हिस्सा आपल्या मर्जीस येईल त्या मनुष्यास विकूं शकतो. आह्मी अव्वल व अपीलकोर्टांचे ठराव रद्द करितों आणि खरीददार देवचंद याचे तर्फे फैसल देतों.

मूळचा वादी ह्मणजे स्पेशियल रिस्पाँडेंट यानें खर्च द्यावा. ता. २९ । १ । ७७

## वऱ्हाड

गुदस्त सालचा वऱ्हाड प्रांताचा वसूल ८८०९७४८ रुपये झाला हा तिगस्तां पेक्षां १५१०१४४ रुपयांनीं अधिक आहे. याचप्रमाणें खर्चही वाढला आहे. तिगस्त सालीं ५९११०३० रुपये खर्च होता तो गुदस्त सालीं ६९४०९२८ रुपये झाला. तरी १८६८८१० रुपये बचत राहिली. ही खर्चाची व जमेची वाढ साधारण दुवेरजी जमाखर्चासारखीच आहे ह्मणजे एका खात्याकडील रकम दुसरे खात्यास नेली आहे. वऱ्हाडांत सरसालास फाजील रकम रहाते ती निजाम सरकारास देण्याचा ठराव आहे हें सर्वांस ठाऊक आहेच पण ती जेव्हांचे तेव्हां देत नाहींत. चालू खर्चाकरितां खजिन्यांत बरीच शिलक राखून ठेवावी लागते. गुदस्त सालीं निजाम सरकारास १६२८९९० रुपये दिले, तरी ४८८८३७० रुपये त्यांचें घेणें इंग्लिश सरकाराकडे शिलक आहे.

कर्नल नेंभार्ड साहेब कमिशनर यांचे जाग्यावर मि० डबल्यु बी जोन्ससा. यांची नेमणूक होणार अशी वार्ता होती ती खरी झाली. जोन्स साहेब नागपुराहून कलकत्यास तुरुंगासंबधी कमिटी भरली होती तिकडे गेले होते व त्याकमीटींत ते अध्यक्ष होते. त्या कमीटीचे कामाचा निकाल काय झाला तो समजला नाहीं पण सर्व लोक आपआपले जागीं यावयास निघाले असें येका पत्रांत लिहिलें आहे त्यावरून जोन्स साहबही नेंभार्ड साहेब जाण्याच्या सुमारास इकडे येतील असें कळतें.

कर्नल अलार्डाईस साहेब मार्च महिन्याचे पहिले आठवड्यांत इकडून जाणार व त्यांचे जागेवर नवीन येक सिव्हिल सर्व्हिस येणार व नेटिवास ही जागा देणार अशाप्रकारच्या बातम्या होत्या परंतु तसें कांहीं न होतां मेजर बेल साहेब विलायतेस रजेवर आहेत त्यांचीच जुडिशियल कमिशनरचे जागेवर नेमणूक झाली. व त्यांनीं अलार्डाईस साहेब जाण्याचेच सुमारास एथें यावें व आपली राहिलेली रजा रद्द करावी अशाविषयींही त्यांस तारेंतून लिहून गेल्याचें समजतें. व त्याप्रमाणें ते लवकरच येणार असें ऐकण्यांत आलें आहे. बाहेरून नवा मनुष्य न येतां बेल साहेबास ही जागा मिळाली व येणेंकरून कित्येक डिपुटी कमिशनर व असिस्टंट कमिशनर यांस प्रमोशन मिळण्याची सोय झाली हें चांगलें झालें.

येथील अव्वाची मे० एदलजी साहेब यांस दिवाणी कामाचा अधिकार डिपुटी कमिशनर साहेबाकडून मिळाला आहे त्याविषयीं जुडिशियल कमिशनर मार्फत काम चाललें नाहीं व त्यांची त्याबाबदींत मंजुरात मिळालेली नाहीं सबब हें कायदेशीर झालें आहे किंवा नाहीं याविषयीं प्रश्न निघून कांहीं काम चालू आहे असें ऐकतों.

कर्नल अलार्डाईस साहेब ३।४ दिवस पातुरास राहून पुढें वाशिमास गेले.

रा. बा. नारायणभाई दांडेकर विद्याखात्याचे डायरेक्टर यांची स्वारी परवाचे दिवशीं पूर्व वऱ्हाडाकडे फिरावयास निघाली ती मूर्तिजापुरास आज असावी.

निजाम सरकारचे इंजिनियरखातें दुष्काळग्रस्ताचे मदतीकारितां चांगलें झटत आहे असें दिसतें. कित्येक हजार मनुष्यें त्यांनीं कामास लाविलीं आहेत. रायचूर पश्चिम प्रांतांत फार विपत्ति आहे. तिकडे ८ लक्ष रुपयांचें सांगशन केलें आहे. धान्य पुष्कळ आलें आहे परंतु अजून किंमत चढावर आहे.

निजाम सरकारची स्वारी दिल्लीहून हैदराबादेस परत आली तेव्हां मांदगाव एथें औरंगाबादचे प्रख्यात सावकार रतनचंद शेट यांणीं हुजुरास मोठी मेजवानी दिली असें कळतें.

मि. नैलिस साहेब एथील स्मालकाज जडज हे आपले कामाचा चार्ज म्या. ग्रांट साहेब यांस देऊन गेल्या सोमवारीं मुंबईस गेले. तिकडून आज परत येऊन लवकरच विलायतेस २ वर्षांचे रजेवर जातील.

मागील अंकीं आह्मी लिहिलें होतें कीं मेजर हडलस्टन साहेब एथील डिपुटी कमिशनर १६ महिन्यांचे रजेवर जातील; पण हल्लीं समजतें कीं ते तूर्त सदहू रजा उपयोगांत आणित नाहींत.

मि० लायल साहेब विलायतेस रजेवर आहेत ते पुढील महिन्यांत परत येणार.

जुडिशियल कमिशनर साहेबांचे हेड क्लार्क मि० रेटसी साहेब ८ दिवसांची रजा घेऊन या आठवड्यात मुंबईकडे गेले.

गेले आठवड्यांत कळविलेली प्रतापी कृष्णाबाई इच्या चौर्य कर्माबद्दल चवकशी गेल्या सोमवारीं तहशिलदारांपुढें होऊन तिला ६ महिने सक्त मजुरी कैदेची शिक्षा झाली.

गेल्या रविवारीं एथील नेटिव जनरल लायब्ररीची सभा पुस्तकालयांत भरली होती तेव्हां रा. रा. देवराव विनायक वकील लायब्ररीचे सेक्रेटरी यांणीं वार्षिक रिपोर्ट वाचिला. एकंदर मागच्या सालापेक्षां ह्या स्तीची स्थिति सुधारली आहे व ती करितां देवराव यांची अवश्य तारिफ केली पाहिजे. पाहिले ह्मासेव वर्गणीदार लायब्ररीला २९ असून दरमहिन्यास उत्पन्न १७ रुपये आहे. दररोज निघणारें इंग्रजी पत्र टाइम्स आफ इंडिया याच्या दोन प्रति आणवाव्या आणि एक प्रत दोन दिवस सतत लायब्ररींत रहात जावी असें ठरलें ता. १ फेब्रुवारीपासून लायब्ररी टौनहालांत नेली आहे. व आज त्याच ठिकाणीं लायब्ररीची दुसरी जनरल सभा भरणार आहे.

पातुरास श्री. नाना साहेब साधूची यात्रा भरली आहे. बंदोबस्ताकरितां पोलिस सुपरइंटेंडेंट, असिस्टंट कमिशनर, व बाळापुरचे तहशिलदार तेथें गेले आहेत.

एथील तहशिलदार रा० रा० भास्कर महेश्वर लेले यांणीं देशीं जाण्याकरितां रजा मागितली होती ती तीन महिन्यांची मंजूर होऊन आली.

हैदराबादेस बाद्याचा उपद्रव शुरू झाला व तेणेंकरून दोन मोठे शूर अरब गुदरले.

निजाम सरकारचे प्रीतींतले अरबांचे मुकदम जंग या नावाचे मोठे शूर गृहस्थ यांस हवेचा आजार झाला ह्मणून त्याचे समाचाराकरितां डाक्टर जानसन गेले होते. तेव्हां जंग साहेबांचे चिरंजिवानीं डाक्टरास विच्यारलें कीं, प्रकृति कशी आहे ? त्यांनीं सांगितलें, बरी आहे. इतकें ह्मणून डाक्टर परततात तोंच जंगाचें प्राणावसान झालें. हें पाहून जंगाच्या मुलानें आवेशानें जाऊन डाक्टरास तरवारीचा वार केला. असें उर्दूअखबारवरून कळतें.

इलिचपुर जिल्ह्याचा या वर्षाचा कलालीचा हरास झाला तवेळेस येथील नाजरांस पेशगीचा पैसा घेण्याविषयीं हुकूम झाला होता इतक्यांतच त्यांना व आणखीं एका सरकारी कामदारानें मिळून येक भटजी दक्षिणेकरितां कचेरींत आणवविले व ज्या कलालानें भटजीस रुपया दिला त्याची आगाऊ रकम आधीं जमा करीत होते. असा प्रकार कांहीं वेळपर्यंत चालला. इतक्यांत येक दुसरा कलाल आला त्यानें भटजीस दक्षिणा देण्याचें नाकारल्यावरून कांहीं भांडण झालें. तेव्हां त्यानें अ० क० साहेबांकडे कागाळी केली. शोध करण्याकरितां रा. गणेश गोविंद जु० शि० यांस हुकूम झाला. इतक्यांत भटजीबुवांनी सुमारें ९५ रुपयेपर्यंत दक्षिणा उपटून पलायन केलें. भटजी जेव्हां धरले गेले नाहींत तेव्हां अर्थात सर्व गोष्ट बेपत्ता झाली. नाझरलोकांच्या मागें झाले त्या उदाहरणवरून अझूनही लोकांनीं आपली चाल सुधारूं नये कीं काय!

व. मि.

### मागाहून आलेली नोटिस.

राजश्री रामप्रताप दानमलजी मारवाडी साहू दुकान पेठ ताजनापेठ अकोलें यांस बनसीलाल फकीरचंद वस्ती अकोले याजकडून नोटिस देण्यांत येते कीं संवत् १९३१ ह्मणजे सालमजकुरीं तुमचा आमचा व्यवहार होऊन आज मितीस तुमचेकडे ६९३॥=॥ खात्यावरून घेणें निघालें तें मागितलें असतां दिलें नाहीं सबब या नोटिसीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं आजपासून ८ दिवसांत तुह्मी येऊन हिशेब पाहून खातें देवढें करावे या मुदतींत तुह्मी न आल्यास किंवा रकम तुमचे कडून न आल्यास तुह्मावर फिर्याद करण्यांत येईल हें स्पष्ट तुह्मास कळविलें आहे. यांत तुमचें ह्मणणें काय आहे हें तुह्मी स्वतः येऊन कळवावे अगर पंचाचे समक्ष खरें खोटें ठरवावें व निकाल करावा यांत तुह्मास बरें आहे नाहींपेक्षां वर लिहिलेल्या मुदतींत तुमची वाट पाहू व तुह्माकडून कांहीं निकाल होत नाहीं असें दिसल्यास दिवाणी कोर्ट मार्फत तजवीज करावी लागेल अशा प्रकारची बेमानी करणें तुह्मासारख्या थोर व्यापाऱ्यास लांछन आहे व अशी बेमानी केल्यानें पैसा तुह्मास पचणार नाहीं हें खूप समजावें कोर्टाचा व नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें ता. ३ माहे फेब्रुवारी सन १८७७ इसवी.

[ सही ] बनसीलाल फकीरचंद
दस्तुर खुद्द

## वर्तमानसार

सोलापुरचे कलेक्टर मि. ग्रांट साहेब यांस मुंबईचे म्युनिसिपल कमिशनर नेमिलें व त्यांचे जागेवर भावनगरचे जाईंट अडमिनिस्ट्रेटर मि. परसिव्हल यास नेमिलें. परंतु सोलापुरचे रयतेनें तारायंत्रातून, सरकारास अर्ज केला आहे कीं ग्रांट साहेबांस एथून बदलू नये.

मनमाडपासून दौंडापर्यंत रेलवेचें जमीन काम सुरू करावें असा पुन्हा बूट निघाला आहे. व निरेच्या पाटबंधाऱ्याचें काम फार लवकर सुरू होणार आहे.

विलायतेस "काटन" नावाचें वर्तमान पत्र आठवड्यास निघणार आहे त्यांत कापसासंबंधीच सर्व मजकूर येणार.

अमदाबादेस दारूच्या कारखान्यास आग लागून ५ घरें जळालीं व १०० मनुष्यांस इजा झाली त्यांतून ३८ ठार मेलीं

मुंबईच्या आडवोकेट जनरलला २५०० रु. पगार आहे तो १००० रु. करणार.

तुर्कस्थानांतील कानफरन्स संपून सर्व प्रधान आपआपले देशीं गेले. लढाई लवकर सुरू होणार नाहीं असें ह्मणतात.

मुंबई व मद्रास इलाख्यांत दुष्काळ असल्याप्रमाणें चीन देशांत व फ्रेंच लोकांच्या वसाहतीच्या बेटांतही दुष्काळ आहे असें कळतें.

सर जी. कोपर बारोनेट सी. एस. के. सी. एस. आय. यांस अयोध्येचे चीफ कमिशनर व वायव्यप्रांताचे लेफटीनेंट गवरनर नेमिलें. व मि. इंग्लिश सी एस आय यांनीं तूर्त आफि० चीफ कमिशनरचें काम पहावें असा हुकूम झाला.

धुळ्यास गारांचा मोठा पाऊस पडला. व पांजरा नदीला तीन तासांत १० फूट पाणी चढलें. तीन कोसांवरून एका खेड्यांतून एक गार आणिली ती अतशेराहून अधिक वजन होती. या पावसानें रब्बीचें फार नुकसान झालें. गुजराथेंतही गारांचा पाऊस पडला.

फेब्रुवारीचे ५वे तारखेस कलकत्त्यास रेलवेकानफरन्स भरणार होतें; पण दुष्काळ संबंधी गडबडीमुळें मद्रासेच व मुंबईचे रेलवे आफिसरांस तिकडे जाण्यास सवड नाहीं ह्मणून तकूब झालें आतां पावसाळ्यांत किंवा पुढील हिवाळ्यांत भरेल.

सन १८७६ चे नोवेंबर अखेर ११ महिन्यांत हिंदुस्थानांतील सर्व रेलवेला मिळून मागील सालच्या ११ महिन्यांपेक्षां एक कोट रुपये अधिक उत्पन्न झालें त्यांत जी आय पीला १४ लक्ष व ईस्टइंडियेला ४३ लक्ष रुपये अधिक मिळाले. व सर्व स्टेट रेलवे मिळून सारे ९ लक्ष रुपये अधिक मिळाले.

सर्व पृथ्वींत मनुष्यें१४३१९१७००० आहेत. सर्व पृथ्वीचें क्षेत्रफळ चौरस मैल ५१३४०८०० आहे. ग्रेट ब्रिटनची सन १८७६ सालची लोक संख्या ३३४५०००० असावी असा अजमास अहे, हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यांतील लोक संख्या १८८०९३७०० अहे. ब्रह्मदेशांतील ब्रिटिश राज्यांतील लोक संख्या २७५०००० आहे. ग्रेट ब्रिटनच्या ताब्यातील सर्व मुलूक ७९६४७५२ चौरस मैल आहे आणि २०३९४१७६६ लोक संख्या आहे. हिंदुस्थानांतील करभार देणारे किंवा मांडलिक राजे यांच्या मुलखासुद्धां हिंदुस्थानची एकंदर लोक संख्या २३९०००००० आहे.

युरोपांतील तुर्कस्थानची लोक संख्या ८५०००० आहे व यांत फक्त तिसरा हिस्सा मुसलमान लोक आहेत रोमेनिया प्रांतात ४४५९२७७ लोक आहेत आणि सर्व्हिया प्रांतांत १३७७०६८ लोक आहेत. युरोप आशिया व आफ्रिका या तीन्ही खंडांतील तुर्कस्थानचें सर्व राज्य मिळून लोक संख्या ४७६६०००० आहे यांपैकीं १३०००००० एशिया खंडांत व आफ्रिका खंडांत २०००००० आहे.

युरोप व एशिया खंडांतील रूस देशाच्या राज्यांतील ८६५८६००० लोक संख्या आहे ही संख्या गुदस्त सालचे अजमासापेक्षां ९००००० अधिक आहे याचें कारण मध्यएशियांत त्यांनीं मुलूक घेतला आहे त्या भागांत रशियाकडे मुलुक चौरस मैल १२९०००० असून ४६५०२१३ लोक संख्या आहे असा अजमास आहे रशियाचे एकंदर पृथ्वीवरील सर्व मुलुखाचें क्षेत्रफळ ८४५६५०० चौरसमैल आहे.

---

## नोटिसा.

रामभगत जोखीराम दुकान अकोला यांसी कुंजीलाल रामलाल दुकान अकोला यानकडून नोटिस देण्यांत येते कीं शिवदत्त उदापुऱ्या याचे आमचे जवारीचे व्यवहारांत वांधा पडून त्याची पंचाईत रामप्रसाद दहिहांडेकर यांनीं करून नफा नुकसानीचा हिशेब पाहून शिवदत्त यांजवर १४३॥|≡। रुपये बाकी काढिली व ती त्यानें कबूल केली व पंचासमक्ष तुह्मी त्यास जामीन झाला. त्याप्रमाणें तुह्मी आमचे रुपये अजून दिले नाहींत वीस दिवस झाले देतों देतों ह्मणता व देत नाहीं ह्मणून मुद्दाम नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून च्यार दिवसांत आमची रकम दोन रुपये शेकड्याचे व्याजासुद्धां न द्याल तर तुह्मावर कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल.

त्याच पंचाईतींत ठरलें कीं शिवदत्त यास जुनी जवारी खंडी २। पोतीं २२॥ आह्मी शिवदत्त यास द्यावी त्याप्रमाणें त्या वेळेपासून आह्मी स्टेशनावर जवारी राखून ठेविली आहे ती तुह्मी घेऊन जात नस त्यामुळें भिजून खराब होत आहे तिचे जबाबदार आम्ही नाहीं हेंही तुह्मास या नोटिसीनें कळवितों. नोटिस पावल्यापासून ४ दिवसांत तुह्मी जवारी न न्याल तर बाजारभावाप्रपाणें ती विकली जाईल व जी रकम येईल ती तुमचे कडून घेणें आहे त्यांत जमा केली जाईल व बाकीच्या रकमेबद्दल कायदेशीर तजवीज केली जाईल; व या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. तुह्मास कळावें. तारीख २६ जानेवारी सन १८७७ इसवी.

( सही ) कुंजीलाल रामलाल वहिवाटदार हजारीमल

---

नोटिस.

मेहेरबान जोरावरखान वल्लद मगलखान वैद वस्ती ताजनापुर यांस खालीं सही करणारांकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी कुंजीलाल रामलाल दुकानांतून हमेशा अकोलाजिलकरितां सामान नेत असता त्याचे बाकीच रुपये तुह्माकडे तुमले सबब त्यांनीं तगादा केल्यावरून दोन हुंड्या लिहून ९०० रुपयांची भर कुंजीलाल यांचे दुकानीं करविली पण त्या हुंड्यांबद्दल रुपये ४ महिने झाले अजून दिले नाहींत. व हुंड्याही मुंबई दुकानावर न सकारतां वापस आल्या त्यामुळें सकाई नकाई ही तुह्मावर बसली व त्या पुढें तुह्मी कुंजीलाल दुकानचा माल नेला तेही रकम दिली नाहीं त्यामुळें आज मितीस आमचे येणें तुह्माकडे सुमारानें निघत आहे तें खालीं लिहिले प्रमाणें.

रुपये.

८०० कुंजीलाल रामलाल बद्दल

६५० बक्षिराम बिन ब्रिजराज बद्दल

४०० सावतराम रामप्रसाद बद्दल

३०० गिरधारीमल सुरजमल बद्दल

येणें प्रमाणें रकमा तुह्माकडून येणें असल्या वरून तुह्मांस मुद्दाम नोटिस दिली आहे. व नोटिस पोंचल्यापासून आठ दिवसांत तुह्मी रुपयांची आदायी न कराल तर दरमहा ३ रुपये शेकड्याचें व्याज तुह्मापासून घेतलें जाईल. व कायदेशीर रीतीनें रुपये वसूल केले जातील. या नोटिशीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल कळावें तारीख २७ माहे जानेवारी सन १८७७ इसवी.

( सही ) बक्षिराम ब्रिजराज

( सही ) सावतराम रामप्रसाद

( सही ) कुंजीलाल रामलाल

दस्तुर हजारीमल

---

नोटिस.

लोडाजी वल्लद नरसिंगजी पाटील रहाणार चांदूर तालुके अकोले यास कळावें कीं, तारीख १३ ज्यानेवारी सन १८७७ इसवीचे उर्दू अखबारांतून नोटिशीनें कळविलें कीं, हरी तागड्या याचे रहाण्याची जागा माझी आहे. इमला काढून जागा खुली करून द्यावी ह्मणोन. त्यास सदर्हू जागा व कोठ्याची सुद्धां जागा तुमची नसून हरी तागड्या हा मुंडवाईक आहे व त्याचीच जागा आहे तसाच इमलाही त्याचाच असल्यामुळें सदर्हू जागा इमल्यासुध्धां मी हरासांत घेतली आहे. कोणतेही प्रकारें सदर्हू जागेवर तुमचा कांहींच संबंध नसून विनाकारण तुह्मी मला नोटिस दिली व त्याचें उत्तर देणें आह्मास भाग पाडलें सबब या नोटिशीचा खर्च तुह्मी द्यावा न दिल्यास सिरस्त्याप्रमाणें तजवीज करूं. कळावें. तारीख ३१ ज्यानेवारी सन १८७७ इसवी.

( सही ) चिंतामण वल्लद सखाराम पाटील चांदूर दस्तुर खुद्द.

---

## जाहीरखबर.

### प्रश्नोत्तर संग्रह

माजिस्त्रेट व पोलिस परिक्षे संबंधी

सदर्हू पुस्तक आह्मी मराठी भाषेंत तयार करून छापीत आहों. या पुस्तकांत माजिस्त्रेट वर्ग २।३ व पोलिस इन्स्पेक्टर आणि चीफ कानस्टेबल यांचे परिक्षेस लागणारे कायद्यांतील मुख्य मुख्य कलमवार प्रश्न काढून त्याचीं उत्तरें सादंत लिहून त्यास त्या त्या कायद्यांचीं कलमें दाखल केलीं आहेत. ज्या कायद्यावर यांत प्रश्न काढले आहेत ते कायदे:—

१ पिनलकोड दुरुस्तीसह

२ क्रिमिनल प्रोसिजरकोड दुरुस्तीसह

३ पुराव्याचा आक्ट

४ डिस्ट्रिक्ट पोलिस आक्ट

५ गावचे पोलिसा बाबद आक्ट

६ गुरांचे अति क्रमणाबद्दल आक्ट

७ फटक्यांचा कायदा

८ जुगाराचा आक्ट

९ हत्यारें व युद्ध सामग्री करण्याबाबद आक्ट

१० निरुद्योगी भटकणारे युरोपियन लोकांकरितां आक्ट

११ सन १८७२ चा परमुलखांतील हुकमतीविषयींचा व परमुलखांतील अपराध्यांस त्याचे सरकारचे स्वाधीन करण्याविषयींचा आक्ट.

१२ वेड्यांचे आश्रयस्थानाविषयीं आक्ट

हें पुस्तक परिक्षेस जाऊं इच्छिणारे व माजिस्त्रेट व पोलिस लोक यांस फार उपयोगाचें होईल. सन १८७७ फेब्रुवारी अखेर चे आंत रोख पैसा पाठविणारांस दरप्रतीस २॥ रुपये व टपाल खर्च ६ आणे पडतील त्यानंतर घेणारांस दर प्रतीस ३ रुपये शिवाय टपाल खर्च ६ आणे पडेल ज्यांची हें पुस्तक घेण्याची इच्छा असेल त्यांणीं आह्मांस कलादगी एथें पोष्टपेडपत्रें पाठवावीं. टिकिटा पाठविणें त्या अर्ध आणा दराच्या वर्तळ्यासुद्धां पाठवाव्या. पुस्तक मार्च महिन्याचे अखेरीस तयार होईल.

कलदगी ता. २५ जानेवारी १८७७ इ. } कल्याण शिताराम चित्रे.

---

### छापखानेवाल्यांस सूचना

आह्मी छापखानेवाल्यांस अति नम्रतेनें कळवितों कीं आह्मी मराठी ग्रेटप्रायमर टैप व लेडी फार स्वस्त दरानें पुरवित असतों. ज्यांस विकत घेणें असेल अथवा दराची माहिती पाहिजे असेल त्यांनीं मुंबईत खेतवाडींत ५वे गल्लींत ९१ व ९२ नंबराचे घरांत आमच्या नावें पत्र पाठवावें.

शामराव रणसोडरावजी

मिनरवा प्रेस.

मुंबई तारीख २९ माहे ज्यानेवारी सन १८७७ इसवी.

---


## जाहिरात

BANK OF BOMBAY
KHAMGAUM BRANCH.

खामगांव एथील मुंबई ब्यांकेची शाखा रुपये ५०० व ज्यास्त रकम नियमित मुदतीनें अमानत ठेवण्या तयार आहे. व त्याबद्दलच्या शर्तींची माहिती खामगाव एथील ब्यांकेचे आफिसास अर्ज केला असतां मिळेल.

तारीख १४ माहे सप्तंबर १८७६ इसवी.

Harry H. Hynes.
Agent


---

हें पत्र अकोले एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प.

REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला रविवार ता० ११ माहे फेब्रुवारी सन १८७७ इ० अंक ६

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपला माझा परिचय नाहीं तरी आपलेकडे पाठविलेल्या मजकुरास जागा द्याल अशी आशा आहे.

दिग्रस एथील वार्षिक परिक्षेचीं बक्षिसें वाटण्याचा समारंभ तारीख २८ माहे ज्यानेवारी सन १८७७ इसवी रोजीं झाला. त्या समयीं सभेचें अध्यक्ष स्थान मे० किसनलाल पोलिस इन्स्पेक्टर रेंज दारव्हा यांणीं सुशोभित केलें होतें, व सभेस गावांतील मंडळी—कमिटीदार, व्यापारी वगैरे बरेच आले होते. सभा भरल्यावर अध्यक्षांनीं थोडीशी परिक्षा घेऊन, मुलांस बक्षिसें वाटलीं. रीतीप्रमाणें पान, सुपारी, हार तुरे वाटते समयीं अध्यक्षांनीं सभासदांस असें सूचविलें कीं, या शाळेंत एक घंड्याळ आणि मुलांस बसण्याकरितां तरच्या अगर कांहीं तरी असावें, याकरितां या समारंभास जमलेले सभासद आपला उदार हस्त पुढें करून वर्गणी देतील; असें दर्शविल्यावरून वर्गणीचें आकडे त्याच वेळेस सुमार ४० । ४१ रुपयांचे पडले. वर्गणी जमा झाल्यावर अध्यक्ष वरील सामान घेऊन देणार आहेत.

पत्रकर्ते महाराज या एवढ्या लहानशा गावांत एकदम एवढी मोठी वर्गणी जमली हें पाहून मे० पोलिस इन्स्पेक्टर यांची लोकप्रियता फारच दिसून येते. या वऱ्हाडांत पोलिस डिपार्टमेन्टांतील हुद्देदारांनीं शाळाखात्यास उत्तेजन दिल्याचें फारसें कोठें दिसत नाहीं. तरी सर्व खात्यांतील लोकांनीं यांच्याप्रमाणें उत्तेजन दिल्यास वऱ्हाडच्या शाळा सुधारण्यास फारसा विलंब लागणार नाहीं.

या सभेस जर पो. इ. नसते तर फक्त मास्तराचे ह्मणण्यावर एवढी वर्गणी कधींही जमली नसती.

आपला एक
दिग्रस नजीक रहाणारा.

### बुलढाणें एथें राणी सरकारच्या चक्रवर्तिनी पदवीग्रहणनिमित्त मोठा उत्साह.

गेल्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस आपल्या दयाळु राणी साहेबांनीं चक्रवर्तिनी पदवी घेतल्याचा जाहिरनामा दिल्ली एथें मोठा दरबार होऊन प्रसिद्ध झाला. त्याच दिवशीं सर्व हिंदुस्थानभर लहान मोठ्या ठिकाणीं सर्वत्र समारंभ होऊन सार्वजनिक रीत्या त्याच जाहिरनाम्याच्या नकला वाचल्या गेल्या. आपल्या वऱ्हाडांत प्रथमत: असें वाटलें होतें कीं एथें उत्साह होणार नाहीं व कांहीं मजकरीही नाहीं. कारण आमचे यजमान निजाम सरकार हे स्वत:च वड्या दरबारास गेले होते परंतु अगदीं लग्न घटकेच्या सुमारास हुकूम येऊन इतर ठिकाणांप्रमाणें आपल्या वऱ्हाडांतही जरी थोडीशी धांदल झाली तथापि बऱ्याच थाटमाटाचे समारंभ झाले हें सर्वांस विदितच आहे. बुलढाण्यास तर या समारंभाची विशेषच धांदल झाली कारण एथील मे. डिपुटी कमिशनर सा. स्वस्थपणानें नाताळ घालविण्याकरितां इलिचपुराकडे गेले होते व समारंभाकरितां वेळेवर मोठ्या कष्टानें हजर झाले. तथापि दरबारास सुमारें ४०० लोक जमा झाले असून दरबार चांगला टुमदार झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. दरबारानिमित्त खर्चाकरितां उमरावती व अकोला या जिल्ह्यांस प्रत्येकीं हजार रुपये व इतरजिल्ह्यांस प्रत्येकीं ५०० रुपये या प्रमाणें मंजुरात आली होती हें सर्वांस ठाऊक असेलच. बुलढाणें जरी जिल्ह्याचें ठिकाण आहे तथापि साधारणत: हवा तो जिन्नस मिळण्याच्या संबधानें तें खेड्याहूनही खेडें आहे यामुळें दरबारानिमित्त मंजूर झालेली रकम तेथें थोड्या अवकाशांत खर्चता येईना. दरबाराच्या दिवशीं सुमारें २५ रुपये मात्र खर्च झाला. मे. डे. क. साहेबांनीं बाकी राहिलेली रकम आनंदोत्साहांत खर्च करण्याविषयीं सांगून त्यांच्या हाताखालचे व दुसरे नेटिव अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केली नंतर सदर्हू लोकांनीं हा पैसा कोणत्या रीतीनें खर्च करावा हें ठरविण्याकरितां एक सभा भरविली तींत असें ठरलें कीं प्रत्येक तालुक्यांतील दरबाराचे प्रसंगीं बोलाविलेल्या सर्व संभावित गृहस्थांस सरकारतर्फे पुन: बोलावणीं करून आणवावे व गायन भोजनादिकेंकरून मोठा उत्साह करावा ह्मणजे तेणेंकरून पैशाचा योग्य व्यय झाला असें होईल. असें ठरल्यानंतर मे. डे. कमिशनर यांच्या हुकूमावरून प्रत्येक तालुक्याच्या तहशिलदार मार्फत. तालुक्यांतील संभावित गृहस्थांस बोलावणीं झालीं व या प्रमाणें सुमारें ३०० लोक जमा झाले होते. उत्साह मोठा थाटाचा झाला याकरितां त्याची सविस्तर हकीकत दिली असतां वाचकांस अप्रिय होणार नाहीं अशी उमेद आहे. उत्साहप्रीत्यर्थ दिलेल्या सुमारें पावणे पांचशें रुपयां पैकीं १०० रुपये बुलढाणें एथील खास ख्रिस्ती ह्मणजे युरोपियन मंडळीस आनंदोत्साहाकरितां दिले तेव्हां अर्थांत हिंदु व मुसलमान यांच्या वाटणीस पावणे चारशें रुपये राहिले होते. सदर्हू ख्रिस्ती मंडळीचा आनंदोत्साह मे. डा. मेनासी सा. यांच्या बंगल्यांत झाला. त्या समयीं त्यांचा तेथें खाना व बाल हे मोठ्या थाटाचें झालें.

हिंदु व मुसलमान लोकांचा भोजन खेरीज करून सर्व समारंभ एकत्रच झाला. तिन्ही तालुक्यांतील प्रतिष्ठित लोक, सरकारी अधिकारी, शेट सावकार, पाटील, देशमुख, देशपांडे इत्यादि बहुतेक सर्व लोक आले होते. मलकापुर एथील ए. अ. क. व तहशिलदार तसेच चिखलीचे तहशिलदार हजर होते. मेहेकरचे तहशिलदार कांहीं कारणामुळें आले नव्हते. उत्साह जानेवारीचे १२।१३।१४ तारखांचे दिवशीं सुरू होता. १२ व्या तारखेच्या दिवशीं संक्रमणाचा सण होता तरी त्याच दिवशीं बुलढाण्यास हजर होण्याविषयींचे सरकारी हुकूम असल्यामुळें विचाऱ्या लहान मोठ्या सर्व लोकांस आपापलीं घरें सोडून जाणें जरूर पडलें यामुळें बहुतेक सर्व लोकांस अतिशय वाईट वाटलें होतें परंतु क्षणिक राहिलें, कारण समाजाच्या गडबडींत व ओळखीच्या व स्नेहाच्या मंडळीस भेटण्यांत तें विरून गेलें.

बुलढाणें हें गांव मंडळीचा मोठा समाज जमण्या लायक नाहीं. कारण प्रत्येक मनुष्यास अतिशय जरूरीच्या गोष्टी ज्या जागा आणि पाणी या तर बुलढाण्यांत अतिशय दुर्लभ हें सर्वांस ठाऊक आहे. याकरितां या दोन गोष्टींची जमलेल्या लोकांस मोठी ददात झाली. संक्रमणाच्या दिवशीं ज्यांस पोळ्या किंवा लाडूशीं गांठ पडायाची त्यांना त्या दिवशीं भाकरीची चांगली गांठ पडली किंवा नाहीं याचा संशय वाटतो; व पडली असें घेतलें तरी किती अवेळ झाली असेल हें सांगावयास नको. अस्तु. उत्साहांत मुख्य गोष्ट झटली तर गायन. बऱ्हाणपुराहून मुद्दाम सुमारें १२५–१५० च्या बोलीवर तीन नूतन वयस्क यांद्वनी नायकिणींचा ताफा आणविला होता व शिवाय बुलढाण्यास आलेली अशी एक नृत्यकर्ती नायकीण तेथें पूर्वींचीच होती. बऱ्हाणपुरच्या ताफ्याचें गाणें वगैरे समारंभाच्या दंग्यास पाहिजे असें होतें व त्यांणीं एकंदरींत बरीच मंडळीची रंजणूक केली. दुसऱ्या सांगितलेली नायकीण जातीची हिंदू असल्यामुळें मंडळीच्या प्राकृत रुचीचें उत्तम समाधान करी. परंतु आवाज फार कोमल असल्यामुळें अफाट जागेंत खुलत नसे. परंतु तिणें मंडळीची सेवा चांगली केली. केवळ बऱ्हाणपुरकरिणींच्या जोरावर अशी बहार झाली नसती असा फुस फुस ध्वनि सभास्थानीं ऐकूं येत असे. बाराव्या तारखेस रात्रीं सुमारें ४ वाजेपर्यंत गायन झालें. स्पर्धेची तजवीज कांहीं कारणांमुळें उत्तम प्रकारची ठेवली गेली नसल्यानें त्या रात्रीं लोकांस फार त्रास झाला. सराईची जागा स्वभावत: मोठी सुखकारक नसतेच. त्या दिवशीं लोक थंडीनें व वाऱ्यानें अतिशय कांकडून गेले. त्या रात्रीं अशी अवस्था झाल्यामुळें दुसऱ्या दिवशीं ह्मणजे ता० १३ रोजीं गायनाचा बेत दिवसास केला. गायन सुमारें २ वाजल्यापासून रात्रीचे ८ वाजेपर्यंत चाललें. पूर्व रात्रीपेक्षां त्या दिवसाची व्यवस्था बरी होती. त्या दिवशीं सायंकाळीं सुमारें ७॥ चे सुमारास आतषबाजी, व दारूकाम सुटलें. दारूकाम सर्व काय तें नळे व चंद्रज्योती. परंतु बरीच गम्मत झाली. त्याच दिवशीं संध्याकाळीं गाण्याची वगैरे मौज पहाण्याकरितां मे० डा. मेनासी व मे० कालिन्स साहेब हे उभयतां आपल्या खटल्यानिशीं रंगस्थानीं आले होते. एकंदर चार लहान मोठ्या "लेड्या" होत्या व सदरील दोन साहेब व आणखी एक मिळून तीन साहेब होते. ही मंडळी होती तेथपर्यंत एक तऱ्हेचीच गंमत चालली होती. तीं अशी नृत्य करणाऱ्या कलावंतिणी हाव भाव करते समयीं वांकडे तिकडे हात करूं लागल्या, गिरकी मारते वेळेस त्यांचा झगा चा झोक पसरट होऊन पुन: आकुंचित झाला; तसेंच आलाप घेते वेळेस त्या 'अ् अ् अ् ' इत्यादि कंपयुक्त स्वर काढूं लागल्या ह्मणजे त्या बिच्याऱ्या गम्मत पहाण्यास आलेल्या ख्रिस्ती तरुण स्त्रिया तोंडाला वेळे लावून पोटें धरून धरून हसत असत. त्या वेड्यासारख्या हसूं लागल्या ह्मणजे इकडे साधारण मंडळींत खो पिकत असे. मिळून यांच्या मूर्खपणाला ते व त्यांच्याला हे असें हंसून तीच कांहीं वेळपर्यंत एक गंमत झाली होती. या दिवशीं रात्रीं पुन: आणखी गाणें झालें परंतु त्या वेळीं सर्व धेंड मंडळी गैरहजर होती. अस्तु. ता. १४ रविवार रोजीं ह्मणजे अखेरच्या दिवशीं टोलेजंग भोजन समारंभ झाला. पाण्याच्या व जागेच्या गैरसोयीमुळें याची तर फारच पंचाईत झाली असती परंतु व्यवस्थापकांनीं चांगली तजवीज केली होती. बुलढाण्याच्या पश्चिमेस सुमारें एक कोसावर एक लहानसें खेडें आहे त्या जवळ तेथें एक फार उत्तम अमराई असून ओढ्याचें पाणीही फार जवळ आहे तेथें भोजन समारंभ झाला. तो देखावा केवळ वनभोजनाचाच होता. अमराईत बैठकीची उत्तम व्यवस्था करून तिला मोठी शोभा आणली होती, अथवा असें ह्मणा कीं अमराईच्या योगानें बैठक शोभ

त होती. सर्व जातींचे लोक भोजनास बसले होते. इकडे ब्राह्मणांच्या पंक्ति, तिकडे क्षत्रियांची पंगत पलीकडच्या अंगाला शुद्रांची असा पंक्तींचा थाट लागून गेला होता. भोजनाची व्यवस्था अशा मोठ्या समारंभांत जशी असावी तशी होती. कायम यजमानीन इंग्लंडांत व भोजन बुलढाण्यांत. भोजनोत्तर आमराईत तास दीड तास सुमारें गायन झालें तें त्या ठिकाणीं फारच शोभलें. नंतर पान सुपारी तुरे, अत्तर, सर्व मंडळीस वाटल्यावर समारंभ समाप्त झाला. व सर्व लोक सुमारें ४ वाजण्याचे सुमारास आपापल्या गावीं जाण्यास निघाले. एकंदरींत बाहेरच्या लोकांस जरी कांहीं बहुत अडचणी झाल्या असल्या तरी बुलढाण्यांतील लोकांस ते तीन दिवस मौजेचे झाले यांत संशय नाहीं. कळावें.

एक पत्र वाचणारा

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. आपण सर्वांची शंका निवारण करता त्यावरून लिहिणें भाग पडलें तरी खुलासा व्हावा.

वेंडर लोकांपाशीं स्टांप कागद विकण्याकरितां खुद्द रेसिडेन्ट साहेबांचे हुजुरातून नमुना असून त्याचे दुसरें सदरांत स्टांपाचें वर्णन अशीं अक्षरें आहेत, कोणी वेंडर लोक स्टांपाचें वर्णन ह्मणजे अमुक कारणाकरितां जसें रोखा, खरीदखत, गहाणखत. कांहीं लोक हैदराबाद, जुडिशाल असें लिहितात.

आतां या दोहोंपैकीं खरें कोणतें व खोटें कोणतें हें समजणें हें अवश्य आहे. करितां आपणास तसदी दिली आहे. आपण आपले पत्रीं ह्याचें स्पष्टीकरण द्याल तर उपकार होतील. हे विनंति.

तारीख २ फेब्रुवारी सन१८७७इसवी.

एक गरजवंत.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. खालील मजकुरास आपल्या सुंदर पत्रीं येत्या अंकीं जागा मिळेल अशी आशा आहे.

तारीख १ फेब्रुवारी सन १८७७ इसवी रोजीं मोर्शी एथील तहशिलदार रा. रा. गोविंदराज मुदलियार यांस सर्टिफिकिट देण्याबद्दल व त्याप्रमाणें दुसरे महत्वाचे कामासाठीं एक बडा दरबार एथें तहशिल कचेरींत झाला तो असा:—

सा सभेस येण्याकरितां तालुक्यांतील संभावित गृहस्थ, पाटील, पटवारी यांस बोलाविलें व त्याचप्रमाणें एथील लहान थोरास बोलाविल्यावरून एकंदर पांच शें लोक जमले त्यांना बसण्यासाठीं व कचेरीस शोभा येण्यासाठीं मधील हालमध्यें एक सिंव्हासन केलें होतें. दुतर्फा खुर्च्या व बांकें होतीं. तसेंच दालनांतून फार सुंदर बैठक केली होती. चौकांत सलामी करितां कान्स्टेबल्स, जागले व कचेरीचे शिपाई कमर लावून उभे होते. व तहशिलदार आणि नायबतहशिलदार यांणीं आलेले लोकांस व्यवस्थेशीर बसविलें. लागलेंच एक वाजतां आमचे लोकप्रिय नबाब शाबूदीन साहेब खान बहादूर असिस्टंट कमिशनर हे सर्व लोकांचे सलाम घेत घेत सिंव्हासनावर येऊन बसले. ह्या समारंभ पाहून बाबा साहेबांस मोठा आनंद झाला. व याप्रमाणें वारंवार एथें समारंभ होईल तर आह्मास मोठा आनंद होईल असें उभे राहून बोलले. नंतर नबाब साहेब यांणीं असें कळविलें कीं आजचा हा समारंभ एथील तहशिलदार साहेबांस सर्टिफिकिट देण्याकरितां केला आहे असें बोलल्यावर नबाब साहेबांचे आज्ञेवरून एथील इंग्लिश मराठी स्कूलचे मास्तर यांणीं नबाब सा. चे आणि तहशिलदार यांचे स्तुतिपर एक सुंदर निबंध वाचला. त्या नंतर न. सा. उठून तहशिलदार सा. स बोलले कीं, आपण सरकारचें काम फार नेकीनें व हुशारीनें केलें. त्यावरून कमिशनर सा. बहादुर यांणीं आपणास सर्टिफिकिट मिळावें अशी पूर्वीं शिफारस केल्यावरून चक्रवर्तिनी साहेबांचे वतीनें व न व्हाइसराय सा. चे हुकुमानें रेसिडेंट सा. नीं सही केलेलें उत्तम कागदावर सोनेरी शाईनें छापलेलें सर्टिफिकिट आपल्यास देण्याकरितां मे० डिपुटी कमिशनर साहेब बहादुर यांणीं आमचे इकडेस पाठविलें आहे. हें सर्टिफिकीट आपल्यास उमरावती एथें रेसिडेंट साहेब बहादुर यांचा दरबार झाला त्या वेळेस मिळावयाचें होतें पण रेसिडेंट साहेब बहादुर उमरावतीस येतांच दुसरे दिवशीं सकाळींच दरबार झाला त्या दरबारांत आपल्यास बोलवावयास आपला हा तालुका लांब पडल्यामुळें सवड फावली नाहीं. सबब तें सर्टिफिकीट आतां आपल्यास देतों असें बोलून मोठे आनंदानें तहशिलदार यांस दिलें. तहशिलदार साहेब यांणीं तें सर्टिफिकिट महत् आनंदानें घेऊन थोडक्यांत संभाषण करून नबाब सा. यांचें आणि सर्व वरील अधिकारी यांचे फारच फार आभार मानिले. हें झाल्यानंतर अत्तर, हार, तुरे, पुष्पें तहशिलदारांनीं सर्वांस दिलीं. पान सुपारी झाल्यावर न. सा. उभे राहून पोलिसपट्टी अगदीं कमी झाली आहे यास्तव एथील इस्पितळासाठीं त्यांतून पैसा देण्यास सवड नाहीं यासाठीं इतर तालुक्याचे लोकांनीं ज्या ज्या प्रमाणें आपापलीं उदार मनें करून दिलेल्या रकमे इतकीं तरी रकम झाल्यास एथें सर्व शेट सावकार व वकील यांचे आभारी होऊं असें बोलल्या बरोबर तहशि० यांणींही या बाबतींत कांहीं संभाषण केल्यावर सर्व लोकांनीं आपापले ताकदीप्रमाणें आकडे घातले. पुनः नबाब साहेबांनीं व सर्व लोकांनीं इस्पितळास मदत केल्याबद्दल आभार मानिले व सभा विर्जन झाली.

एकंदर आजचा हा समारंभ पाहून सर्व मंडळीस फार आनंद झाला. असा समारंभ पूर्वीं या गावांत कधीं झाला नाहीं असें ह्मणतात. सभेचे व्यवस्थेचें काम एथील ना. तहशि. एकनाथ त्रिंबक यांजकडे होतें त्यांनीं फार चांगले रीतीनें व्यवस्था ठेविली होती.

दवाखान्याप्रीत्यर्थ दरसालास देण्याची वर्गणी ५९० रुपयांवर झाली आहे आणखी इतकेच रकमेस वर्गणीदार होतील अशी आशा आहे.

मे. थामसन सा. एथें रजेवर येऊन ६।७ दिवस झाले २ दिवसांचे पूर्वीं एके दिवशीं थोडे अवसरांत २ वाघ एथून ३।४ मैलाचे अंतरावर मारिले. ते अद्याप सिकारीहून परत आले नाहींत. पोष्टाकडील चीफ इन्स्पेक्टर गिरदावारीवर आले आहेत आतां एथून कोणीकडे जाणार हें समजलें नाहीं.

मे. नबाब सा. बहादुर यांची स्वारी या तालुक्यांतच गिरदावारीस आहे. नबाब साहेबांचा स्वभाव, लोकांचा आदर सत्कार आणि कामाची शैली पाहून सर्व लोकांस फार आनंद होत आहे. हे या तालुक्याचे काम पाहू लागले त्या दिवसापासून रयतेस फार आनंद वाटून राहिला आहे.

मे. डि. क. सा. बहादुर यांची स्वारी १।२ दिवसांत एथें येणार आहे. दक्षिण देशांत दुष्काळ पडला आहे त्या प्रीत्यर्थ कांहीं वर्गणी जमा करून पाठवावी असा आमचे तहशिलदार आणि हेडमास्तर यांचा हेतु आहे व याकरितां लवकरच सभा भरविणार आहेत. सभा भरविल्यानंतर त्याबद्दल मागाहून हकिकत कळविण्यांत येईल. पत्र विस्तार होतो सबब आतां पुरें करितों लोभ असावा ही विनंती कळावेंता.

८ फेब्रुवारी सन १८७७ इसवी.

एक
फिरस्ता

---

# वऱ्हाडसमाचार

मिति माघ वद्य १३ शके १७९८

---

## वऱ्हाडांतील पाटील कुळकर्णी यांचें वतन

आपल्या हिंदुस्थानांत वतनदारीचें किती महत्व आहे हें सांगावयास नको आहे. वतनदारीसाठीं कित्येक लोक आपल्या धर्मास, आपल्या देशास किंबहुना आपल्या देहास मुकले आहेत अशीं उदाहरणें हजारो सांपडतील. व्यवहारामध्यें चिरकाल आणि भिक्षाळजीनें कुटुंब पोषणाचे जे उपाय त्यांतील वतनदारी हा एक मुख्य उपाय आहे अशी आपल्या लोकांची समज हा कालपर्यंत आहे. मागील राज्यांत वतनदारीसाठीं लोक अनियमित द्रव्य खर्च करून थोडी बहुत तरी वृत्ती संपादन करीत व पुष्कळ जुन्याकाळापासून एकंदरींत राहाटी पाहिली असतांही असें दिसून येतें कीं, ज्याचे कुटुंबांत कोणतीही वृत्ती नाहीं तो उपरी खुंटीवरचा कावळा असे लोक त्याजला समजत आले आहेत. पूर्वींची व हल्लीची राज्यरीति आगदीं भिन्न आहे व जितकी वतनदार लोकांची पूर्वींच्या राज्य रीतींत गरज असे तितकी हल्लींच्या काळांत नाहीं. पूर्वीं सरकारास वतनदार लोकांपासून मदत असे व वतनदार नसल्यास राज्यकर्त्यांस पुष्कळप्रकारें आडचणी येत असत ती समज हल्लीं नाहींशी होऊन वतनदारास "आजागलस्थनवत्" असें मानतात व त्या मानानें त्यांचें महत्व ही हल्लींच्या काळांत फारसें पाळीत नाहींत. व कांहीं अंशीं विच्यार केला असतां वास्तविकच पूर्वींच्या इतकी आज वतनदार लोकांची राज्यकर्त्यांस गरज नाहीं कारण पूर्वीं प्रमाणें हल्लींची व्यवस्था नसून रयतेचीं मनें स्वस्थ राखण्याचे कामीं, सरकारचा पैसा वेळच्या वेळीं वसूल करण्याचे कामीं, हल्लींचें सरकारानीं दुसरे चांगले उपाय योजून ह्या लोकांचे स्वाधीन पूर्वीं प्रमाणें अडाणें प्रजत दिलीं नाहींत. तेव्हां अर्थांत ह्या लोकांची ह्मणण्यासारखी गरज राहिली नाहीं.

परंतु हा जो साधारण सर्व वतनदार लोकांविषयीं ग्रह झाला आहे तो आपच्या मतें गावचे पाटील कुळकर्णी यांविषयीं नसावा. त्यांचा वाडवडिलार्जित व वेळोवेळीं मोठमोठालीं बहादुरीचीं कामें करून, आज वर्णन करतां येत नाहीं अशीं कष्टें भोगून आपल्या वृत्ती संपादन केल्या असतील हें एका बाजूस असो परंतु हल्लींच्या काळांत हे कामगार जितक्या स्वस्तदरानें नोकरी करिताहेत इतक्या स्वल्प खर्चानें ह्या लोकांचें काम दुसऱ्यापासून करवूं ह्मटलें तर घडावयाचें नाहीं. एखादे गावास पाटलास व कुणकर्ण्यास १०।५ रुपयेपर्यंतच वर्षाचें उत्पन्न असतें परतु बारामहिने बापडा कामाच्या बोजानें व वरिष्ठ कामगारांचीं आर्जवें करून दमून जात असतो. वास्तवीक त्याचे कुटुंबाचें पोषणास लागणारे पैसे; त्याची मेहनत आणि त्याजला सरकारांतून होणारें उत्पन्न हें पाहिलें ह्मणजे दर्या उत्पन्न होती !!! हे लोक इतकेही श्रमाची नोकरी पोटभर वेतन न मागतां करतात याचें कारण आमचें मतें दुसरें कांहीं नाहीं. फक्त वतनदारी ही चिरकाल जीविकेची सोय आहे असें ते लोक समजतात. व वतनदारी असणें हें एक प्रकारचें भूषण आहे असें ते मानतात इतकेंच नव्हे अशा श्रमाच्या व तोट्याच्या धंद्यांत ही कोणी हात घालूं पाहील किंवा मानहानी करूं पाहील तर आपलें जीवित्व त्यांकरितां वेचतील परंतु वतनदारी आपल्या घरांतून जाऊं देणार नाहींत. असें हे लोक निग्रही पहा[illegible] येतात.

ह्या लोकांस हल्लींचे राज्यांत नोकरी प्रमाणें समजतात परंतु नोकरांत आणि यांच्यांत फरक इतकाच कीं, हे वंशपरंपरेचे नोकर व बाकीचे तसे नव्हेत. वंशपरंपरेचे नोकर ह्मणून यांच्या पासून नोकरी कशी घ्यावी व यांच्या घराण्यांतील सर्वांस वृत्तीचा उपभोग कसा मिळावा ह्याबाबतींत देशादेशांत नियम आहेत त्याप्रमाणें आमच्या वऱ्हाडांतही पाटील कुळकर्णी यांविषयीं नियम आहेत. परंतु आह्मास चांगल्या आधारावरून कळतें कीं, ह्या प्रांतांत पाटील कुळकर्णी यांच्या वृत्तीचे संबंधानें राज्यकर्त्यांचें पहाणें समदृष्टीचें असावें तसें नाहीं. कित्येक ठिकाणीं तर देशांतील एकाचा अतिशय फायदा व दुसऱ्याचें अतिशय नुकसान होण्या जोगी व्यवस्था आहे;

सर्वत्र सारखा एक नियम ह्या प्रांतांत चालू नाहीं यामुळें ह्या लोकांत जितकी शांतता असावी तितकी नसून भाऊबंदीचे तंटे नेहमी सरकारांत चालल्यामुळें ह्या लोकांचे द्रव्याचा आणि अधिकारी लोकांचे वेळेचा व्यर्थ खर्च होतो आणि जागोजागीं नवीन तऱ्हेचा निकाल होतो त्यामुळें धरबंध मुळींच रहात नाहीं आणि तंटे कमी होत नाहींत. यास्तव जर ह्या लोकांनीं एक विच्यार करून व सर्वांनीं मिळून आपलें गाऱ्हाणें वरिष्ठ अधिकारी यांचे कानावर नेलें तर आमची खात्री आहे कीं ह्या लोकांविषयीं सर्वत्र सारखा नियम ठरून त्याप्रमाणें सर्व ठिकाणीं व्यवस्था होईल, देशांत कुरकुर रहाणार नाहीं. आणि मुलकी अधिकारी लोकांचें काम विनाकारण वाढणार नाहीं.

पाटील कुळकर्ण्यांचे बाबदींत इकडेस नियम कसे आहेत, त्याजवरून वहिवाट कशी चालली आहे; आणि पुढें ह्या लोकांचे तंटे नाहींसे होण्यास कसे नियम झाले पाहिजेत याजविषयीं आह्मी आपलें मत पुढें सवडीप्रमाणें देऊं. परंतु ह्या लोकांनीं खटपट करणें जरूर आहे.

## दुष्काळग्रस्त लोकांचें आतां काय होणार?

मद्रास इलाख्यांत ८४७०८ मैलप्रांतांत १८९३२५१० लोकांत २७२४६२४५ रुपये वसूलाचे मुलखांत दुष्काळ आहे. तिकडे आरंभलेल्या सार्वजनिक कामावर मनुष्यें ११२५११७ नेहेमीं असून धर्मार्थ ११९३६३ मनुष्यांस पोसावें लागतें. या कामास आजवर ५५६९०५९ रुपये रिलिफकडे खर्च होऊन गेले व सप्तंबरपावेतों अजून ३४१०५८९७ रु. लागतील व जमीन साऱ्याची रकम ११७००००० वसूल होणार नाहीं व शिवाय इस्टाब्लिशमेन्टाचा खर्च मिळून साडे चार कोटीचे घरांत जाईल.

मुंबई इलाख्यांत २८७००० मनुष्यें कामावर असून आजपर्यंत १८ लक्ष रुपये त्या प्रीत्यर्थ खर्च होऊन गेला. शेतसाऱ्याचा वसूल ६६ लक्ष रुपये यावयाचा तो अजीकमी झाला. व पुढें सप्तंबरपर्यंत त्या दुस्काळग्रस्तांस पोसावयाचें तर तोंपर्यंत अजून १ कोटि ४० लक्ष रुपये पाहिजेत. एकंदर २ कोटि ६ लक्ष रुपये फक्त मुंबई सरकारास नुकसान येणार.

आतां आरंभापासून दुष्काळाविषयीं मद्रास सरकारांनीं फार काळजी घेतली. लाखो रुपयांचें सांक्षन दिलें, व्यापारी लोकांचे विसंस्थुखचऱ्अस्लेले [illegible] प्रांतांत धान्य नादेशाच, आहे याहून ६३० हजार टन जर झालें तर तें अशेदी करून आणिनें होईल याविषयीं त्यांस रक्षण केलें. पण ह्मणजे कोणास भ्रांती रहाारास पसंत पड

गणपतरावजी यांनीं समजावयाचें! व दिल्लीस जाण्याचें कारणन्न टापटीप ठेणाले कीं, पुणें सार्वजानि मु ठेविली नाण नें पुण्यास एक मोर्ट्ही. परंतु आतां हें आपले राणी सरकार कोर्ट फार कृती मनुष्यें कामावर आहेत, कोठें काय चाललें आहे या कामाची वेळच्यावेळीं वर्तमानपत्रांतून वगैरे प्रसिद्धी मुंबई सरकाराप्रमाणें मद्रास सरकाराकडे झाली नाहीं तरी त्यांनीं काळजी पुष्कळपट घेऊन भयंकर प्राणहानी होऊं दिली नाहीं याकडे हिंदुस्थानसरकारचें लक्ष कां गेलें नाहीं न जाणो! गेले महिन्यांत दुष्काळानें व्यापलेल्या मुलखांत सररिचर्ड टेंपल साहेब यांची स्पेशियल कमिशनर ह्मणून हिंदुस्थानसरकार यानीं नेमणूक केली व त्याप्रमाणें ते तिकडे तावडतोब निघून गेले हें मागें आह्मी कळविलेंच आहे त्यावरून सर्वांस मोठी उमेद होती, पण त्यापासून कांहीं विशेष प्रकार न होतां जे तन मन धनें वेचून अनाथाचे, दुर्बळाचे व ताऱ्याबालकांचें संरक्षण करणारे असे ड्यूक आफ बकिंगहाम यांस टपका, सोलापुरचे दामाजी [ ग्रांट साहेब कलेक्टर] यांची बदली असे प्रकार सुरू झाले. आह्मा आनाथाचे जीवन असे जे परोपकारी गृहस्थ याची हजारो लोकांचे सहीचे अर्जावरूनही बदली रहित केली नाहीं तेव्हां पुढें त्या दुष्काळग्रस्थ लोकांचें काय होणार समजत नाहीं. अजून तरी हिंदुस्थानसरकार व त्यांचे स्पेशियल कमिशनर यांचे मनास क्षुल्लक खर्चाची सबब न जुमानतां अगाल्य जीवांचें रक्षणार्थ ईश्वर प्रेरणा करो व सर्व सुव्रत्ता होवो. कारण सरकारावाचून प्रजेचें दुसरें कोणी मायबाप नाहीं. सर्वस्वी प्रजेचा सांभाळ करणार सरकारच कांहीं अंशी समर्थ होणार व तेच जर खर्चाच्याभीतीनें कांकूं करून कानावर हात ठेवणार तर निश्चयेकरून लक्षावधि प्राण्यांचा नाश होणार यांत संशय नाहीं. करितां तसें होऊं न देतां प्रजापालनाविषयीं सर्व शक्तीमान परमेश्वर आमच्या दयाळु सरकारास हिंम्मत व बुद्धि देवो. व अनर्थाचें निरसन करो अशी त्यास प्रार्थना आहे.

## वऱ्हाड

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं गेले आठवड्यांत बातमी होती त्याप्रमाणें रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांस नाशकास जाइंट जज्ज नेमिल्याविषयीं मुंबई सरकारचे ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे. आतां या आठवड्यांत ते तेथें येतील त्या जागेचा पगार १८०० रुपये आहे. पण यांनां कांहीं कमी देणार असें ह्मणतात. गोपाळरावांच्या निवडणुकीच्या संबंधानें एक दोन वर्तमानपत्रांनीं थोडें गुळगुळीत लिहिलें आहे व इं. प्र. नें त्यांना फौजदारी कामाची माहिती नाहीं असें लिहिलें परंतु आमचें मत आहे कीं यांची निवडणूक फार उत्तम झाली व पूर्वीं हे असिस्टंट सेशन जज्ज अहमदनगरास होते तेव्हां यांनीं फौजदारी कामही उत्तप केलें आहे व हल्लीचेंही काम ते असेंच उत्तम प्रकारें करतील असा आह्मास भरवसा आहे.

पुण्याच्या सार्वजनिक सभेचे प्रसिद्ध पुढारी रा. रा. गणेश वासुदेव जोशी दिल्लीहून परत जातां जातां काल रोजीं एथें आले. त्यांच्या सन्मानार्थ आज दोनप्रहरीं टौउनहालांत सभा आहे.

विद्वानांची निराशा— वऱ्हाडांत सरकारानें लाखो रुपये खर्चून जें विद्याखातें स्थापन केलें त्याचें पाहिलें फलही सरकार संतोषानें ग्रहण करीत नाहीं असें ऐकल्यावरून मोठी दिलगिरी वाटते. वऱ्हाडांतील पगारी विद्यार्थांमध्यें शिकून याच वर्षीं बी. ए.चे परिक्षेत पास झालेले पहिले गृहस्थ रा. रा. हरी रामचंद्र रोहणखेडकर हे नोकरीच्या उद्देशें कालेजांतून इकडे आले व इकडील वरिष्ठ अधिकाऱ्यांस भेटले पण त्यांनां मोठी एकादी नोकरी देण्याविषयीं त्यांची इच्छा दिसली नाहीं. मुख्य कमिशनर साहेबांनीं त्यांस अशा अर्थाचा जबाब दिला कीं तुह्मास नोकरी देणें आमच्या हातीं नाहीं. आतां तहशिलदारी करितां रेसिडेंट साहेबांकडे शिफारस करणें आमच्या स्वाधीन आहे परंतु तुह्मा सारख्या अननुभविक गृहस्थास अशी जागा देण्याविषयीं आमच्यानें शिफारस करवत नाहीं. तुह्मी माहितगार होण्याकारितां जिल्ह्यांतून अधिकाऱ्यांकडे जावें.

हा जबाब ऐकून कोणास वाईट वाटणार नाहीं? व पुढें होणाऱ्या नवीन विद्वानांची कशी निराशा होणार नाहीं? आह्मी इच्छितों कीं मे. क. सा. या गृहस्थास व पुढें वऱ्हाडच्या खर्चानें तयार होणारे विद्वानांस सन्माननीय जागा देवविण्याविषयीं कांहीं कायमची तजवीज करून ठेवतील.

रा. रा. भास्कर महेश्वर लेले येथील तहशिलदार यांणीं तीन महिन्यांची रजा देशी जाण्याकरितां घेतली होती त्याप्रमाणें ते गेल्या गुरूवारी आपले कामाचा चार्ज एथील नायब तहशिलदार रा. रा. राघव यादव यांस देऊन निघून गेले यांचे जागेवर मे० बाकरअली उमरावतीचे आनररी माजिस्त्रेट आज उद्या येणार आहे.

गेले महिन्याचे २०वे तारखेचे सुमारास एथून तीन कोशावर अकोली ह्मणून खेडे आहे तेथें घरफोडी होऊन ३००० रुपयांचा ऐवज चोरीस गेला होता. त्याचा तपास पोलिस करित असतां ३ पारधी व १ परीट असे चौघे आरोपी धरले. त्यांतून एकानें सुगावा सांगितला व दुसऱ्याने मुद्देमाल सर्व दाखवून दिला येकंदर सर्व ऐवज मिळाला. याची चवकशी येथील तहलदार यांचेसमोर होऊन त्यांनीं २ आरोपी सोडले व २ सेशन कमीट केले. त्यांस डिपुटी कमिशनर साहेबानीं २ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा दिली.

तुरुंगाची पांचवी फेरी— डोंग्या य नावाचा एथील लिंगाईत वाणी हा मागे दोन चार वेळ तुरुंगांत गेलेला आहे. यानेंच एथील गंजांतील प्रसिद्ध साधु शिवचरण बवा यांची बनात चोरून नेलेली होती व तो कैदेंत होता. तो राणी साहेब चक्रवर्तिणी झाल्या निमित्त जो आनंदोत्सव झाला त्यांत सुटला. परंतु ही स्थिति त्याला न मानवून त्यानें गेल्या रविवारीं आठवडे बाजारांतून मिठाचें पोतें चोरलें तें पोलिसानें पकडून तहशिलदार यांचे समोर खटला चालून त्या डोंग्यास ६ माहिन्याची सक्त मजूरीची कैद, ७५ फटके व १० रुपये दंड अशी शिक्षा झाली. असें कळतें.

खामगावास रात्री जाण्याचे सोयीकारितां जलमपासून पुन्हा ता० ७ फे० पासून लारिस जाणें येणें सुरू झालें.

रा. रा. श्रीराम भिकाजी इजुकेशनल इन्स्पेक्टर अकोटाकडे गेले.

मोर्शीचे तहशिलदार रा. रा. गोविंदराज अप्पा यांस रेसिडेंट साहेबांकडील सर्टिफिकिट देण्याकरितां तालुका आफिसरकडून मोर्शीस दरबार भरवून गोविंदराव यांचा मान केला हें ऐकून आह्मास फार संतोष वाटतो. या संबधानें आजचे अंकांत एक पत्रही आहे.

डा० अप्पा कानू यांच्या बहुत वर्षांच्या लोकसेवेच्या उत्तमतेकरितां त्यांनां रेसिडेंट साहेबाकडून सर्टिफिकिट मिळणें अवश्य होतें असें मद्रासच्या ऊनकोव्हेनेंटेड ग्याझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे. आमचेंही मत तसेंच आहे. व त्याकरितां कांहीं तजवीजही चालू आहे असें ऐकतों.


## जाहिरात.

### गोपिचंदनाटक हिंदुस्थानी भाषामे.

ये नाटककी पेहली अवृत्ति सब खलास होगई अभि लोगोकों मिलतीनही यही खातर इस नाटकका बनानेवालेनें नाटकमे सुधारके हामकों दुसरी अवृत्ति निकालनेकी परवानगी दियाहै. इसवास्ते हम सब लोगोको बिनोती करतेहै के पेहले ये नाटक सिला जंत्रपर छपायाथा अभि हम अपने छपाखानेमे ठसे छपेपर छपानेकी सुरवात कियाहै अंदर परवेस परवेस पर तसबिरों सुंदर डाराहै. यहीतुक छपाकर आवते मार्चमे तयार भयेगा इसवास्ते उसकी आवल देनेकी किंमत ८८ रखीहै, फेब्रेवारी अखेर तक आगली किंमत देना; अगे किंमत ८१२ पडेगी. अवल देनेवालेनें हमारें छपाखानेमे किंमत भेजदेना इतनी बिनोतीहै तारीख ३ फेब्रेवारी सन १८७७ इसवी.

भाऊ गोविंद सापकर,

ज्ञानचक्षूके मालिक.


## वर्तमानसार

या आठवड्यांत मुंबईस वकिलीची परिक्षा झाली. निकाल अजून समजला नाहीं.

सोलापुरचे कलेक्टर मि० ग्रांट साहेब यांची तूर्त बदली करूं नये ह्मणून तेथील दाहा पंधरा हजार रयतेनें अर्ज केला असतां सरकारानें त्याकडे कान न देतां ग्रांट साहेबास तेथून उचललें व त्याप्रमाणें ते मुंबईस येऊन आपले नवे कामावर हजूर झाले. दुष्काळग्रस्ताचें दुर्दैव सरकारापुढें आडवें पडलें असावें असें वाटतें!

सरकारच्या नवीन ठरावाच्या काटकसरीनें मद्रास इलाख्यांतील तूर्तच एक लाख मजूर कामावरून काढून टाकिले.

दिल्लीमध्यें समारंभाकारितां जमविलेल्या सामानाचा लिलाव चालू आहे. २५ रुपयांची सुंदर खुर्ची २॥ रुपयास जात आहे.

रशियाचे प्रधान जनरल इमातिफ ग्रीस देशांत गेले आहेत. त्या बाजूनेंही टर्की विरुद्ध कांहीं गडबड सुरू करावी असा त्याचा बेत असेल कीं काय? अशी लोक शंका घेतात.

गेल्या आठवड्यांत बंगाल्याकडून मद्रासेकडे तांदळाचीं पोतीं सुमार सवातीन लक्ष गेलीं.

रा. सा. काशिनाथ महादेव थत्ते नाशिकचे मामलेदार यांचे मुलाची मुंज झाली. ते समयीं सर्व ब्राह्मणवृंदाची त्यांच्या एथें मोठी पंगत झाली.

साताऱ्यास शेणवी ज्ञातीच्या सकेशा विधवांचें २ महिन्यांत वपन करावें असें त्यांतील कांहीं मंडळीनीं ठरविलें.

कोल्हापुर, बेळगाव इकडे महामारीचा उपद्रव सुरू झाला आहे ही मोठी दुःखाची गोष्ट होय.

बांबे रेविन्यू जुरिस्डिक्शन आक्टाविषयीं स्टेट सेक्रेटरी यांजकडून हिंदुस्थान सरकारास पत्र सुमारें तीन महिन्यांपूर्वीं आलें; परंतु तें अद्यापि प्रसिद्ध झालें नाहीं. त्यांत त्यांनीं कायदा सर्वस्वीं नापास केला नाहीं; परंतु सरकाराविरुद्ध जमीनीच्या बाबदींत दिवाणी कोर्टांनीं फिर्याद न घेण्याविषयींच्या कलमा विषयीं सरकानें पुनः नीट विचार करावा ह्मणून सुचविलें आहे. शिवाय मुंबई सरकार व सर्व लोक विरुद्ध असतां असा कायदा करावयाचा मव्हता ह्मणून लिहिलें आहे असें ह्मणतात.

इं. प्र.

---

## क्रोध आणि क्षमा

मनुष्याच्या ठायीं जे अनेक मनोविकार आहेत त्यांमध्यें क्रोध हा एक ह्मटला ह्मणजे फार क्षुल्लक आहे. ह्याचा त्याग करण्यांत मोठेंसें नुकसान कांहीं नाहीं; उलटा लाभच होणार आहे. असें असून याचा खरोखर त्याग केला असा थोड्यांनींच. पुष्कळ लोक मोठमोठ्या लाभाचा व सुखाचा परित्याग करितात, तरी याचा त्याग त्यांजकडून होत नाहीं. वैरागी व योगी घरदार, प्रपंचसुख वगैरे सर्वस्वाचा त्याग करितात, परंतु क्रोध सुटला असें त्यांतून किती थोडक्यांत होतें! फार तर काय, पण देवांनीं देखील क्रोधाच्या स्वाधीनें होऊन अनन्वित कर्मे केल्याच्या पुराणांतरीं कथा आहेत. आमचे पुरातन तपोनिधि ऋषि, जे ज्ञान, नीति, धर्म, भक्ति यांच्या केवळ मूर्तिच असत त्यांस सुद्धां अनिवार क्रोध येत असे. ते रागाच्या आवेशानें पुरुषांचें आणि स्त्रियांचें जाळून भस्म करीत असत! काय चमत्कार कीं ज्यांणीं सर्व ऐहिकाचा त्याग करून आपलें अयुष्य केवळ परमार्थसाधनीं वेंचिलें त्यांसही क्रोध जिकण्यास इत[illegible] अवघड पडावें! प्राचीन ऋषींचा प्रकार असा त्यांपेक्षां त्यांचे हल्लींचे वंशज, जे सर्वथैव प्रपंचाच्या व स्वार्थ साधनाच्या खटाटोपींत सर्वकाळ निमग्न असणारे हल्लींचे ब्राह्मण त्यांची गोष्ट, तर विच्यारावयासच नको.

बरें हा प्रकार आमच्या लोकांचा झाला. आज सुधारणुकीच्या शिखरास जाऊन पोंचलेले असे जे युरोपियन व ख्रिस्ती लोक त्यांजकडेस दृष्टि फेकिली असतां असाच प्रकार आढळतो. हे लोक सर्व मनुष्यें बंधुजन आहेत, एकाच पित्याचीं लेकरें आहेत ह्मणून उपदेश करितात. येशू ख्रिस्ताच्या धर्माच्या प्रसारासाठीं कोट्यावधि रुपये खर्चून रात्रंदिवस श्रम करीत आहेत असें असून एका गालावर मारलें असतां दुसरा गाल पुढें करावा, अगणित वेळीं शत्रूस क्षमा करावी, वगैरे आज्ञा करणाऱ्या गुरूचे शिष्य जरी पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांस अजिंक्य झाल तरी ह्या क्षुल्लकशा रिपूस जिंकण्यास किती असमर्थ आहेत हें आपण प्रत्यही पहात आहों. कोट्यावधि मिथ्या व कोपिष्ट देवतांच्या उपासना करणाऱ्या लोकांपेक्षांही हे लोक क्रोधाचे दास अधिक आहेत असें आढळतें! राज्यप्रकर्णीं तच नव्हे तर व्यक्ति व्यक्तीच्या संबंधानें सुद्धां क्षुल्लक निमित्तावरून परस्पर बंधूचें नातें, एका परमेश्वराचें पितृत्व आणि सद्गुरु येशूचा बोध कित्ता हीं सर्व विसरून एकमेकांची मान मुरगळण्यास व संहार करण्यास हे कसे तयार असतात!

हे सर्व प्रकार मनुष्यांचें मूढत्व, दुर्बलत्व आणि दुष्ट स्वभाव यांची साक्ष देतात. मनुष्याचे दुष्ट स्वभाव जिंकणें हेंच ज्याचें मुख्य कार्य असा जो धर्म त्याच्या नावानें क्रोधास उत्तेजन व युद्धास आणि मनुष्य वधास भर पडत असते! याजकरितां क्रोध आदिकरून वृत्ति जिंकणें हेंच धर्माचें उत्तम लक्षण समजावें यांस जिंकून पूर्तता झाली ह्मणून कोणी स्वस्थ बसूं नये. हे रिपू केव्हां डोकें वर करतील तें सांगवत नाहीं. क्षमा, दया, शांति हींच नीतीचीं बीजें होत. हीं सुलभ दिसतात तरी तीं साधणें अति दुर्घट आहे. कारण क्रोधाच्या आवेशापुढें मोठमोठ्या साधूचें साधुत्वही लय पावतें. तेव्हां साधारण जनांस तर फारच जपून चाललें पाहिजे हें सांगावयास नको. याविषयीं महाभारतांत एक उत्कृष्ट गोष्ट आहे. सर्वांत मोठा देव कोणता, याचा एकवेळ भृगु-शोध करूं लागला. तो प्रथम ब्रह्मदेवाकडे गेला आणि त्याणें मुद्दाम त्यास प्रणाम केला नाहीं. त्यावरून ब्रह्मदेवास फार क्रोध आला तो त्याणें सामोपचारांनीं शांत केला नंतर तो शिवाकडे गेला तेथें त्याणें शिवास परत प्रणाम केला नाहीं ह्मणून त्यास अत्यंत क्रोध येऊन तो भृगूचा नाश करणार होता; परंतु पार्वतीनें त्याचें समाधान केलें. तेथून भृगु वैकुंठीं विष्णुपाशीं गेला, तो विष्णु लक्ष्मीच्या अंकीं शीर ठेवून निजला होता. याणें त्याच्या उरावर लात मारली त्याबरोबर विष्णु जागा झाला; परंतु त्यास राग न येतां तो उठून बसला आणि भृगूचा आदर सत्कार करून त्याच्या पाय दुखावला असेल ह्मणून चेपूं लागला. त्यावरून भृगू त्यास ह्मणाला, तूंच सर्वांत मोठा देव आहेस, कारण क्षमा आणि दया हीं सर्वांत बळवान दोन शस्त्रें तुजजवळ आहेत.

सु. प.

## नोटिसा.

भोलाराम रामलाल मारवाडी दुकान ताजनापेठ अकोलें यांस खालीं सही करणारे याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी बारदान्याचे २५० पोत्यांची १ गाठ दर ५५ पंचावण रुपये शेकडा प्रमाणें आमची हजारीमल याजपासून विकत घेतली. तुमचे बरोबरच विष्णुपंत यांणींही ५ गाठी याच दरानें विकत घेतल्या व त्याप्रमाणें त्यांनीं गाठी नेऊन रुपये चुकते केले परंतु तुमची गाठ अजून वावडीवर पडली आहे तुह्मी नेली नाहीं व रुपयेही चुकवून दिले नाहींत ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली जाते कीं ही नोटिस पावल्यापासून ४ दिवसांचे आंत तुह्मी आपली गाठ घेऊन जावें, व्याजासुद्धां व या नोटिशीच्या खर्चासुद्धा रकमेची आदाई करावी. याप्रमाणें न केल्यास मुदत संपतांच सदहूं गाठ बाजारभावाप्रमाणें आह्मी विकून टाकून त्याचे जे रुपये येतील ते तुमचे खातीं जमा करूं व जी बाकी राहील ती कोर्टमार्फत तजवीज करून तुह्मापासून २ रु. शेकड्याप्रमाणें व्याजासुद्धां भरून घेण्यांत येईल व कोर्टाचा खर्च तुह्मावर बसेल हें खूप समजावें कळावें तारीख ३ फेब्रुवारी सन १८७७ इसवी.

( सही ) पन्नालाल दस्तुर
हजारीमल

---

नोटिस.

राजश्री भमराजी वल्लद खानाजी पाटील वस्ती कसबे अकोले यांस नारायण रामचंद्र कुळकर्णी वस्ती अकोलें रामराम उपरी तुमचेकडोन आमचे रुपये २४९॥= शिक्का सरकारी येणें आहे. त्या रुपयांबद्दल अद्यापपावेतों देऊन उलगडा करून दिला नाहीं याजकरितां लिहून कळवितों कीं, आज तारखेपासून १५ दिवसांचे आंत सदर्हू दोनशें एकोणपन्नास रुपये दहा आणे व्याजासुद्धां देऊन निकाल करावा. जर वरील मुदतीचे आंत निकाल न केल्यास मुद्दल रुपये व्याजासुध्धां शिवाय कोर्टखर्च मिळण्याविषयीं तुमचे वर दावा करून रुपये घेण्यांत येतील. आपसांत निकाल केल्यास कोर्टखर्चाची जोखीम तुमचेवर नाहीं. आपणास कळावें. तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १८७७ इसवी.

[सही] नारायण रामचंद्र कुळकर्णी
वस्ती अकोलें दस्तुर खुद्द.

---

## जाहीरखबर.

### प्रश्नोत्तर संग्रह

माजिस्ट्रेट व पोलिस परिक्षेसंबंधी

सदर्हू पुस्तक आह्मी मराठी भाषेंत तयार करून छापीत आहों. या पुस्तकांत माजिस्ट्रेट वर्ग २।३ व पोलिस इन्स्पेक्टर आणि चीफ कानस्टेबल यांचे परिक्षेस लागणारे कायद्यांतील मुख्य मुख्य कलमवार प्रश्न काढून त्यांचीं उत्तरें साद्यंत लिहून त्यास त्या त्या कायद्यांचीं कलमें दाखल केलीं आहेत. ज्या कायद्यावर यांत प्रश्न काढले आहेत ते कायदे:—

१ पिनलकोड दुरुस्तीसह
२ क्रिमिनल प्रोसिजरकोड दुरुस्तीसह
३ पुराव्याचा आक्ट
४ डिस्ट्रिक्ट पोलिस आक्ट
५ गावचे पोलिसा बाबद आक्ट
६ गुरांचे अति क्रमणाबद्दल आक्ट
७ फटक्यांचा कायदा
८ जुगाराचा आक्ट
९ हत्यारें व युद्ध सामग्री करण्याबाबद आक्ट
१० निरुद्योगी भटकणारे युरोपियन लोकांकारितां आक्ट
११ सन १८७२ चा परमुलखांतील हुकमतीविषयींचा व परमुलखांतील अपराध्यांस त्याचे सरकारचे स्वाधीन करण्याविषयींचा आक्ट.
१२ वेड्यांचे आश्रयस्थानाविषयीं आक्ट

हें पुस्तक परिक्षेस जाऊं इच्छिणारे व माजिस्ट्रेट व पोलिस लोक यांस फार उपयोगाचें होईल. सन १८७७ फेब्रुवारी अखेरचे आंत रोख पैसा पाठविणारांस दरप्रतीस २॥ रुपये व टपाल खर्च ६ आणे पडतील त्यानंतर घेणारांस दर प्रतीस ३ रुपये शिवाय टपाल खर्च ६ आणे पडेल ज्यांची हें पुस्तक घेण्याची इच्छा असेल त्यांणीं आह्मांस कलादगी एथें पोष्टपेडपत्रें पाठवावीं. टिकिटा पाठविणें त्या अर्ध आणा दराच्या वर्तांळयासुद्धां पाठवाव्या. पुस्तक मार्च महिन्याचे अखेरीस तयार होईल.

कलादगी ता. २५ जानेवारी १८७७ इ. } कल्याण शितारामचित्र.

---

### छापखानेवाल्यांस सूचना

आह्मी छापखानेवाल्यांस अति नम्रतेनें कळवितों कीं आह्मी मराठी ग्रेटप्रायमर टैप व लेडी फार स्वस्त दरानें पुरवित असतों. ज्यांस विकत घेणें असेल अथवा दराची माहिती पाहिजे असेल त्यांनीं मुंबईत खेतवाडींत ५वे गल्लींत ९१ व ९२ नंबराचे घरांत आमच्या नावें पत्र पाठवावें.

शामराव रणसोडरावजी
मिनरवा प्रेस.

मुंबई तारीख २९ माहे ज्यानेवारी सन १८७७ इसवी.

---

## जाहिरात

BANK OF BOMBAY
KHAMGAUM BRANCH.

खामगांव एथील मुंबई ब्यांकेची शाखा रुपये ५०० व ज्यास्त रकम नियमित मुदतीनें अमानत ठेवण्यास तयार आहे. व त्याबद्दलच्या शर्तींची माहिती खामगाव एथील ब्यांकेचे [illegible]ल लिहिला असतां फार होसतां मिळेल.

शी बाबा यांणी सांगि[illegible] दाहरणें बहुतकरून लोकांचे तारीख १४ [illegible] आलेलीं आहेत सबब तपशील १८७६ इसवी [illegible] नाहीं. अशीं अनुभवशीर H सांगून आतां ह्या सर्व संकटांच्या आपण आपली सुटका करून [illegible]कारितां काय करावें तें सांगितलें. हे पत्रह्मणाले, विद्वान, दयाळु व दूरदर्शी सरफडके

REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ | अकोला रविवार ता० १८ माहे फेब्रुवारी सन १८७७ इ० | अंक ७

## रा. रा. गणेश वासुदेव जोशी व त्यांचीं व्याख्यानें.

गेले आठवड्यांत आह्मी लिहिल्याप्रमाणें पुणें सार्वजनिक सभेचे उत्पादक रा. रा. गणेश वासुदेव जोशी, आपले बंधू रा. रा. कृष्णाजी वासुदेव जोशी सातारा सा. सभेचे सेक्रेटरी, यां सहित अकोल्यास येऊन रविवारीं सायंकाळीं टौन हालांत सुमारें पावणेतीन तास एकसारखें त्यांनीं व्याख्यान दिलें. तो दिवस महाशिवरात्रीचा होता तरी बहुत सभ्य गृहस्थ व्याख्यानास आले होते. रा. रा. बनाबा रामचंद्र डि. इ.इ, रा. रा. विष्णु मोरेश्वर मास्तर रा. रा. वामन कृष्ण डाय० चे हे. क्लार्क, रा. रा. गोपाळ महादेव क्लार्क आफ धि कोर्ट, रा. रा. पांडुरंग दामोदर मास्तर, तसेच वकील मंडळी पैकीं रा. रा. पांडुरंग गोविंद, रा. रा. सदाशिव नारायण, रा. रा. आबाजी खंडेराव इत्यादि बहुतेक, शिवाय रा. रा. राघव यादव पेशकार, रा. रा विश्वनाथ नाराण दांडेकर, रा. रा. सदाशिव विष्णु भागवत, रा. रा. रामचंद्र आबाजी हाळकर, रा. रा. धोंडो बाळकृष्ण एडिटर, इत्यादि बहुत लोक सभेस गेले होते.

प्रथमत: गणपत रावजी यांनीं आपले येण्याचा उद्देश सांगून नंतर प्रस्तुत कालास अनुसरून लोकांनीं कसें वर्तन केलें पाहिजे तें सांगितलें. भाषण फार सुरस, प्रेमळ, चित्तवेधक व अंत:करणावर ठसा बठविणारें होतें. पण तें सविस्तर लेखांत येणें अशक्य आहे व दुर्दैवानें आह्मी अजारी असल्यामुळें आह्मांस तें ऐकण्याचा लाभ झाला नाहीं ह्मणून तें जसेंच्या तसें या ठिकाणीं वठेल असाही मुळींच संभव नाहीं, ह्मणून जोशी बुवांच्या तोंडून दुसरे दिवशीं जे आह्मी मुद्दे ऐकिले त्या धोरणावर त्या व्याख्यानाचें तात्पर्य आह्मी आपले सर्व वाचकांकरितां येथें लिहितों.

गणपतराव जोशी यांच्या सारखे देशहिताचा कळवळा बाळगून झटणारे पुरुष सान्या हिंदुस्थानांत फारच थोडे आहेत ह्मणजे आणखी एक दोनच निघाल्यास निघतील. मायाबद्ध प्राण्यास ईश्वर परायण करण्यासाठीं जसे पुरातन साधूंचे अवतार झालेले आहेत तसे व्यवहार मार्गीं पुरुषांस त्यांचें खरें कर्तव्य ठसवून देण्यास हे सत्पुरुषच जन्मलेले आहेत. व आमच्या देशाच, आहे याहून कांहीं अधिक, कल्याण जर झालें तर तें अशांच्याच उपदेशानें होईल याविषयीं त्यांस बोलतांना ऐकिलें ह्मणजे कोणास भ्रांती व्हाणार नाहीं. अस्तु.

गणपतरावजी यांनीं प्रथमत: आपुले दिल्लीस जाण्याचें कारण सां कोर्टांतून निघाले कीं, पुणें सार्वजनि मुळींच आपिलास ण नें पुण्यास एक मोठ्ठी. परंतु सारें कारण आपले राणी सरकार कोर्ट फार लांब आणि ताब धारण करणार ते समयीं संतोषप्रदर्शक त्यांस एक मानपत्र पाठवावें असा ठराव झाला. पुढें मानपत्र तयार झाल्यावर सार्वजनिक सभेनें व्हाइसराय साहेबांस विच्यारिलें कीं हें मानपत्र समारंभाचे दिवशीं दिल्लीस आमचे मंडळीनें घेऊन येऊन आपणास प्रविष्ट करावें अशी आमची इच्छा आहे त्यावरून व्हाइसराय साहेबांनीं संतोषित होऊन कळविलें कीं सार्वजनिक सभे पैकीं १० गृहस्थांचें डेप्युटेशन दिल्ली दरबारास मानपत्र घेऊन येईल तर आह्मी फार खुशी होऊं. त्यावरून मी स्वतां व आणखी ९ गृहस्थ असे दिल्लीस गेलों व व्हाइसराय साहेब यांस मानपत्र सादर केलें व तें त्यांनीं सत्कारपूर्वक घेऊन आपली खुशी झाली, व हें मानपत्र आह्मी राणी साहेबांकडे पाठवूं, असें सांगितलें. हा प्रकार मानपत्राचे संबंधानें झाला. परंतु दिल्लीस सर्व देशचे राजे व विद्वान लोक जमले होते त्यांचें ऐक्य होण्याकरितां तेथें एकमेकांच्या भेटी होण्याविषयीं जी आह्मी दिल्लीस जाण्यापूर्वीं सर्व लोकांस लेखी पत्रें लिहिलीं होतीं व ज्यांची प्रसिद्धी सर्व वर्तमानपत्रांतून झाली आहे त्याप्रमाणें एकमेकांचे ऐक्यसंबंधाच्या भेटीही तेथें बऱ्याच झाल्या व पांच सात शें कोस लांब केलेले प्रवासाचें, श्रमाचें, व खर्चाचें चीज-झालें. हा प्रकार दिल्लीस झाल्यावर तेथून परत येते वेळेस मथुरा, वृंदावन, आग्रा, जयपुर, कानपुर, लखनौ, अयोध्या, काशी, कलकत्ता, अलाहाबाद, बऱ्हाणपूर व नागपुर इतक्या ठिकाणीं आह्मी जाऊन आलों. कांहीं कांहीं ठिकाणीं ४।५ दिवसांचे मुक्काम केले व आज ज्या प्रमाणें तुमचे एथें सभा भरून आपलें येण्याचा उद्देश आणि आपलें कर्तव्य यांच्या संबंधानें भाषण करीत आहे त्या प्रमाणें बहुतेक ठिकाणीं भाषणें होऊन आपले देशबांधवांचें बंधुत्वाचें नातें माझ्याकडून करवलें तितकें तितकें मी दृढतर केलें. आज हा शेवटला प्रसंग ह्या अकोल्यास आहे. आतां एथून आह्मी एकदम पुण्यास जाऊं. नंतर ते ह्मणाले, आह्मी राणी साहेबांस मानपत्र दिलें त्यांत खालीं लिहिलेले मुद्दे होते.

१ आपले हिंदुस्थानचे कारभार करण्याचे रीतीवरून आह्मास फार सुख झालें आहे. व तेणेंकरून झालेला आनंद या महोत्सवाचे वेळेस आह्मी प्रदर्शित करितों.

२ आपण हा किताब घेणार या संबधानें विलायतेस बाटाघाट झाली ते समयीं हिंदुस्थानचे लोकांची इच्छा आपण विलायत व हिंदुस्थान या दोन देशांत भेद राहील असा किताब घेणार नाहीं अशी होती ती पूर्ण झाली नाहीं; परंतु कांहीं म कीय संबधानें हिंदुस्थानच्या चक्रवर्तिनी म किताब घेण्य आपणास जरूर धें. ते समयीं [illegible] ने सभा खा हरकत घे [illegible] ठ मुख्य ली यांणीं या [illegible] करून फक्त हा शद्बाचा मान आहे. येणेंकरून राज्यकारभारांत कांहीं फरक होणार नाहीं असें कबूल केलें त्याजवरून त्यांचे इच्छेप्रमाणें किताब घेण्याचें ठरलें. तस्मात् ही गोष्ट आह्मास आनंदाची वाटते. परंतु आजपर्यंत हिंदुस्थानांत अशा रीतीचे बादशाही किताब ज्या ज्या बादशहांनीं घेतले त्यांनीं त्यांनीं असे प्रसंगीं हिंदुस्थानचे लोकांस मोठाल्या जहागिरी व इनाम वगैरे दिले, तसा प्रकार आतां होणें कठीण, तत्रापि आपण ज्या गोष्टी आजपर्यंत कबूल करीत आला त्या तरी या प्रसंगीं अमलांत आणण्याची कृपा करावी त्यांचा तपशील:—

नेटिव राजे लोकांची इंग्लिश राज्यकारभारांत मदत घेत जावी.

वऱ्हाड प्रांत निजाम सरकाराकडून व सातारा प्रांत मराठ्यांकडून विनाकारण घेतला आहे तो त्यांचा त्यांस परत द्यावा.

सनदी सिविल सर्व्हिसच्या जागा नेटिवांस देत जाव्या.

विलायतेचे पार्लिमेंटांत हिंदुस्थानचे तर्फेचे लोक नेमावे.

लढाईचे खात्यांत नेटिवांस मोठे हुद्याच्या जागा मिळाव्या. व नेटिवांस नि:शस्त्र केलें आहे तीं शस्त्रें त्यांचीं त्यांस परत मिळावीं.

हिंदुस्थानांतील जमीनीचा सरकारसारा कायमचा व्हावा.

हिंदुस्थानचे कायदे कौंसलांत प्रजेनें नेमलेले लोक असावेत.

हिंदुस्थानावर विलायतचें जें कर्ज आहे त्याचें व्याज कमी व्हावें.

याप्रमाणें मानपत्रांतील मजकूर सांगितला. नंतर व्याख्यानास आरंभ केला त्यांत विषय चार होते ते येणेंप्रमाणें—

१. राजा आणि प्रजा यांमध्यें ऐक्य व प्रेमभाव रहाण्याकरितां प्रजेच्या व राजांच्या दरम्यान एकमेकाचा मजकूर एकमेकास योग्यरीतीनें समजण्याकरितां सार्वजनिक सभा असल्या पाहिजेत.

२. प्रजेंत एकमेकांत ऐक्य राहून प्रेम होण्याकरितां प्रजे प्रजेंचे जे वाद आहेत त्यांचा योग्य निकाल करण्याकरितां प्रजेनेंच स्थापन केलेलीं पंचाइतीचीं कोर्टें पाहिजेत.

३. हिंदुस्थानांत व्यापार व उद्योग वाढला पाहिजे.

४. संपादन झाले द्रव्याचा मितव्ययानें व चांगले रीतीनें विनियोग झाला पाहिजे.

१ पहिला विषय— राजा आणि प्रजा यांत ऐक्य व प्रेमभाव राहिला पाहिजे— पूर्वीं हिंदुस्थानची स्थिति जगताचे साधारण नेमाप्रमाणें होती ह्मणजे साधारण नेम असा कीं ज्या ठिकाणची प्रजा त्या ठिकाणचा राजा असावयाचा. राजा व प्रजा यांचे एके देशांत रहाणें असावयाचें, राजा व प्रजा यांचा धर्म व भाषा एक असावयाची इत्यादि प्रकार हिंदुस्थानचे दुर्दैवानें विपरीत झाला आहे तेव्हां पूर्व स्थिति राजा आणि प्रजा जशी एके कुटुंबांतील मनुष्याप्रमाणें होतीं त्यामुळें प्रजेस आपले तर्फे मागणें करण्याची जरूर नव्हती प्रजेचे मनोरथ मागितल्यावाचून राजाकडून पुरे होत होते ती जी आपल्यास अनादि कालापासून सवय लागली आहे ती आतां विसरून हल्लींचे देशकालवर्तमानास अनुसरून आपण आपले दु:ख राजास लेखी कळविल्याखेरीज त्याची दाद लागणें नाहीं. व्यक्ती रूपानें जें दु:ख आहे त्याची दाद लागण्याचा ज्याचा तो उद्योग करितो परंतु सर्व देशावर जो दु:खाचा प्रसंग आहे किंवा येईल त्याचे निवारणाकरितां सर्व लोकांकडून उद्योग झाला पाहिजे तसा न झाला असतां दाद लागणार नाहीं आणि सर्व लोकांकडून उद्योग होण्याकरितां सार्वजनिक सभा देशोदेशी स्थापन होऊन त्यांचे मार्फत दाद लागण्याकरितां वारंवार अर्ज झाले पाहिजेत येणेंकरून प्रजेचे हेतु राजास पूर्ण रीतीनें समजतील व त्याच सभेचे मार्फत राजाचेही हेतु प्रजेस समजले जातील. ज्या प्रमाणें दिवाणी किंवा फौजदारी मुकद्दम्यांत पक्षकाराचे मजकूर न्यायाधिशास वकील मार्फत समजून योग्य न्यायास मदत होते तसाच संबंध राजाचे आणि प्रजेचे दरम्यान आहे तेव्हां सार्वजानिक सभा ही वकिलाप्रमाणें होऊन उभयताचे दरम्यान खऱ्या समजुती घालून उभयतांचा प्रेम वाढविते व या सभांस अलीकडे बरेच आपले सरकाराकडूनही उत्तेजन मिळत चाललें आहे. व हल्लींचे राज्यकर्ते यांचे राज्याचा पाया सर्व प्रजेंचे अभिप्रायावर आहे तेव्हां आतां कोणतीही भीति मनांत न आणतां आपले देशबांधवांनीं आपले कर्तव्यांत सुस्ती न करितां आपले काम बजवावे हाच आतां उपाय राहिला आहे. यांत आपण चुकलों असतां सर्वस्वास मुकलों असेंच समजलें पाहिजे.

२. दुसरा विषय— प्रजे प्रजेंचे आपसांत ऐक्य व प्रेमभाव रहावा याकरितां आपल्यास कांहीं साधन करणें जरूर आहे आणि हल्लीं तें ऐक्य रहात नाहीं याचें कारण प्रजे प्रजेंत वाद असतात त्यांचे निकालाकरितां जीं कोर्टें सरकारानीं स्थापन केलीं आहेत त्या मार्फत जे निकाल होतात तेणेंकरून द्रव्यनाश होतो, द्वेष उत्पन्न होतो, अनीतीनें वागण्याकडे प्रजेचा कल जातो आणि आपला अमोल्य वेळ व मान यांचीही बऱ्याच अंशीं हानी होते. या संबंधानें पुष्कळ अनुभवशीर उदाहरणें जोशी बावा यांणीं सांगितलीं त्यांचा तपशील लिहिला असतां फार होईल. तीं उदाहरणें बहुतकरून लोकांचे अनुभवास आलेलीं आहेत सबब तपशील एथें लिहित नाहीं. अशीं अनुभवशीर उदाहरणें सांगून आतां ह्या सर्व संकटांच्या प्रसंगांतून आपण आपली सुटका करून घेण्याकरितां काय करावें तें सांगितलें. ते ह्मणाले, विद्वान, दयाळु व दूरदृष्टी सर

कारानीं कायद्यांत एक थोडा मार्ग ठेवला आहे त्याप्रमाणें आपण आपले वाद सरकारी कोर्टांत निकाल करावयास न नेतां पंचमार्फत त्यांचे निकाल करून घ्यावे. येणेंकरून जो आपल्यावर अवघड प्रसंग आहे त्यांतून आपण मुक्त होऊन आपणा सर्व प्रजेचा ऐक्यभाव होऊन आपले बंधुत्वाचें प्रेम ज्यास्ती वाढून त्याचा परिणाम फार सुखावह होईल; नाहीं तर प्रजा ह्या सरकारी कोर्टांतून जाऊन जाऊन अगदीं दरिद्री होईल व सरकारास जो इतर करभार मिळतो तो मिळावयास कठीण पडेल आणि अनीति वाढून देशांत अस्वस्थता दिवसेंदिवस वाढत जाईल. व पंचमार्फत आपले वादाचा निकाल करून घेतल्यानें जो अनुभव पुणें व दुसरे कितीएक ठिकाणीं आला आहे त्यावरून स्पष्ट ठरतें कीं तसा प्रकार प्रत्येक ठिकाणीं व्हावा ह्मणजे त्यापासून प्रजेंत ऐक्यभाव राहून आपले देशाचा उत्कर्ष चांगले रीतीनें होईल. ही गोष्ट आपले राज्यकर्त्यांचे मनात पूर्ण येऊन पंचाचें कोर्टास त्यांच्यानें होईल तितकी मदत ते देत आहेत असें असतां भर आपण या कामांत कांहीं विच्यार केला नाहीं तर आपणच आपले देशबांधवांचे नाशकर्ते समजले पाहिजे.

३. तिसरा विषय— व्यापाराचा, यास आरंभ करतांना गणपतरावजी ह्मणाले कीं हल्लीचे स्थितीप्रमाणें परदेशस्थ लोक आपले राज्यकर्ते आहेत या संबधानें जो आपले संपत्तीचा भाग परदेशांत जातो तसा त्या संबंधानें कांहीं आपला नफाही होत आहे. आपलें जीवित्व आणि आपली मालमिळत यांचे संरक्षणाचा आपल्यास बिलकूल धोका राहिला नाहीं. आपल्यास विद्या व माहिती उत्तम रीतीची त्याचे आश्रयानें मिळत आहे तेव्हां राजकीयसंबंधानें जी संपत्तीची हानी आहे तिचा मोबदला काही आपल्यास बराच मिळत आहे व त्या संबधानें आपला व एकपक्षी विच्यार कांहीं उपयोगी पडेल असें नाहीं. परंतु व्यापार संबंधानें जो आपले संपत्तीचा सर्वस्व ऱ्हास होत चालला आहे तो केवळ आपले सुस्तीनें व मूर्खपणानें आहे. सरकारचे संबधानें या कामांत आपल्यास बिलकूल मद नाहीं. व्यापाराविषयीं सरकारची आपल्यास पूर्ण मोकळीक आहे एवढेंच नव्हे उलट अलीकडे सरकारानें सरकार संबंधांत परदेशांतील सामानाचा उपयोग न करितां हिंदुस्थानांतीलच तयार झालेले मालाचा उपयोग करीत जावा असा स्पष्ट ठराव केला आहे. असें असून आपण केवळ मूर्खत्वानें सर्वस्व आपला नाश करून घेत आहों त्याला दुसऱ्यांनीं काय करावें ! शें पन्नास वर्षांपूर्वी हिंदुस्थानचे लोकांचे निर्वाहास पुरे इतकें कापड तयार होऊन अधिक राहिलेलें परदेशांतही विलायतेस वगैरे विकावयास जात होतें. तें मान अलिकडे थोडे दिवसांत बदलून जाऊन केवळ उलट स्थिति झाली. ह्मणजे आतां कोट्यावधि रुपयांचें कापड विलायतेहून आपले देशांत येऊन तितके रुपये व्यापार संबधानें परदेशांत जात आहेत व असाच प्रकार इतर मालाचेही कामांत आहे. अशी संपत्ती सर्व परदेशांत जाऊं लागली आहे व याविषयीं विच्यार आपण केला नाहीं तर थोडेच दिवसांत आपले हिंदुस्थानांत केवळ नेवावें व बसावें इतकें शिलक राहील आणि आणखी थोडे दिवसांनीं जेवणाचे पदार्थही विलायतेहून येऊन त्यावर आपण निर्वाह करूं लागूं. असा प्रकार झाला ह्मणजे राजकीय संबंधानें प्रस्तुत मनुष्य वर्गांत जशी आपली गणती नाहीं तशी इतर व्यवहारांतही होऊन केवळ पशु वर्गांत आपण ढकलले जाणार, तेव्हां तसा प्रकार न व्हावा आणि अन्नवस्त्र तरी आपले देशांत आपल्यास मिळावें असा आपण अभिमान धरला पाहिजे. संतोषाची गोष्ट आहे कीं, थोडे वर्षांपासून या संबंधानें आपले देशांत विच्यार सुरू झाला आहे आणि सुताचे कारखाने वगैरे वाढत चालले आहेत. या गोष्टीकडे आपण थोडें लक्ष्य देऊन आपले देशाचे संपत्तीचा प्रवाह परदेशांत व्यापाररूपानें जात आहे तो जितका कमी होईल तितका कमी केला पाहिजे. व तसें करितांना आपणास थोडी इजा झाली तर ती सोसली पाहिजे. खरोखरी ह्मटलें असतां थोडेंसें जाडें भरडें वस्त्र नेसणें ही मुळींच इजा नव्हे. आपले पूर्वज देशाभिमानाकरितां आपलें शरीर आर्पण करीत होते. देशाकरितां आपला देह देणें हीच त्यांजला मुक्ती वाटत होती, त्यांचे आपण वंशज आहो तर आपले देशाभिमानाकरितां थोडी ही गैरसोय आपण न सोसूं तर केवळ आपण आपले पूर्वजांचे नावास काळोखी आणिली व व्यर्थ आपण या देशांत जन्म घेतला असें होऊं शकेल. सबब आपले देशांत आपले निर्वाहाचे पदार्थ उत्पन्न करून त्यावर आपला निर्वाह करून परदेशास पुन्हा ते पदार्थ पुरवून आपली संपत्ती वाढऊं अशी उमेद ठेवली व यत्न केला तरच कांहीं आपला बचाव आहे; नाहीं तर आपण पशुवत् तरी कायम राहूं किंवा नाहीं याचा संशय वाटतो. या निर्भिड भाषणाकरितां क्षमा असावी.

४. चवथा विषय— संपादन झालेले द्रव्याचा मित व्ययानें व चांगले रीतीनें व्यय व्हावा या संबंधानें विच्यार मनांत येण्याचें कारण तूर्त आपले देशाची राजसत्ता आणि व्यापार परदेशांत गेला आणि त्यांत आणखी आपण आपले थोडे आणि अल्प प्राप्तीचा व्यय मूर्खपणानें करूं लागलों तर आपल्या आत्महत्तेचा दोष येणार आहे. अलिकडे आपण आपले रहाण्याच्या स्थितीचें अनुकरण कांहीं अंशीं आपले राज्यकर्ते यांचे रहाण्याचे स्थितीप्रमाणें करीत आहों परंतु आपले आपले राज्यकर्ते यांचा उद्योग आणि त्यांचे रहाण्याची स्थिति या दोन्हीचे सारखें जर आपण अनुकरण केलें असतें तर तेणें करून आपल्यावर दोष न येता. तसें न करितां आपण फक्त त्यांचे शानशोकीचें मात्र अनुकरण करिता आहा; उद्योग सोडून देतो आहा त्यामुळें आपली स्थिति दिवसें दिवस फारच बिघडत चालली आहे व किती एक कामांत पूर्वीची आपली स्थिति सोडून व आपले राज्यकर्ते आपल्यास तसे खर्चाचे कामांत मूर्खपणा करितां असें ह्मणत असतांही त्या कामांत आपण केवळ अज्ञानानें आपले अल्प संपत्तीचा खर्च करीत आहों येणेंकरून आपले देशाची मोठी हानी होत आहे. सर्व गोष्टी द्रव्याने साधणार आणि तें द्रव्य आपल्यास मिळणें दुर्घट झालें आहे त्याज थोडें बहुत जे मिळतें तें मूर्खपणा जाते यामुळें केवळ जरूरीच्या कामाकरितां देखील अल्प द्रव्य आपल्या जवळ खर्चास नाहींसें झालें यामुळें देशहिताचे अल्पस्वल्प उद्योग देखील देऊ शकत नाहींत. सबब आपली पूर्व स्थिति व हल्लींचा आपल्यावर असलेला प्रसंग आणि पुढें येणारी स्थिति याजवर लक्ष देऊन थोडा बहुत संचय होई असा आपण खर्च केला पाहिजे केवळ दिवाळखोरी केली असतां आपण आपला नाश केला असें होईल. ही गोष्टही बहूत ढळढळीत उदाहरणांनीं गणपतरावजींनीं व्यक्त करून दाखविली.

याप्रमाणे रसभरीत व खरमरीत भाषण सुमारें तीन तास करून गणपतरावजी खालीं बसले. तव्हा श्रोतृसमाजाच्या मनोवृत्ती आनंदानें उल्हासून अनेक विच्याराच्या श्रेणी त्यांच्या [illegible]त्पथावर उचंबळून गेल्या तेणेंकरून कांहीं मिनिटें सभेस कांहीं विलक्षण देखावा आला. नंतर रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं उभें राहून गणपतरावजीचे भाषणापासून सर्वांस जो महल्लाभ झाला तो व्यक्त करून त्यांचे आभार मानिले. शेवटीं पुष्पें व लवंगा वेलदोडे वाटून सभा विसर्जन झाली.

दुसरे दिवशीं दोन तीन ठिकाणीं गणपतरावजी विड्यास गेले होते. तेथील सर्व वकीलमंडळी एकत्र मिळून त्यांनीं त्यांस सार्वजनिक विडा दिला. नंतर तिसरंप्रहरीं मे० सिलीमखान सौदागर यांचे एथें गावांतील मुसलमान सभ्यगृहस्थ व बहुतेक व्यापारी एकत्र जमून गणपतरावजींचे व्याख्यान ऐकण्यास उत्सुक होते त्यांकडेही ते आनंदानें गेले. व सुमार दीड तास भाषण करून तसेंच स्टेशनावर चालते झाले. त्यांस पोंचविण्यासही बरीच मंडळी गेली होती.

## मनमाड व दौंड यांचे दरम्यान रेलवे.

बहूत दिवस या रेलवेची वाटाघाट चालू होती व दुष्काळग्रस्त लोकांस कामें पुरविण्याकरितां हें मोठें काम सुरू करण्यास परवानगी द्यावी ह्मणून मुंबई सरकारानें हिंदुस्थानसरकारास गेल्या आक्टोबर महिन्यांत तपशिलवार लिहिलें होतें पण हिंदुस्थानसरकारचे मनांत ती गोष्ट भरली नाहीं व त्यांनीं नाकार दिला. तरी आणखी प्रसंग पाहून व विपत्तिग्रस्तांचे पोषणाकरितां दुसरें छोटेखानी कामाकडे विनाकारण बहुत खर्च होत आहे त्यापेक्षां पुन्हा हिंदुस्थानसरकारास अगत्यपूर्वक लिहावें त्यांत।ल
मुंबईसरकारानें मनांत आणिलें व त्याप्र दिली आहे.
र्णे सविस्तर लिहिलें त्यांत ही रेलवे घेतली आहे,
च फार अगत्याची आहे. हिजपासून पुतणेंही रोज
कीय, लष्करी, व व्यावहारिक असा जण एकमेळानें

प्रकारचा उपयोग आहे. या प्रसंगीं ही रेलवे तयार असती तर लोकांचा माल नेण्यामध्यें या रेलवेला सुमार ७ लक्ष रु. नफा झाला असता. व अशा अतिमहत्वाच्या कामास आपण अजूनही सला देणार नाहीं तर आमचा निरुपाय आहे असेंही शेवटीं लिहिलें. त्यावरून हिंदुस्थानसरकारची खात्री झाली व त्यांनीं काम सुरू करण्यास मंजुरात दिली. अजूनही हिंदुस्थान सरकार ह्मणत आहे कीं आगगाडी चालू करण्याच्या मजलेपर्यंत पुरें काम करण्यास आमची संमती मिळाली आहे असें समजूं नये. ती धोरण पाहून पुढें मिळेल.

मुंबई सरकारानें हिशेब पाठविले आहेत त्यावरून कळतें कीं दौंडापसून मनमाड १३२ मैल आहे. दर मैलास रेलवे तयार होण्यास खर्च ६७९११ रुपये लागतो त्या मानानें एकंदर ८९७६००० रुपये खर्च येईल. दौंडा पासून अहमदनगरपर्यंत ४७॥ मैल रेलवे तूर्त तयार करण्याचा मुंबई सरकारचा मानस आहे. व ते ह्मणतात कीं विलायतेहून रेल वगैरे सामान आक्टोबरचे पहिले तारखेस मुंबई मुक्कामीं येऊन दाखल झालें तर सन १८७८ चे एप्रिल महिन्यांत भीमेवर तूर्तातूर्त पूल करून थेट नगरा पावेतों आह्मी आगगाडी सुरू करूं.

दौंडापासून नगरापर्यंत जमीन व मुरूम खोदणें, आणि भराव घालणें या कामास ५६१८०० रुपये लागतात व इतक्यावर ५ महिने पावेतों ३७५०० दुष्काळ पीडित मनुष्यांचा निर्वाह होईल. व नगरापासून मनमाडपर्यंत वरील प्रकारचे कामास ९९४२९७ रुपये खर्च लागेल आणि तेवढ्यावर १११००० मनुष्यें ३ महिने पावेतों जगतील असा हिशेब प्रसिद्ध झाला आहे.

नगरपर्यंत रेलवेचे सर्व प्रकारचें काम पुरें करावें अशी मुंबई सरकारची इच्छा आहे. त्या धोरणानें त्यांनीं भराव्याचे व खोदण्याचे कामाशिवाय इतर माहिती लिहिली आहे तीवरून समजतें कीं नगरापर्यंत रेल पसरण्यास ११५५००० रुपये, भीमेच्या पुलास २२४००० रुपये, नगरचे स्टेशनास ७५८०० रुपये, मध्यंतरीं ४ स्टेशनें करण्यास ८०००० रुपये, तारायंत्रास ४७५०० रुपये, व इतर खर्च मिळून नगरापर्यंत पुरी रेलवे होण्यास रुपये २९३२९४४ खर्च होईल असें लिहिलें आहे.

आतां ही रेलवे चालू झाल्यावर उत्पन्न होईल तें दरमैलास:—

| | |
|---|---|
| उतारकरूंबद्दल | ३३७९२० रुपये. |
| मालाबद्दल | ४९५००० रुपये. |
| | ८३२९२० |
| चालू खर्च | ४९९७५२ |
| निवळ नफा | ३३३१६८ |

खर्च हिशेब आहे व ही रेलवे लव
अंमपुरीही लवकर होणार.
तंबाकूचे संतोष वाटतो.
तेथेंही तंबा

## वऱ्हाडांतील न्यायखातें.

न्यायखात्यांत सुधारणा कशी व्हावी या बाबदींत आमचे बंधु प्रमोदसिंधुकर्ते यांनीं आपलें मत दिलें आहे. दिवाणी, फौजदारी व मुलकी अशी तिन्हीं कामें एकाच अधिकाऱ्याकडेस असल्यानें ज्या गैरसोई होतात त्या आमच्या बंधूनीं दाखविल्या आहेत. व आह्मीही पूर्वीं कधीं कधीं ह्या बाबतींत लिहिलें आहे. परंतु आतां या बाबतींत सुधारणा होण्यास फार दिवस नको आहेत असें आह्मास वाटतें. नवीन मुनसफ नेमून दिवाणी काम अगदी स्वतंत्र करणार ह्मणून आह्मी ऐकतों. या प्रमाणें झालें ह्मणजे अर्थात अव्वल दाव्यास तहशिलदार कचेरी पहावयास नको. त्यांत इतकें मात्र झालें पाहिजे कीं मुनसफ लोकास अधिकार जे देणें ते विच्यारपूर्वक देऊन त्यांच्या अधिकाराबाहेरचे खटले घेण्या करितां प्रत्येक जिल्ह्यांतून एक किंवा दोनें असिस्टंट कमिशनर कामाच्या प्रमाणानें स्वतंत्र नेमावे ह्मणजे लहान मोठे सर्व असल दावे तपासणारे स्वतंत्र अधिकारी होतील.

आतां अपील कोर्टाविषयीं आपचे बंधु ह्मणतात त्यांप्रो ज्याइंटजुडिशियलची कांहीं गरज नाहीं. हल्लीं दिपुटी कमिशनर यांना जो थोडासा अपिलाचा अधिकार आहे तो कायम ठेवावा जुडिशियल कमिशनर यांच्याकडेस बाकीचीं अपिलें होतात त्यांची संख्या बेताचीच आहे ह्मणजे जुडिशियल कमिशनर यांस अधिक काम आहे असें नाहीं. मात्र रयतेस शेवटपर्यंत चांगला न्याय मिळावा ह्मणून एक व्यवस्था होणें आमच्या मतें जरूर आहे. व तिकडे सरकार लक्ष्य पुरवितील अशी आह्मी आशा करितों.

शेवटचें कोर्ट ह्या प्रांतास रेसिडेंट साहेबांचें आहे. रेसिडेंट साहेबांस त्यांची इतर जरूरीचीं कामें इतकीं आहेत कीं, त्यांना दिवाणी फौजदारीचे खटले पहाण्यास बिलकूल सवड मिळत नाहीं. ज्या अधिकाऱ्यांस रात्रंदिवस राज्यकारभारा संबंधी विच्यार करावयाचा व शिवाय इलाक्याचे सरकार ह्मणून अनेक प्रकारचीं कामें पहाण्याचीं त्यांजला आणखी न्यायाचे कामही सांगणे ह्मणजे कांहींच अर्थ नाहीं.

आह्मास वाटतें कीं ह्या प्रांतास हायकोर्टाचा अधिकार रेसिडेंट साहेबांस आहे तो त्यांच्याकडेस न ठेवतां एक स्वतंत्र अधिकारी त्या अधिकारावर नेमावा. तो अर्थात मोठा विद्वान आणि हायकोर्टाचे जडजाचें काम करण्यास जितका अनुभव पाहिजे तितक्या अनुभवाचा असला पाहिजे हें उघड आहे.

हल्लीं ह्या प्रांतांत जुडिशियल कमिशनर कोर्टांतून जे ठराव हातांत त्यांच्यावर वर्षास १० सुद्धां अपिलें रेसिडेंट साहेबांकडेस फैल होत नाहींत. याचें कारण जुडिशियल कमिशनर साहेबांचे कोर्टांतून निकाल झालेले मुकदम्यांत मुळींच आपिलास मार्ग नसतो असें नाहीं. परंतु सारें कारण हें आहे कीं वरिष्ठ कोर्ट फार लांब आणि लांब असूनही रेसिडेंट साहेबांस महत्वाचीं कामें दुसरीं पुष्कळ असल्यामुळें लोक तिकडेस फारसीं अपिलें करीत नाहींत.

एकंदरींत न्यायखात्याची सुधारणा करण्याविषयीं आमचे रेसिडेंट साहेबांहीं मनावर घेतलें आहे तेव्हां देशास ज्या ज्या प्रकारची सोय असणें जरूर आहे त्या त्या प्रकारची सोय ते करून देतील अशी आह्मास उमेद आहे.

---

## मि० म्याकिंटाश सा० वर जबरीच्या संभोगाचा मुकद्दमा.

आह्मांस परम आश्चर्य वाटतें कीं मि० म्याकिंटाश साहेब उमरावतीच्या हायस्कुवरील हेड मास्तर हे एवढ्या विद्येच्या व नीतीच्या महत्पदारूढ असतां परोपरीचीं हलकीं कामें करून उदयास येऊं लागले आहेत. त्यांत जबरीच्या संभोगाचा तर शेवटला कळस झाला. कारण खरोखर इनसाफ झाला व गुन्हा लागूं झाला तर याला जन्मपर्यंत काळ्या पाण्याची ही शिक्षा आहे. अशा थरावर अशा थोर गृहस्थाची गोष्ट येणें व विद्याखात्यांत अशीं रत्नें निपजणें ही मोठी लज्जास्पद गोष्ट होय. पण एथें दुसऱ्याचा इलाज काय? या साहेबांचे मूर्खपणावरून यांस हायस्कुलावरून काढून टाकावें असें किती दिवस निदर्शनास आलें आहे, तरी सरकार त्यांस थोपून थोपून धरितें तेव्हां पुनः पुनः ते नवे नवे थेर नाचवूं लागतात. तेव्हां ही चूक त्यांची नव्हे. मागेंच त्यांस काढिलें असतें तर विद्याखात्यास आज हा कलंक लागला नसता. अस्तु. आह्मास भरवसा आहे कीं, क्या० बुलक साहेब निस्पृह व निष्पक्षपाती न्यायाधीश आहेत सबब ते खरा इनसाफ करितील. आतां पुढें काय होतें पाहूं. याच संबंधानें उमरावतीहून आह्मास दोन पत्रें आलीं त्यांतील एक, ज्यांत अधिक माहिती आहे तें आह्मी एथें घेतों.

उमरावती—ता. १६।२।७७ इ.

वि. वि. हल्लीं माजिस्त्रेट कोर्टांत एक महत्वाचा मुकद्दमा चालला आहे त्याचा परिणाम कसा होतो या गोष्टीकडेस सर्वांचें लक्ष लागलें आहे, त्याची हकीकत अशी:

अमीरण फकीरणीची मुलगी नामें चंदा उमर वर्षें १०।११ इजला युरोपियन साहेबांची कुंटण रामकुवर इणें, तुजला मजुरीनें काम देऊन दोन आण्याचे पैसे देईन, असी भुलथाप देऊन त्या मुलीस समागमे घेऊन मि. म्याकिंटाश सा. हेड मास्तर हायस्कूल यांचे बंगल्यांत नेऊन खोलींत बंद करून ठेविली व आपण परत आली. ती बिच्यारी निराश्रित मुलगी तेथें अस्तमानपावेतों तडफडत राहिली. ही गोष्ट ता. ८।२।७७ रोजीं घडली तेव्हां अस्तमानीं सा. महसूफ बंगल्यांत आल्यावर त्या मुलीस आतां आपली सुटका होईल असा धीर आला पण तें सर्व व्यर्थ. साहेबांनीं खाना खाऊन * * * * * नंतर त्या मुलीस बळजोरीनें धरून पलंगावर नेऊन तिच्याशी जबरीचा संभोग केला. रात्रभर तिच्याशी रत होऊन दुसरे दिवशीं पुन्हा आपले गुरूपणाचे गादीवर जाऊन बसले व मुलांस सदुपदेश करीत राहिले. मुलगी त्या अंधारकोठडींत ईश्वराचा धावा करीत होती. पुढें अस्तमान झाला व पुन्हा तोच क्रम चालू झाला. याप्रमाणें दोन रात्रींभर त्या पशुतुल्य माणसानीं त्या पोरीचे हाल हाल करून तिसरे दिवशीं त्या कुंटणीबरोबर तिला बिदा करून दिलें. रस्त्यानें त्या पोरीकडून दुखापत झाल्या कारणानें चालवेना, उठत बसत ती घरीं गेली. नंतर ती व तिची आई यांनीं पोलिसांत फिर्याद केल्यावरून तपासास आरंभ झाला. शेवटीं पोलिसचे सुपरिंटेंडेंट साहेबांनीं माजिस्त्रेटाचें वारंट घेऊन तारीख १९ रोजीं सकाळीं विद्यागुरू साहेबांस धरून माजिस्त्रेट साहेबांसमोर आणिलें तेथें मुकद्दमा आजपावेतों दोन दिवस चालू आहे. क्या. बुलक साहेब यांनीं कालरोजींच थामसन साहेब असिस्टंट कमिशनर जे रजेवर आहेत त्यांची १००० रुपयांची जामिनकी घेऊन म्याकिंटाश साहेबास मोकळें सोडलें आहे.

या साहेबांवर पिनलकोड कलम ३७६ प्रमाणें व कुंटण रामकुवर इजवर कलम ३६६ प्रमाणें मुकदमे चालू आहेत निकाल काय होईल समजत नाहीं पण बहुधा गौरवर्णाचा इन्साफ ज्याप्रमाणें होत असतो त्याप्रमाणेंच हाही होईल असें साधारण सर्व लोक समजत आहेत.

---

## वऱ्हाड

मि० नौलिस साहेब स्माल काज कोर्टाचे जडज २० वे तारखेस एथून जाणार. त्यांना काल इंग्लिश मराठी शाळेंत पानसुपारीचा समारंभ झाला. नौलिस साहेबांनीं म्युनिसिप्यालिटीचे व्हाईसप्रेसिडेंट असतां २।३ वर्षें शहर सुधारणेचें काम चांगलें झटून केलें व मार्किटांत वगैरे चांगल्या सुधारणा केल्या.

नवीन मुनसफ किती करावयाचे, कोण कोण करावयाचे, कोठें कोठें करावयाचे, व त्यांच्या संबंधानें इतर अदला बदली कायकाय करावयाची या विषयींचा लेख जुडिशि. कमिशनर साहेबांकडून रेसिडेंट साहेबांकडे गेला असें ऐकतों. ही गोष्ट खरी असल्यास लवकरच त्याचें स्वरूप बाहेर पडेल.

अकोला शहरच्या बाजारबैठकीचे कराचा पुढील वर्षाचा मक्ता मंगळवारीं सकाळीं टौनहालांत हरास करून विकणार आहेत.

रा. रा. गोविंदराव यशवंत बाळापुरचे तहशिलदार यांचे कन्येचें फाल्गुन वद्य २ स राजुऱ्यास मोठ्या कडाक्याचें लग्न आहे. मुलगी पाठवद तालुक्यांतील राजे फत्तेसिंग मुकद्दम यांचे येथें दिली आहे. उभयतां तहशिलदारांनीं रजा घेतली आहे, घरीं एक कर्ते बंधू आहेत. पुतणेही रोजगारावर आहेत. व सर्वजण एकमेळानें असून चांगल्या लौकिकानें आहेत. संतती, संपत्ती, अन्न, सरकारांत वजन, व गृहसौख्य इतक्या सर्वांची अनुकूलता असणें ह्मणजे परमेश्वर कृपेचें मोठें लक्षण समजलें पाहिजे.

वऱ्हाडांतील पोष्टआफिसावरील इन्स्पेक्टर यांनीं असें जाहिर करण्याविषयीं आह्मास लिहिलें आहे कीं नोवेंबरच्या तिसरे तारखेस अकोला पोस्टांतून सरकारी डाक चोरीस गेली. तिचा जो कोणी पत्ता लावून देईल त्याला ते ४०० रुपये इनाम देणार व अकोल्याचे डिपुटी कमिशनर साहेब आणखी एक शंभर रुपये त्याच इसमास इनाम देतील.

सिकंदराबादचे क्यांटनमेंट माजिस्त्रेट मेजर मेन एक वर्षाची रजा घेऊन बिलातेस जाणार.

उमरावतीच्या वर्तमानपत्रांत रा. रा. लक्ष्मीपति नायुडु बारिस्टर यांजवर एका कुळानें नोटिस दिली आहे कीं तुह्मी आमचे ८० रुपये घेऊन कराराप्रमाणें काम चालविण्यास आला नाहीं. तर रुपये परत द्यावे नाहींपेक्षां फिर्याद करू—त्यावर बारिस्टरानीं उर्दुअकबारांतून त्या मनुष्यास काल नोटिस दिली आहे कीं रुपये घेत ल्याबदल आमची पावती दाखवा, नाहीं तर आह्मी तुह्मावर फिर्याद करू—काय चमत्कार आहे कीं वऱ्हाडांतील गबाळ एक कूळ व बिलायतेहून आलेले नामांकित बारिस्टर झगडा करण्यास एका लेव्हलवर आले आहेत! आतां कोण पाहिल्यानें फिर्याद करितो पाहावें. हें प्रकरण कसें असेल तें असो. बिलकूल पैसे न देतां कायदे पंडित बारिस्टरास तुह्मावर फिर्याद करितों अशी नोटिस सामान्य प्रतीचा वऱ्हाडांतला मनुष्य उगीचच्या उगीच देईल काय ?

---

## वर्तमानसार

मि० ली मेझरर जी आय पी रेलवेचे कन्सलटिंग इंजिनियर हिंदुस्थानांत सुमार २९ वर्षें कामावर होते. ते इजिप्त देशांत बदली झाल्यामुळें खेमारच्या आगबोटींतून मुंबईहून तिकडे गेले.

डा० डुगल साहेब यांणीं मद्रास इलाख्यांत रक्तपित्तीच्या रोगावर गर्जन तेल फार प्रशस्त आहे याविषयीं खात्री करून घेतली. अंडामान बेटांतही त्यांनीं त्याचा पुष्कळ प्रयोग करून पाहिला होता. मद्रास इलाख्यांत सरकारानें बहुतेक सर्व दवाखान्यांत तें तेल प्रचितीसाठीं ठेविलें आहे.

मद्रास इलाख्यांत दुष्काळानें त्रस्त झालेलीं मनुष्यें ब्रह्मदेशांत जीव जगविण्याकरितां जात आहेत. रंगुनचे पत्रांत याविषयीं संतोष मानिला आहे व तो पत्रकर्ता असें ह्मणतो कीं फार नाहीं तरी एक लाख लोक आल्यास आह्मांस पाहिजे आहेत.

अमेरिकेंतील हवाना देशाच्या उत्तम तंबाकूचें बीं ब्रह्मदेशांत लावून पाहिलें तर तेथेंही तंबाकू चांगला आला.

दिल्लीच्या दरबाराला एकंदर खर्च ५ लक्षांहूनही कमी लागला असें तयार झालेल्या कागदपत्रावरून समजतें. यांत सवा दोन लक्ष रुपये लश्करसंबंधाचा खर्च आहे. हे रुपये गुदस्तांच्या लश्करी बजेटाच्या पैकीं शिल्लक राहिलेले इकडे खर्चीं घातले आहेत. विलायतेस झालेल्या खर्चाची बरोबर रकम अजून समजत नाहीं तरी ती एक लक्षाहून अधिक असणार नाहीं असें ह्मणतात.

लार्ड स्यालिसबरी यांनीं कान्स्तंतिनोपल एथें चांगली कामगिरी बजाविली याजकरितां लंडनास त्यांचे आभार मानिले.

पाटणाहून गयेपर्यंत रेल्वे करण्याचा मार्गें विच्यार निघून तकूब झाला होता. हल्लीं तोच विच्यार पुन्हा सुरू झाला आहे. व भांडवल जमविण्याची तजवीज चालली आहे.

असें वर्तमान आहे कीं बडोद्याचे दिवाण सर टी माधवराव आपले पूर्वस्थानीं परत जाणार. व बडोद्याची दिवाणगिरी रा. ब. मणीभाई जसभाई यांस किंवा रा. ब. शंभूप्रसाद लक्ष्मीप्रसाद यांस मिळणार.

मद्रासेकडे कित्येक लोक उपासानें मेले रस्त्याच्या बाजूस आढळू लागले आहेत.

होळकर स्टेट रेलवे चोरळचौकीपासून महूपर्यंत आगष्ट महिन्यांत चालू होईल.

मद्रासेस मि. रामस्वामी मुदलियार व मि. कंबन रामस्वामी हे आपले खासगत खर्चानें अनाथीं लोकांस कामावर लाऊन त्यांस मदत करीत होते त्यांचे तें रिलिफ वर्क सरकारानें पोलिस मार्फत मना करविलें व त्यांत सरकारच्या रिलिफ कामास जे लायक असतील त्यांस तिकडे न्यावें असा हुकूम केला व म्युनिसिप्यालिटीस लिहिलें कीं सदहू गृहस्थांनीं आजपर्यंत केलेल्या धर्म कृत्याबद्दल त्यांचे आभार मानावे.

म्हैसूरचे हामराज वयांत येण्यास थोडा अवकाश राहिला आहे. हल्लीं बातमी आहे कीं दोन वर्षांचे आंत त्या संस्थानचा राज्यकारभार महाराजांच्या हातीं देणार व येत्या एप्रिल महिन्यांत सर्व हापिसें जीं हल्लीं बंगलोर एथें आहेत तीं म्हैसुरास नेणार.

शास्त्रीय ज्ञानापासून लाभ— कुऱ्हाडीनें वृक्ष तोडण्याची प्राचीन चाल आहे. परंतु नवीन शोधाप्रमाणे आतां कुऱ्हाडीची जरूर राहिली नाहीं. हल्लीं असें समजण्यांत आलें आहे कीं यंत्राचें अंगीं विद्युत सामर्थ्य ठेऊन त्याचे योगानें वृक्ष पाडतां येतो.

कलकत्त्यास चालू सालीं जी म्याट्रिक्युलेशनची परीक्षा झाली तींत चंद्रमुखी भोज नामक एका मुलीची परीक्षा उतरली. येत्या सालीं आणखी दोन तरुण मुली याच परिक्षेस जाणार आहेत. .नेओ.

म्हैसूर प्रांताचे कमिशनर मि. सांडर्स यांच्या बोलाविण्यावरून सर रिचर्ड टेंपल यानीं बंगळूर एथें गेल्या आठवड्यांत जाऊन दुष्काळ संबंधी हकीकत व स्थिति पाहिली असें समजतें.

सावंतवाडीचे सरदेसाई हे काठेवाडांतो राजकुमार कालेजांत गेल्या आठवड्यांत रुजू झाले. याच कालेजांत मुधोळ एथील राजेही जाणार आहे. सु. प.

अमदाबाद येथें २ री गुरखी पलटण आहे तिला सरहद्दीकडे जाण्याविषयीं हुकूम झाला असें ह्मणतात.

महाराज जोतेंद्रमोहन ठागोर यांस वैसराय व गवरनर जनरल यांच्या कायदेकौन्सिलचे सभासद नेमिलें असें कळतें,

चीनचे वकील लंडन येथें दाखल होऊन त्यांनीं आपलीं पत्रें राणीसाहेब यांस ता. ७ रोजीं सादर केलें.

रशियानें टर्कीशीं लढाई करण्याची जरूर नाहीं, कारण आंतील अव्यवस्थेनेंच त्या राज्याचा लवकरच नाश होईल असें रशियन वर्तमानपत्रांचें मत आहे. इं. प्र.

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| „ अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| „ दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिस.

बेशमी खंडु वल्लद रामजी पांडे वस्ती मौजे भेंडोल तालुके जळगाव जिल्हा अकोला यांस नोटिस देणार खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं माझे लग्न होण्यास कंपेस बारा वर्षें झालीं आहेत त्यांत तुह्मी मजला सात वर्षे पर्यंत आपले घरीं नांदविलें. व आज पांच वर्षांपासून तुह्मी मजला नांदवित नाहीं. व घरीं नेतही नाहीं. व पांच वर्षां पासून मी आपले बापाचे घरीं निर्वाह करीत आहे. त्याजला दरसाल खाण्या पिण्यापासून वगैरे बद्दल खर्च रुपये पंच्याहातर ७५ लागत आहेत. व मी माझे बापाचे घरीं किती वर्षे पर्यंत रहावें? या नोटिशीनें कळवितें कीं जर तुह्मास मजला लोक रीती प्रमाणें नांदावीणें असल्यास दरसाल पंच्याहातर रुपये बमोजीब पांच वर्षाचे तिनशें पंच्याहातर ३७५ रुपये खर्च झाला आहे करितां नोटिस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत माझा बाप निंबाजी मौनीराम देशपांडे वडनेकर याजला देऊन याची पावती घेऊन मजला आपले घरीं घेऊन जावें. जर या नोटिशींत लिहिले प्रमाणें न केल्यास मी आपले आई बापाचे येथें कोठ पर्यंत पोट भरावें? जर आठ दिवसांचे आंत निकाल न केल्यास मी नण रीती प्रमाणें गंधर्वाचा दुसरा भ्रतार करीन. मग याजबद्दल कांहीं तंटा वगैरे कराल तर तुमची कोणतेच गोष्टीची तक्रार ऐकली जाणार नाहीं. ही नोटिस लिहून दिली सही तारीख १४ फेब्रुवारी सन १८७७ इ.

सही सारजी मर्द खंडू पांडे
मुक्काम वडनेर भोलजी
निशाणी बांगडी.

## जाहिरनामा

तमाम लोकांस प्रसिद्ध करण्यांत येतें कीं कसबे अकोले येथील आठवडा बाजार रकवरसुलाचा मक्ता हरास करून दिला जाणार आहे व तो हरास तारीख २० माहे फेब्रुवारी सन १८७७ इसवी रोज मंगळवारी प्रातःकाळीं आठ वाजतां टौन हालात म्युनिसिपाल कमेटी समोर केला जाईल. ज्याची खुशी असेल त्यांनीं मुक्रर केलेल तारखेस. नेमले वेळीं सदहू ठिकाणीं हजर रहावें

मक्त्याच्या शर्ति व बाजार कराची दर वारी ह्याची माहिती हरासा पूर्वीं कळविण्यांत येईल. अधिक खुलासा पाहिजे असल्यास टौनहालांत कमेटीचे कचेरींत खालीं सही करणाराकडेस विच्यारला असतां पूर्वीं ही समजण्यांत येईल कळावे तारीख १३ फेब्रुवारी सन १८७७ इसवी.

खंडेराव बाळाजी फडके.
सेक्रटरी, म्युनि. अकोलें.

## जाहिरात.
## गोपिचंदनाटक
## हिंदुस्थानी भाषामे.

ये नाटककी पेहली अवृत्ति सब खलास होगई अभि लोगोकों मिलतीनही यही खातर इस नाटकका बनानेवालोनें नाटकमे सुधारके हामकों दुसरी अवृत्ति निकालनेकी परवानगी दियाहै. इसवास्ते हम सब लोगोको बिनोती करतेहै के पेहले ये नाटक सिला जंत्रपर छपायाथा अभि हम अपने छपाखानेमे ठसे छपेपर छपानेकी सुरवात कियाहै अंदर परवेस परवेस पर तसबिरों सुंदर डाराहै. यहीनुक छपाकर आवते मार्चमे तयार भयेगा इसवास्ते उसकी आवल देनेकी किंमत ०८ रखीहै, फेब्रेवारी अखेर तक आगली किंमत देना; अगे किंमत ०१२ पडेगी. अवल देनेवालेनें हमारे छपाखानेमे किंमत भेजदेना इतनी बिनोतीहै तारीख ३ फेब्रवारी सन १८७७ इसवी.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूके मालिक.

## जाहीरखबर.

### प्रश्नोत्तर संग्रह

माजिस्त्रेट व पोलिस परिक्षेसंबधी

सदहू पुस्तक आह्मी मराठी भाषेंत तयार करून छापीत आहों. या पुस्तकांत माजिस्त्रेट वर्ग २।३ व पोलिस इन्स्पेक्टर आणि चीफ कानस्टेबल यांचे परिक्षेस लागणारे कायद्यांतील मुख्य मुख्य कलमवार प्रश्न काढून त्यांचीं उत्तरें सादंत लिहून त्यास त्या त्या कायद्यांचीं कलमें दाखल केलीं आहेत. ज्या कायद्यावर यांत प्रश्न काढले आहेत ते कायदे—

१ पिनलकोड दुरुस्तीसह
२ क्रिमिनल प्रोसिजरकोड दुरुस्तीसह
३ पुराव्याचा आक्ट
४ डिस्ट्रिक्ट पोलिस आक्ट
५ गावचे पोलिसा बाबद आक्ट
६ गुरांचे अति क्रमणाबद्दल आक्ट
७ फटक्यांचा कायदा
८ जुगाराचा आक्ट
९ हत्यारें व युद्ध सामग्री करण्याबाबद आक्ट
१० निरुद्योगी भटकणारे युरोपियन लोकांकरितां आक्ट
११ सन १८७२ चा परमुलखांतील हुकमतीविषयींचा व परमुलखांतील अपराध्यांस त्याचे सरकारचे स्वाधीन करण्याविषयींचा आक्ट.
१२ वेड्यांचे आश्रयस्थानाविषयीं आक्ट

हें पुस्तक परिक्षेस जाऊं इच्छिणारे व माजिस्त्रेट व पोलिस लोक यांस फार उपयोगाचें होईल. सन १८७७ फेब्रुवारी अखेरचे आंत रोख पैसा पाठविणारांस दरप्रतीस २॥ रुपये व टपाल खर्च ६ आणे पडतील त्यानंतर घेणारांस दर प्रतीस ३ रुपये शिवाय टपाल खर्च ६ आणे पडेल ज्यांची हें पुस्तक घेण्याची इच्छा असेल त्यांणीं आह्मांस कलादगी एथें पोष्टपेडपत्रें पाठवावीं. टिकिटा पाठविणें त्या अर्ध आणा दराच्या वर्तीळ्या सुद्धां पाठवाव्या. पुस्तक मार्च महिन्याचे अखेरीस तयार होईल.

कलादगी ता. २५ जानेवारी १८७७ इ. } कल्याण शितारामचित्रे.

### छापखानेवाल्यांस सूचना

आह्मी छापखानेवाल्यांस अति नम्रतेनें कळवितों कीं आह्मी मराठी ग्रेटप्रायमर टैप व लेडी फार स्वस्त दरानें पुरवित असतों. ज्यांस विकत घेणें असेल अथवा दराची माहिती पाहिजे असेल त्यांनीं मुंबईत खेतवाडींत ५वे गल्लींत ९१ व ९२ नंबराचे घरांत आमच्या नांवें पत्र पाठवावें.

शामराव रणछोडरावजी
मिनरवा प्रेस.

मुंबई तारीख २९ माहे ज्यानेवारी सन १८७७ इसवी.

## जाहिरात

BANK OF BOMBAY
KHAMGAUM BRANCH.

खामगांव एथील मुंबई ब्यांकेची शाखा रुपये ५०० व ज्यास्त रकम नियमित मुदतीनें अमानत ठेवण्यास तयार आहे. व त्याबद्दलच्या शर्तींची माहिती खामगाव एथील ब्यांकेचे आफिसास अर्ज केला असतां मिळेल.

तारीख १४ माहे सप्तेंबर १८७६ इसवी.

Harry H. Bynes.
Agent

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प.

REGISTERED NO. 6, 1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला रविवार ता० २५ माहे फेब्रुवारी सन १८७७ इ० अंक ८

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ९ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## वसूल.

| | रुपये. |
|---|---|
| रा. रा. कृष्णाजी गंभीरजी काकड | ११०५ |
| ,, बळवंत आबाजी बेहेरे मास्तर | ६०८ |
| ,, शिवराम गड्याजी कुळकर्णी | ३०१२ |
| ,, गणेश गोपाळ कारकून | ९०४ |
| ,, चैनराम सुर्गलाल | ३०४ |
| ,, रामचंद्र धोंडदेव स्टेशनमास्तर | ९ |
| ,, गोविंदराज अप्पा तहशिलदार | ३० |
| ,, कृष्णाजी अनंत कारकून | १४ |
| ,, तुकासा पांडुसा साहू | ७ |
| ,, मारुती कृष्णाजी मास्तर | ३ |
| ,, विष्णु कृष्ण मास्तर | ३०४ |
| ,, बळीराम तुकाराम मास्तर | ३०४ |
| ,, गणेश श्रीकृष्ण खापरडे | २ |
| ,, मारुती बल्लद हणमंत पाटील | ६०८ |
| ,, सखाराम दत्तात्रय तहशिलदार | १० |
| ,, केशव लक्ष्मण मास्तर | ६०८ |
| ,, उमरावती लायब्ररी | १०१० |
| मि. नूरखान हिं. डि. इ. इन्स्पेक्टर | ७ |
| रा. रा. बाळकृष्ण केशव मास्तर | ६०८ |
| ,, बाळकृष्ण नारायण | ६०८ |
| ,, आनंदराव भवनराव देशमुख | ६०८ |
| ,, परशराम श्रीधर शिरस्तेदार | ९ |
| ,, राजे माधवराव शिवराम | ६०८ |
| ,, शेषाचल मुदलियार तहशिलदार | ६०८ |
| ,, किसन बल्लद चंद्रभान पाटील | ६०८ |
| ,, मुकुंदराव हरबाजी | १०१० |
| मे. नोटिस सा. स्मालकाज जज्ज | १४ |
| लायब्ररी इलिचपुर | ८ |
| मे० शख हिसामुद्दीन साहेब | ६०८ |
| ,, बाबूराव अबदोजी | ६०८ |

## नोटिस.

रामसिंग बल्लद भवानसिंग व रतनसिंग बल्लद सुजानसिंग रजपूत वस्ती अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी मिति आश्विन वद्य १२ रोज शनवार तारीख १४ अक्टोबर सन १८७५ इसवी रोजीं अकोट एथील शनवार बाजारांत ज्वारी लावणी खंडी ९० देऊं केली असून त्याचा भाव दर खंडीस १९ रुपये प्रमाणें घेण्याचें कबूल केलें व त्याच दिवशीं दर खंडीस १ रुपया प्रमाणें तह्मी प्रत्येकांनीं रुपये २९ पंचवीस २५ पंचवीस रोख इसारा बद्दल घेतले आहेत सदर्हू ज्वारी आमनेरी देण्याची कबूल करून अकोट एथें मोजण्याचा करार येत्या फाल्गुन वद्य ९ चा केला असून हे वर ठरलेल्या प्रमाणें लिहिलें करून देतों ह्मणून ह्मटलें. त्यानंतरून लिहिलें करून देण्या साठीं आजपावेतों हमेशा तुह्मास ह्मणत होतों परंतु ज्वारीचा भाव तेज झाल्यावरून दिले नाहीं. यावरून तुमचे मनांत बेमानी येऊन कपटीपणा मला दिसण्यांत आला. कारण हल्लीं माल वगैरे मोजण्याचा करार झाला नसून फक्त दस्तैवज करून देण्यास असें दाखविलें तेव्हां ज्वारी करारावर कशी मोजाल हें मला तर काय परंतु या कामांत दलाल लोक आहेत त्यांससुद्धां साकडें पडले आहे करितां ही नोटिस दिली आहे तर पावल्या तारखेपासून आठ दिवसांत ज्वारी देण्याचा करार जर पुढें भरण्याचा राहिला असल्यास लिहिलें करून द्यावें अगर करार संपेल तर ज्वारी मोजून देऊन राहिलेले तुमचे दर खंडीस रुपये अठरा हे द्यावेत याप्रमाणें न झाल्यास सदर्हू कारावर जो बाजारांत भाव राहील त्याप्रमाणें काटला जाऊन तुह्मावर ह्याच नोटिशीचे आधारें योग्य कोर्टांत दावा करण्यांत येईल व या नोटिशीचे खर्चासुद्धां पैसा घेण्यांत येईल हें खूप समजावें कळावें तारीख १६ माहे फेब्रुवारि सन १८७७ इ.

( सही ) कण्णुलाल बल्लद पुरणलाल
आगरवाले भुसारी रहाणार
अकोट निशाणी
खुद्द हातची.

## जाहिरात

BANK OF BOMBAY
KHAMGAUM BRANCH.

खामगांव एथील मुंबई बांकेची शाखा रुपये ५०० व ज्यास्त रकम नियमित मुदतीनें अमानत ठेवण्यास तयार आहे. व त्याबद्दलच्या शर्तींची माहिती खामगाव एथील ब्यांकेचे आफिसास अर्ज केला असतां मिळेल.

तारीख १४ माहे सप्तंबर
१८७६ इसवी.

Harry H. Hynes.
Agent

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

## वसंतपूजा

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. एका हिंदी पुस्तकामध्यें वसंत पूजे संबंधी चमत्कारिक मजकूर आढळला त्याचा तर्जुमा करून पाठविला आहे तो मजकूर छापण्याची मेहेरबानी व्हावी.

(यजमान आणि सर्वभट व मुद्रंभट येतात)

य.— महाराज यांचें नाव वसंतपूजा ?

स. भ.— महाराज यांत वसताची वसंतातच पूजा करितात. विशेषत: आह्मी पूर्ण वसंत नंदन आहे; कारकीं, तवकी बाईस २२ रुपये मिळाले, खत्रीना मिया यांस १९, लाट साहेबांसही १९ रुपयांची मोहर नजर, मोठे डाक्टर आणि वकील लोकांनही फीस तितकीच. गायन करणारे लोकांस १०, कवी लोकांस ९, चपराशी लोकांस २, कथेस १, पंडित लोकांस इमान सोडविण्य बद्दल ॥. परंतु आह्मास चवली, काष्टाची माळ, आणि बेल व फुकाचें चंदन घासरे नाऱ्या.

मु. भ.— सत्यं सत्यं आह्मी ओरडण्यांत कोणासी कमी नाहीं, आमचें शास्त्रही सर्वोपरी वेद इतक्यावर ही दशा

य.—बरें आज या समयानुसार एखादी संहिता ह्मणा. आह्मी विशेष दक्षिणा देऊ.

स. भ.— तर आरंभ करा मुद्रंभट

मु. भ.— हं हं मी ह्मणतो. सहस्त्रशीर्षा पुरुष: सहस्त्राक्ष:

स. भ.— अआंसहस्त्राक्ष: नेवंकुत्रास्ति

मु. भ.— स्वकार्य दर्शने, माभवतु प्रजा दर्शने, सहस्त्रपात ( रेलादीना ) सभूमीं सर्वतो वृत्वा अत्यतिष्ठद्दशांगुलं

स. भ.—हं हं. अत्यतिष्ठत्सद्धं त्रिहस्तं वा सप्तवितस्तकं

मु. भ.— पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यं

स. भ.— उतामृतत्वस्येशानोयदन्नेना तिरोहति

य०— सहस्त्रशीर्षाका अध्याय तो हमेंभी याद है. मत पढिये. दुसरा चरखा निकालिये.

मु० भ० तर ते नम: ह्मणा.

स० भ०— हो राज्ञेनम: बणिजेनम: गोरायच नमस्ताम्रायच नम: हूणायचनम: कपर्दिने नमोनम:

मु० भ०— नमश्वभ्य श्वपतिभ्यश्चवो नमोनम:

य.—हमें यह नमो नमो नहीं सुहातो.

स० भ०—तर देवता ह्मणा. गोरे देवता, हनुमान देवता, जाम्बुवान देवता, चद्रमा देवता:

मु भ —पुशादेवता, मृशादेवता, लबडदेवता, गोंडदेवता, गोदेवता सर्वभक्षकोदेवता.

स० भ०—अकन्नादेवता, स्वार्थदेवता, धंकादेवता, जोषादेवता, कोरादेवता

मु० भ०—लार्डदेवता, जज्जदेवता, माजिस्ट्रेटो देवता, पोलिस देवता, डाक्तरो देवता.

स० भ०—बंगलादेवता, सडको देवता, तारादेवता, धूम्रयंत्र देवता.

मु० भ०— इन्स्पेक्टरोदेवता, चीफ कान्स्टेबलोदेवता, नाजिरोदेवता, कान्स्टेबलो देवता, देव शक्ती चा वऊ.

स० भ— ईशावास्यमिदंसर्वं यत्किंचित जगत्या जगत्.

मु० भ०—मधु वाता ऋतायते मधुक्षरंति सिंधव: माध्वीर्न:संत्वो षधी: मधु ह्म० मधु

स० भ०— सलामश्चते, बंदगीचते, लाचश्चते, वर्गणीश्चते, अंडूश्चते, बालश्चते वत्सश्चते, राज्यंचते, पाटंचते, कलावंतीशस्यंचते, स्वच्छंद विहारश्चते, लक्ष्मीचते, विद्या चते.

मु० भ० रिसेप्शनश्चते, इम्युमिनेशनश्चते, स्वकृतश्चते, म्युनिसिप्पालिटीश्चते, जमाचते, दडश्चते.

स० भ०—वेतारिसश्चते, रुसूमश्चते, स्टांपश्चते, नजरश्चते, डालीचते, इनामश्चते.

मु० भ०— रेल तारेचा किरायाचते, इंग्रजी सवद्याचे दामश्चते, कापुसश्चते, करंचते.

स० भ०—एकाचते, बलंचते तन मन धन सर्वस्वंचते भवतु.

मु० भ० मूर्खताचमे, कायत्वंचमे, धक्काचमे गलचांडीचमे, हंसीचमे.

स० भ०—भ्रष्टताचमे, मुक्तताचमे, इंगलिश्चाईज्डत्वंचमे, बि. ए. चमे. एम ए. चमे.

मु. भ.—गर्वंचमे, कमेटीचमे, म्युनिपलकमिश्नरीचमे, आनररीमाजिस्ट्रेटीचमे.

स. भ.—खानाचमे, टिकटचमे, मद्यंचमे, हाटेलंचमे, लेक्चरंचमे.

मु. भ.—स्टारआफइंडियाचमे, कौन्सिलमेंबरत्वंचमे, उपाधिचमे.

स. भ.—दरबारंचमे, खर्चीचमे, मुलाकतंचमे, आनंरचमे प्रतिष्ठ चमे.

मु. भ. फूल्तेकपंचमे, हाफ्सिविलाइजडत्वंचमे, जितत्वमधत्वंचमे, बुटंचमे, शिफारसेन कल्पतां.

य.—श्रीजीये महाराज दक्षिणा कानकी मैल सब निकलगई अब नाद आतीहै बस धना.

दोघे—अहाहा या ओरडण्याचें फल तर हेंच होतें आणा आणा.

( सर्व जातात. )

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. आपल्या पत्र पद्यें खालीं लिहिलेला मजकूर छापाल अशी आशा बाळगतों.

इंग्रज सरकारचें राज्य झाल्यापासून रयतेस एक अमोलिक लाभ झाला. तो कोणता ह्मणाल तर विद्या मनुष्याला एक विद्या असली ह्मणजे तिजपासून राज्यास अनेक लाभ होतात. आतां विद्या शिकविणें हें सरकारास एकअंशीं भूषणावह होय आणि राज्यास बळकटी आणणारें मुख्य साधन होय. मनुष्यास विद्या आली ह्मणजे, त्याच्या हातून भयंकर खून, राजाविरुद्ध बंड हीं नाहींशी होऊन त्याच्या

मोबदला शांतता, मनाचे तर्क आणि कलेचा प्रसार इतके होतात. यास प्रत्यंतर. थोडे दिवसांपूर्वीं अलीशान रेसिडेंट साहेब बहादूर यांची स्वारी दिल्लीहून परत हैदराबादेस जाते वेळेस इकडे आली त्यावेळेस त्यांणीं देखील अशाच प्रकारचे बोल दर्शविले होते.

रेसिडेंट साहेबांनीं उमरावती एथील हायस्कूल आदिकरून कित्येक शाळा पाहिल्या त्यावेळेस त्यांणीं मास्तर लोकांस विचारलें कीं सरकारी विद्येचा लोक कितपत उपयोग करितात, त्यांस उतर मिळालें कीं रयतेपासून चांगलीशी मदत न मिळतां त्याचे हातून जितका विद्येचा प्रसार व्हावा तसा होत नाहीं. असो वऱ्हाडामध्यें शाळाखातें सुरू होऊन १२ वर्षे होत आलीं तितक्यावेळांत कां दोन हायस्कूलें न चालावीं? तर इकडच्या लोकांची समजूत अद्यापपर्यंत चमत्कारिक तऱ्हेची आहे ती सुधारण्यास आणखी बरींच वर्षे पाहिजेत. याजकरितां सरकारांनीं कांहीं तरीसक्तीची तजवीज केली पाहिजे. १८७१ पासून विद्याखात्यास कीड लागली आहे ती येणेंप्रमाणें–

या सालांत ग्रेडेशन झालें त्याजमध्यें शेकडा ९० इसमांचें नुकसान झालें त्यांत लोअरक्लास स्कूलमास्तरांचें फार व कित्येकांस तर असें झालें आहे कीं आजचा दिवस गेला उद्याचा कसा जातो. कारण दक्षिण प्रांतीं दुष्काळ पडल्यामुळें पुष्कळ लोकांचीं कुटुंबें तिकडे असल्यामुळें त्यांस अन्न मिळण्याची पंचाईत झाली आहे. आतां ३०।२५ रुपये पगार फार आहे असें ह्मणतां येत नाहीं. कारण दोन अगर तीन इसम देशीं जाऊन परत येण्यास ५० ६० रुपये आगगाडीस खंडणी द्यावी लागते. मग एवढ्या पगारामध्यें १०।५ मनुष्यें पोसणें किती अडचणीची गोष्ट आहे याचा विचार करण्यास्तव आपणाकडे सोपवितों.

इतके दिवस आपणास साक्षात राजा नव्हता तो आतां मिळाला व त्याजपासून कित्येकांस कित्येक प्रकारचे फायदे झाले. ते असे:—तोफांची सलामी, राव बहादूर इत्यादि पदव्या. पण वर्तमानपत्रांतून सूचना सातारा, नागपुर, लखनौ आणि वऱ्हाड हीं राज्यें ज्यांचीं त्यांस परत देण्याविषयीं झाल्या होत्या तसें कांहीं झालें असतें तर चिरकाल नाव राहिलें असतें, तसें पदव्यावगैरेंनीं होणें नाहीं. अलीकडे नेटिवांस मोठ्या हुद्याच्या जागा देण्याचें घाटत आहे पण पगार युरोपियनापेक्षां पाऊणपट मिळणार! याचें कारण काय असेल तें असो.

ता० १२।२।७७. एक क्ष.

---

## वऱ्हाडसमाचार

मिति फाल्गुन शुद्ध १२ शके १७९८

---

## वऱ्हाडांतील वकिलाविषयीं.

आलिकडे ३।४ आठवडे झाले, वऱ्हाडांतील वकिलांविषयीं एथल्या व मुंबईच्या वर्तमानपत्रांतून चर्च्या चालू झाली आहे. प्रथमतः नेटिवओपिनियन मध्यें एक आर्टिकल आलें त्यांत जुडिशियल कमिशनर यांस कांहीं दोष दिला होता; पुढें याच संबंधानें टाइम्स अफ इंडिया मध्यें एक लांबलचक पत्र आलें त्यांत वकिलांची खूप निंदा करून जुडिशियल कमिशनर साहेबांस खुलविलें होतें; नंतर पुन्हा गेल्या आठवड्याच्या नेटिव ओपिनियन पत्रांत व एथच्या पत्रांत त्याच्या संबंधानें लेख आले मिळून हा प्रकार बराच वाढला; दोन आठवड्यांपूर्वीं आह्मीही या मजकुराचें दिग्दर्शन केलें होतें ह्मणून आज कांहीं आणखी विशेष लिहावें असा आमचा इरादा नव्हता, इतक्यांत "एक वकील" या सहीचें आह्मांकडे मुद्दाम पत्र आलें व त्यांनीं सरळ आणि संभावितपणानें दोन गोष्टी लिहिल्या आणि त्यांविषयीं आग्रहपूर्वक आमचें मत मागितलें ह्मणून आह्मी संतोषानें "वकील" यांचें पत्र एथेंच प्रसिध्ध करून त्या संबंधानें दोन शब्द लिहितों:–

"रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:–

वि. वि. अलीकडे टाइम्ससारख्या पत्रांतून सुद्धां वऱ्हाडांतील वकिलांविषयीं मजकूर येऊ लागला आहे पण त्यापासून खरी स्थिति कोणास न कळली जातां भलभलते लेख बाहेर पडूं लागले आहेत याजबद्दल वाईट वाटतें.

वऱ्हाडांतील वकील लोक मुंबईच्या किंवा इतर हायकोर्टांतील वकिलांप्रमाणें विद्वान नाहींत हें मी कबूल करतों. परंतु सर्व देशांत जिल्ह्यांतून जसे वकील आहेत त्यांहून इकडील वकील वाईट ठरतील असें नाहीं. सर्व देशांत सर्व वर्गांचे लोकांत उत्तम, मध्यम, आणि कनिष्ठ अशा ३ प्रति आहेत, त्या पलीकडचें प्रमाण ह्या प्रांतांतील वकिलांविषयींचेंच नसावें असें मी समजतों. आतां हें खरें आहे कीं ह्या १।२ वर्षांत ह्या प्रांताचे वार्षिक रिपोर्टांत वरिष्ठ अधिकारी यांनीं वकिलांविषयीं आपलें मत चांगलें दिलें नाहीं. परंतु त्यांचें मत खंडन करण्याची वकिलांस त्यांच्याप्रमाणें अप मुखत्यारीची संधी नाहीं त्यामुळें अधिकारी जें लिहितील तेंच बाहेरचे लोकांस खरें वाटणार. तथापि माझी आपल्यास विनंती अहे कीं इकडील वकील हल्लीं अधिकारी ह्मणतात तितके वाईट आहेत किंवा नाहींत याविषयीं आपण मे. लायल साहेब, जे सिव्हिलियन होते व ज्यांच्या शहाणपणाविषयीं कोणास काडीमात्र शंका नाहीं त्यांच्या वेळचे सन १८६९।७० सालचे वार्षिक रिपोर्ट पाहून निवड करावी. व त्याप्रमाणें सन १८७१ सालचे पश्चिम आणि पूर्व वऱ्हाडचे कमिशनर यांचेही रिपोर्ट पहावे ह्मणजे वकिलांची खरी स्थिति दिसून येईल व ते त्या वेळेस चांगले होते तर आतां ४ वर्षांच्या अधिक अनुभवानें सृष्टीच्या साधारण क्रमाविरुद्ध खरोखरी वाईट झाले किंवा काय? याजविषयीं आपल्यास स्पष्ट मत देतां येईल.

या शिवाय माझी आपणास आणखी अशी विनंती आहे कीं जर आज एथील वकिलांच्या स्थितीविषयीं इलाख्याचे सरकार विच्यार करतील तर त्यांनीं खालीं लिहिल्या प्रमाणें आपली खात्री करून घ्यावी.

१ एक तर प्रत्येक जिल्ह्यांतून १०।२० असे अव्वल व अपील कोर्टांतील दुतर्फा मुकद्दमे आणवून त्यांत वकिलांच्या वेडेपणाविषयीं कांहीं रिमार्क आहेत कीं काय व त्यांनीं चालविलेलें काम शिस्तवार आहे किंवा नाहीं हें पहावें.

२ जर असें होत नसलें तर बाहेर प्रांतांतून एखादा स्वतंत्र न्यायाधीश आणवून एक वर्ष किंवा सहा महिने इकडे नेमावा व त्याचे हाताखालीं एथील वकिलांस कामें करूं द्यावीं व त्यानें त्यांचे गुण दोषांचा निकाल करावा.

ह्या प्रमाणें पडताळा पाहून जर १०० पैकीं ७५ मूर्ख ठरले तर सर्वच मूर्ख आहेत असें बेलाशक ह्मणावें, परंतु अशा प्रकारची कांहीं खात्री करून घेतल्या शिवाय उगीच साप साप ह्मणून भुयी बडवावी आणि एका निराश्रित धंदेवाल्या समूहावर गहजब करून त्याची अब्रू खराब करावी हें थोरांस विहित नव्हे. सारांश आपण हें पत्र छापून आपलें स्वतःचें मत वरिष्ठांस कळवावें अशी माझी इच्छा आहे. कळावें लोभ करावा ही विनंती.

एक वकील"

सदरील पत्रांत लिहिलेले रिपोर्ट आह्मी मुद्दाम मिळवून आणून सन १८६९।७०।७१ सालचे समग्र वाचून पाहिले. त्यांतील सन १८७०सालच्या रिपोर्टांत तर मे० लायल साहेब स्पष्ट कबूल करितात कीं ताब्यांतील कोर्टांतून दिवाणी काम चालविण्यांत बरीच सुधारणा झाली आहे व ह्या सुधारणेस वकील लोक अंशतः कारण आहेत. मे० अलाडाईस साहेब व मे० हडल्स्टन साहेबही सन १८७१ सालांत ह्मणतात कीं वकील लोक सुधारत चालले आहेत. यावरून खरोखरच सन १८६९ पासून १८७१ पावेतों जर कमिशनर साहेबांस वकील लोक सुधारत चाललें असें दिसत होतें तर तेच वकील आतां निरुपयोगी झाले असें मे. कमिशनर साहेबांस कशावरून वाटतें तें आह्मांस कळत नाहीं. वकिलांचे अंगीं गुण जे असावयाचे त्याचें प्रमाण अलिकडेस बदललें असल्यास न कळे.

टाइम्सच्या बातमीदाराचें ह्मणणें तर आह्मास सर्वथैव खोटें वाटतें. तें पत्र कुटाळपणानें लिहिलें असून तसें लिहिण्यांत त्याचा कांहीं तरी हेतु असावा यांत संशय नाहीं. त्याचप्रमाणें ह्या बातमीदाराचे लिहिल्यावरून व सन १८७५ च्या रिपोर्टाचे लेखावरून गेल्या आठवड्यांत नेटिवओपिनियन कर्त्यांनीं आपलें जें मत दिलें तेंही त्यांनीं दुरुस्त करावें अशी आमची त्यास शिफारस आहे. आह्मी आशा करितों कीं अलिशान रेसिडेंट साहेब आतां हा तंटा मिटवितील. व इकडील वकील खरेच वाईट असल्यास चांगले वकील इकडेस नेमतील. आणि इकडे आहेत हे वकील लोक टिमकी पिटली गेल्याप्रमाणें नालायक नाहींत तर तशी आपली खात्री करून घेऊन पाहिजे असल्यास बाहेर प्रांतांतील लोकांसही इकडे येऊन वकिली करण्याची परवानगी देतील किंवा इकडें एखादी परीक्षा घेऊन कांहीं नवे वकील करितील आणि जुन्यांचा ही बूज करितील तर फार चांगलें होईल. आमचे असें ह्मणणें आहे कीं एखादा वर्ग खरोखर वाईट असल्या वाचून त्यास उगीच वाईट ह्मणूं नये व तसेंच प्रांताचे मुख्याधिकारी साहेब बहादूर यांचें मत असेल व तें तसें प्रगट करितील अशी आमची इच्छा आहे.

---

(Communicated)

In an adress presented to the Viceroy by the deputation of the Native Press at the Delhi assemblage it was stated with a degree of prominence which precluded the possibility of mistaking its drift, that though in some cases it became the onerous duty of the press to give adverse opinions, about the acts of government, still it was perfectly loyal. It is not two months since that event, but we must raise our voice against a step now about to be taken by our Local government, and thus give rise for the first time this year to a case to be included in the clause alluded to.

It has been urged with what degree of truth we shall presently notice that Dr. Sinclair established high scools, and commenced his educational operations on a grand scale rather too early for the general state of Berar. If education is a blessing and that too, one, which shuld be first of all conferred upon a people in order to make them capable of enjoying the numerous benefits of civilization coming after it, we confess, we fail to see how Berar should be considered to be disqualifide by its general state to receive the procursor of all civilization and human wisdom, when it might be said in its favour that there were already a few Anglo-Vernacular Schools in a tolerably good state, before Dr. Sinclair arrived.

These observations we thought it necessary to make as prefatory to our views about the abolition of the Oomrawattee High School. We have no hesitation in saying that the step is unjust and highly injurious to the general interests of the province. The penetrating mind of the late Director of public Instruction, at once perceived that the educational wants of a large province like Berar, so fertile, and so well populated, would soon exceed those suplied by one high school and a few middleclass schools. He therefore, with his characteristic wisdom aud farseeing policy established two High schools, a number of middle class schools, and that of Lower class school, still more numerous.

he watched the growth of this new plant he thought it so likely to bear friuts, that two years after he asked for scholarships to support studentsat the University of Bombay, and now to his laudable exertions, we are happy to see, is due the study of many students at Elphinstone and Dec, can Colleges. We for a moment can not think that a gentleman of his attainments and experience, would have mistaken, the indefferant supply of students in the schools under his care, for a hope ful, much less a prosperous one. Also it is dificult to think that our high schools have not been well attended, when we find that the sister-high-schools,at Ratnagiri, Dhulia,and other places do not impart education to a collection of more numerous students than ours do. Moreover on a comparison of the results of our high schools, with those of many others, even of a longer standing, in the Bombay University it does not appear, that ours have sufferd in the contest They have generally passed a good number of students in the Matriculation examination, and last year in the general pluckage, have kept pace, with many acknowledgedly well managed rivals.

Further it should be considered that the rich population of Berar, affording leisure, with the growth of taste of learning shall be sending a constant increasing number of young men to our schools. It appears from this that the career of our High schools, already creditable in the past is destined to be prosperous and bright in the future. This opinion derives additional strength by a consideration of the some-what parallel cases of the comparatively poorer districts of Konkan.

Abolition of a High School, therefore, now, at a time when the desire for learning is daily fast increasing, is, in our opinion, as inexpedient and injurious as ( to use a figure ) lopping off the main branches of a useful tree, which we have previously taken pains to plant in a hopeful land, just at a time when it is likely to blossom. Our conclusion we feel sure can be supported by arguments drawn from many parallel instances, and the subject deserves to be treated in a more comprehensive manner, with greater leisure and space at command, but we are sorry among other matters, we can not at present afford to devote more space to this. In the course of events if necessary we shall revert, but in the mean time hope that our Local authorities, will consider all the objections and the consequent injury to the people, before taking a step so serious as the abolition of one of the most useful institutions in Berar. In the present matter, we can very confidently hope to be favourably considerd, particularly as the gentleman presiding over the educational department here, is a native, and who else could be expected to under-stand the wants of the natives better than one, who is of the same nation, born among them, brought up among them, thinking as they do, and probably acting as they would have done. Great as is the freedom under the British rule, we account having native high officials no small element in it, and Berar it appears is shortly to have the benefit of this by the kindness inherent in the chair of the late lamented Dr. Sinclair, and is thus destined to exhibit the pleasing spectacal of [ to continue our former metaphor] possessing an exotic planted by a kind foreigner and preserved by the zeal and care of the natives, through the all protecting hlep of Providence.

---

### जानेवारी महिन्यांतील पिका पाण्याची व रोगरायीची हकीकत.

अमरावती.— खरीप धान्याची मळणी बहुतेक पुरी झाली, कापसाचा तिसरा वेचा चालू आहे. अलीकडे हवा फार वाईट झाल्यामुळें कांहीं शेतांतून रबीच्या पिकाचा खराबा झाला असे रिपोर्ट झाले आहेत. कांहीं गावांतून थंडी, खोकला आणि ताप यांच्या योगानें पुष्कळ लोक बेजार आहेत. गुरांना कांहीं रोग नाहीं.

इलिचपुर.— पिकें चांगल्या स्थितींत आहेत. ज्वारी आणि तूर यांची मळणी सुरू आहे. लोकांचें आरोग्य चांगलें आहे, व गुरांसही कांहीं रोग नाहीं. हवा थंड आहे.

वणी.— रबीचा हंगाम उत्तम दिसत आहे. तूर काढणें व कापुस वेचणें अजून चालू आहे. हिवतापाची सांथ सर्व जिल्हाभर आहे. जनावरांनां खुराचा रोग झाला आहे. हवा थंड असून मधून मधून उकाडा होतो.

अकोला.— नुकताच अवकाळीं पाऊस पडल्यामुळें रबीच्या धान्याचा खराबा झाला. जळगाव तालुक्या शिवाय जिल्ह्यांत आरोग्य चांगलें आहे. व जळगावाकडे देवीची सांथ आली आहे, हवा थंड आणि साभ्र असते.

बुलढाणा.— खरिपाची सुगी तमाम पुरी झाली. नुकतीच जी पर्जन्याची आणि गारांची वृष्टी झाली तिच्या योगानें बहुतंक रबीच्या पिकाचा खराबा झाल्याचे रिपोर्ट आले आहेत. मुलें देवीनीं आजारी होतात व मरतात. गुरांनां कांहीं रोग नाहीं. हवा सर्द आणि साभ्र आहे.

वाशिम.— अवकाळीं पाण्याची व गारांची वृष्टी झाल्यामुळें कांहीं भागांत रबीचीं पिकें थोडथोडीं खराब झालीं आहेत. लोकांस आरोग्य चांगलें आहे. जनावरांस मुखरोग झाला आहे. हवा साभ्र आहे.

## वऱ्हाड

मि० नौलिस साहेब स्माल काज कोर्टाचे जडज बुधवारीं विलायतेस जाण्याकरितां येथून गेले.

---

रा. रा. रामसेवक दीनदयाळ हैदराबादेस नोकरीवर आहेत ते कांहीं प्रकृतीच्या संबंधानें एथें येऊन वडनेरास आपले घरीं गेले.

---

रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण भट अडगावाहून भंडाऱ्याचे आपले बंधूस भेटण्याकरितां शुक्रवारीं एथें आले आहेत ते आज परत जातील.

---

मे० बाकरअली आनररी माजिस्त्रेट यांची एथील तहशिलदारीवर नेमणूक झाल्याप्रमाणें गेले रविवारीं ते एथें येऊन सोमवारीं कामावर रुजू झाले.

---

अकोला शहरचे बाजार बैठकीचा एक वर्षाचा मक्ता १८२९ रुपयांस ब्यहारीलाल पंचगव्हाणकर यांनीं घेतला.

---

रा. रा. त्रिंबकराव यशवंत मलकापुरचे तहशिलदार एथील साहेब लोकांस लग्नाचें आमंत्रण देण्याकरितां गुरुवारीं एथें आले होते व ते पुढें राजुऱ्यास गेले.

---

बाळापुरास रा. रा. गोविंदराव यशवंत तहशिलदार यांचे रजेंत काम पहाण्यास उमरावतीहून रा. रा. गिरराव रामचंद्र डिपुटी क्लार्क हे आले.

---

मि० म्याकिंटाश साहेब उमरावतीच्या हायस्कुलावरील हेड मास्तर जबरीच्या संभोगाच्या खटल्यांत आरोपी होते परंतु त्यांवर शाबिदी न झाल्यामुळें ते दोषमुक्त होऊन सुटले गेले. बिच्यारे दैववान!

---

पुणेंकर रा. रा. गणेश वासुदेव जोशी यांचे बोधानें देशहिताविषयीं झटण्याचें बरेंच बीजारोपण अकोल्यास झालें आहे व सभा चालू आहेत. उद्या एक टोलेजंग सभा होणार आहे तिची हकीकत पुढें कळेल.

---

रा. रा. बापुजी रंगनाथ मलकापुरचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर रजेवर गेले त्यांचे जागेवर बुलढाण्याहून रा. रा. श्रीकृष्ण नरहर यांस नेमिलें. व बुलढाण्यास उमरावतीहून मि० थामसन साहेब हे गेले.

---

दर्यापुर तालुक्यांतील पांढरी या गावच्या एका पाटलानें शाळा बांधण्याकरितां २१० रुपये दिले असें उ. अ. वरून कळतें. आह्मी या पाटलाची सदरहू कृत्याबद्दल तारिफ करितों.

---

एथील ओव्हरसियर रा. रा. विठ्ठल सखाराम हे उपदंशाने बरेंच दिवस आजारी होते त्यास शुक्रवाररोजीं देवाज्ञा झाली.

---

नागपुरचे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. यशवंत आनंदराव उदास हे क्षयानें आजारी होते त्यांची प्रकृति रा. रा. रामभाऊ गोरे सातारकर वैद्य यांनीं नागपुरास जाऊन पाहिली व औषध देण्याकरितां त्यास बरोबर घेऊन ते पुण्यास गेले. त्यांचा एक दिवस एथें मुक्काम होता. गोरे यांस यश येऊन यशवंतरावास आरोग्य होवो असें आह्मी इच्छितों.

---

पंजाबांत एक उदाहरण [illegible]डल्यावरून ठराव झाला कीं म्युनिसिप्[illegible]टीनें आपल्या कोणा कामदारास योग्य वर्तणुकीकारितां बक्षिस देण्याचा ठराव कमिशनरचे मंजुरातीशिवाय करीत जाऊं नये. व एक वर्षाच्या पगाराहून अधिक बक्षिस इलाख्याच्या अधिकाऱ्याचे मंजुरातीशिवाय ठरवू नये.

---

सरकारी पाकिटावर ज्यांनां सह्या करण्याचा अधिकार आहे त्यांनीं टाइपानें छापलेल्या सह्या पाकिटावर केल्यास त्या चालणार नाहींत असें पोस्टमास्तर जनरलचें सर्क्युलर झालें आहे. व याच धोरणानें आतांशां रेसिडेंट साहेबांचे आफिसांतून मि० प्यारो साहेबांचे छापील सहीचीं पूर्वींचीं कव्हरें त्यावरील छापिल सही खोडून हातानें दुसरी सही केलेलीं येत असतात असें आढळण्यांत आलें.

---

मि. आर डी हेर आफिशियेटिंग थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर यांस एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

---

अकोल्याचे स्मालकाज कोर्टाचे जज्जास सन १८६९ चा आक्ट ११ कलम ९१ प्रमाणें पाचेव प्रतीचे सबार्डिनेट जज्जाचे व नादारी कोर्टाचे अकोला जिल्ह्यांत अधिकार दिले.

---

बाळापुर दवाखान्यावरील आस्पिटल असिस्टंट सरफराज अली यांस ३ महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

---

कारंजा एथें सयद नासरुदीन यांस स्पेशियल माजिस्त्रेट नेमिलें व तिसरे क्लासचा त्यांस अधिकार दिला.

---

मेसर्स प्रिव्होस्ट आणि बालंटैन फारेस्टकडील थर्ड क्लास असिस्टंट कान्सर्वेटर यांस सेकंड क्लास केलें.

---

उमरावतीच्या म्युनिसिप्यालिटीनें ठराव केला कीं उमरावतीच्या बाजारांत जीं गुरें विकावयास येतील त्यांजपासून एकेक आणा प्रमाणें कर घ्यावा, व शेळ्या मेंढ्या बोकड यांपासून तीन पै घ्याव्या. रेसिडेंट साहेबांनीं ही गोष्ट मंजूर करून एप्रिलपासून अंमल करण्याचा हुकुम दिला.

---

वाशिमचे आनररी सर्जन डाक्टर व्ही ई आर आर्डींग यांस लश्करी खात्याकडे दिलें व त्यांचे जागेवर नेटिव डाक्टर ई. पी पुनु स्वामी पिले यांस नेमिलें व ते पहिले तारखेपासून काम पाहूं लागले.

---

विलायतेंत रायल इंडियन इंजिनियरिंग कालेजमध्यें पास झालेले कांहीं लोक सेकंड ग्रेड असिस्टंट इंजिनियर करून स्टेट सेक्रेटरी यांनीं हिंदुस्थानांत पाठविले त्यांपैकीं इकडे ह्मणजे हैदराबाद प्रांतास दोघांची नेमणूक झाली आहे. त्यांचीं नावें मि. एम पी कुडी आणि मि. एम जे स्कोबी.

---

मि. आर एस डाब्स पश्चिम वऱ्हाडचे असिस्टंट इंजिनियर यांस १ महिन्याची तयारीची व १९ महिन्यांची विलायतेस जाण्याची फर्लो रजा मिळाली.

---

मि. जी ई अगर पश्चिम वऱ्हाडांतील ओव्हरसियर यांस ता. १९ मार्चपासून ३ महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

दिल्लीचें कालेज बंद करण्याचा सरकारानें ठराव केला.

सीवाच्या राजास गादीवर बसविण्याचा समारंभ करण्याकरतां जलंदरचा कमिशनर कानग्रा येथें गेला आहे.

रोमानियांत एकंदर ४०,००,००० लोकवस्ती असून त्यांतील धान्य बाहेर जाण्याचें बंद झाल्यास आणखीं तितकेच लोक त्या देशांत राहूं सकतील सबब मधांत आणल्यास त्या देशांत २,५०,००० फौज ठेवण्यास रशियास कांहीं कठीण नाहीं असें एक इंग्रज वक्त सिद्ध करतो.

दुर्गाव विहार यांच्या संबंधाने कांहीं गुप्त कागद व मध्यएशियांत जाण्याकरतां टर्कीहून आलेल्या कांहीं लोकांबद्दलची गुप्त माहिती अशी सरकारी दप्तरांतील माहिती पायोनियर पत्रास कळल्यावरून गव्हरनरजनरल यांणीं याचा विचार करावा व सर्व पत्रांस सारख्या रीतीनें माहिती देण्याची तजवीज करावी असें इतर इंग्रजपत्रकर्ते ह्मणूं लागले आहेत.

सारखी प्रतबंदी करण्याकरतां आपल्या सर्व राज्याची पैमाष करण्याचा काबूलच्या अमिराचा बेत आहे. नूर महमद यास सर पेलीकडून काय जबाब मिळतो हें पाहाण्याकरतां रशियन वकील अद्याप काबूलास आहे. वेहाबी लोकांनीं आपलें सामानसुमान काबुलास पाठवून देऊन लढाई करणें झाल्यास आह्मी तुह्मास मदत करण्यास तयार आहों असें अमिरास कळविलें आहे व त्यांचें तें ह्मणणें अमिरानें खुषीनें कबूल केलें. कोहताकडे जाणाऱ्या रस्त्याचें चांगल्या रीतीनें संरक्षण करण्याचा पेशावरच्या कामिशनरानें हुकूम केला आहे.

गुरुवारीं मुंबईकायदकौंसल भरून सक्तीनें देवी काढण्याचें बील दुसऱ्यानें वाचलें व कापसांत भेळ न करण्याबद्दलचें बील पुढें आलें.

सर टेंपल यांचें दुष्काळाच्या प्रांतांत फिरण्याचें काम आटोपलें सबब पुढें कशी काय तजवीज करावयाची याचा विचार करण्याकरतां ते लवकरच गवरनरजनरलकडे जाणार आहेत. अ. द.

आगगाडीवर नेटिव कामगार नेमण्याची आवश्यकता व उपयोग— औंद व रोहिलखंड रेलवेच्या रस्त्यावर ता० २९ जानेवारी रोजीं सकाळीं एकवाजतां उतारू लोकांची गाडी भरधाव चालली असतां अजी स्टेशनापासून दो मैलांवर रस्यामध्यें झाडाचें एक मोठें ओंडकें पडलेलें होतें. त्यावेळस चांदणें होतें याजमुळें गाडी हाकण्याच्याकामावर कोटजी मेहेरमसजी हे होते यांनीं तें पुढें पाहून भरधाव चाललेली गाडी थांबविली. परंतु ती अगदीं थांबे तों यंत्राचा पुढचा खालचा भाग त्यास येऊन हळूच लागला. मग त्यानें तें ओंडकें ओढवून टाकून गाडी पूर्वत चालू केली. याजवरून त्या पार्शी गाडी हाकणाराच्या हुशारीविषयीं व बारीक नजरेविषयीं स्तुति करणें अवश्य आहे. युरोपियन हाकणारा इतका जपून हाकता किंवा कसें याचा मोठा संशयच आहे. याजवरून नेटिव गाडी हाकणार रेलवेवर नेमणें कितीं अवश्य व उपयोगी आहे हें स्पष्ट होतें. इं. प्र.

## षड्दर्शनचिंतनिका

या नावांचें एक मासिक पुस्तक सहा शास्त्रांची माहिती लोकांस करून देण्याकरितां नुकतेंच निघूं लागलें आहे. त्याच्या दुसरे अंकांत कोटिक्रमाचा चमत्कार आह्मांस आढळला तो आह्मी आपले वाचकांकरितां एथें घेतों:—

पुढील वादावरून उपलक्षणन्यायसरणीचें स्वरूप नीट समजेल. स्वप्नांत जें ज्ञान होतें तें निराधार आहे, ह्मणून सर्व ज्ञान निराधार आहे. याकरितां जाग्रत्समयीं जें ज्ञान होतें तें सहजच निराधार ठरलें, असा वेदांताचा पूर्व पक्ष आहे. यावर समाधानः—पण जाग्रत्समयीं ज्ञान निश्चयात्मक असतें, ह्मणजे त्यांत विपर्यय होत नाहीं. यावर पूर्वपक्षः—जागे होण्यापूर्वीं स्वप्नांतील ज्ञानही निश्चयात्मकच असतें, यावरून जाग्रदवस्था आणि स्वप्नावस्था ह्या दोहीं ध्यें भेद नाहीं. यावर समाधानः—असें नव्हे. स्वप्नांतील ज्ञानांत विपर्यय होतो. जाग्रत् स्थितींतील ज्ञानांत विपर्यय होत नाहीं. यावर पूर्वपक्षः—जाग्रदवस्था असो, कीं स्वप्नावस्था असो, उपलक्षणाच्या सहाय्यानें स्वप्नानुभवावरून सर्वज्ञान मिथ्या असें ह्मणणें आहे. या न्यायप्रयोगांत ज्ञान हा हेतु आहे. न्यायप्रयोगाची मांडणी हीः—जेथें जेथें ज्ञानत्व आहे, तेथें तेथें मिथ्यात्व आहेच; जसें स्वप्नांत. ह्मणून जाग्रत्समयींचें ज्ञानही मिथ्या आहे. यावर समाधानः- स्वप्नज्ञानाचा विपर्यय दिसून येतो, व त्या विपर्ययाची उपपत्तिहि करतां येते. निद्राग्रस्त मन झालें ह्मणजे तें दुर्बल होतें. आणि या दौर्बल्यामुळें स्वप्नांतील ज्ञान विपर्यय पावतें. या कारणास्तव वरल्या न्यायप्रयोगांत स्वप्नज्ञानाचा दृष्टांत सदोष आहे. तसेंच सुषुप्तिकालीं कोणत्याही प्रकारचें मुळीच ज्ञान नसतें. यास्तव जाग्रत्समयींचें ज्ञान मिथ्या नाहीं. यावर पूर्वपक्षकाराचें ह्मणणें:—कांहीं कारणामुळें ज्ञानाच्या करणरूपी साधनांत दोष होतो. जसें, डोळ्यांनीं नीट दिसत नाहीं. करणदोष जर झाला तर समजेल. स्वप्नसमयीं दोष समजत नाहीं, याकरितां स्वप्नसमयींच्या ज्ञानीं दोष नाहीं. यावरून स्वप्नसमयींचें ज्ञान मिथ्या नाहीं. यावर समाधानः—जागें झाल्यावर माझें मन निद्राग्रस्त होऊन सदोष झालें होतें, असें ज्ञान होतें, ह्मणून दृष्टांतावरचा दोष कायम राहिला. याकरितां जाग्रदवस्थेंतील ज्ञान निश्चयात्मक आहे ह्मणजे जग मिथ्या नाहीं असें अनुमान सिद्ध होतें. हा वादविवाद आह्मी मासल्याकरितां घेतला आहे, आणि जगत् मिथ्या नाहीं पण सत्य आहे हा मीमांसकांचा सिद्धांतही लक्षांत ठेवण्याजोगा आहे.

---

## युरोपांत तूर्त स्वस्थता रहाण्याचीं चिन्हें.

युरोपांतील राजकारणाचें वस्तनीक व नाहीक धोरण युरोपांत असणाऱ्या किरेक मोठ्या व अनुभविक दरबारी पुरुषांस देखील कळण्याची पंचाईत आहे. मग आमच्या सारख्या दूर व केवळ वर्तमान पत्रांतील बरवाऱ्या कळलेल्या गोष्टीवरून अनुमान करणाऱ्या अनभ्यस्त लोकांस त्याचें यथार्थ ज्ञान होणें अशक्यच आहे. तथापि आमच्या साधारण समजुतीप्रमाणें आह्मीं आपलें अनुमान वाचकांपुढें ठेवतो.

युरोपांतील बहुतेक सर्व ख्रिस्ती सरकारांची इच्छा तुर्कस्थानांतील मुसलमानांची राज्यसत्ता नाहींशी करावी अशी आहे. परंतु प्रत्येक निराळ्या सरकारास आपला स्वतांचा कांहीं डाव त्या राज्याच्या नाशांत साधून घ्यावयाचा आहे. आतां तुर्कस्थानांतील राज्याच्या वऱ्या वाइटांत हिताहित व निकट संबंध वस्तुतः आस्त्रिया व रशिया या देशाचा आहे आणि याच्या खालोखाल परंतु पर्यायानें ह्मणजे हिंदुस्थानच्या संबंधामुळें इंग्लंडच्या हिताहिताचा संबंध आहे. बाकी इतर राष्ट्रांस प्रत्यक्ष तुर्कस्थानांतील अथवा त्या संबंधानें दुसरा कांहीं तरी लाभ साधून घ्यावयाचा आहे. याशिवाय आणखी एक मोठी महत्वाची गोष्ट कळवावयाची आहे कीं मागें ज्याप्रमाणें युरोपच्या राज्यकारस्थानाची किल्ली फ्रान्सचे माजी बादशहा तिसरे नेपालियन यांच्या हातीं होती व ते जसें ह्मणत तसें बहुत करून होत असे, त्या प्रमाणें आज युरोपच्या राजकारणाची किल्ली जर्मनीचे हल्लीचे मुख्य प्रधान प्रिन्स बिस्मार्क यांच्या हातीं आहे आणि बहुत करून जें होणें तें त्यांच्या लेखावरून होतें. या साधारण गोष्टी मनांत आणिल्या ह्मणजे बहुतक धोरण कळतें. यद्यपि टर्कीतील मुसलमान लोकांची राज्यसत्ता मनापासून नकोशी आहे आणि युरोपांतील कोणत्याही एखाद्या मोठ्या पराक्रमी राष्ट्रास तेवढ्या मुसलमान लोकांशीं च युद्ध प्रसंग येण्यासारखा प्रकार असता तर लढाई करून तो देश कदाचित जिंकून घेतां येता, तथापि निरनिराळ्या राष्ट्रांचें वेगवेगळालें हिताहित व डाव पाव आहेत याजमुळें तसें होण्यास मार्ग नाहीं. रशियाची तर फार दिवसांपासून तो देश हस्तगत करून घेण्याची इच्छा आहे आणि युरोपांतील सरकारें एशियांतील असंमन्जस बेफिकीर सरकारांप्रमाणें असतां तर मध्य एशियाप्रमाणें रशियानें कधींच तुर्कस्थान घेऊन पार केलें असतें. परंतु एकाचें हित दुसऱ्याच्या हितास बाधक होतें तेव्हां सर्व सरकारें आपापल्या हितास जागृत असल्यामुळें आपला डाव साधल्यावाचून ते कमी जास्त होऊं देत नाहींत. आतां आस्त्रिया व इंग्लंड यांत तूर्त तुर्कस्थानचें राज्य कायम असणें हितावह आहे. याजमुळें ते रशियाचें हित साधू देण्यास कबूल नाहींत. तसेंच जर्मनीस रशियाचें सामर्थ्य अधिक वाढू द्यावयाचें नाहीं. आज रशियाच्या व्यापारास वगैरे तुर्कस्थानची राज्यसत्ता प्रतिबंधक आहे ह्मणून होईल तितकें करून तें घ्यावयाचें आहे. परंतु इतर सरकारें यद्दलग्रामाच्या प्रसंगीं हात घालतील ह्मणून रशियाच्यानें एकदम दांडगाई करवत नाहीं. त्यानीं या हेतूनें जर्मनी व आस्त्रिया यांचें सख्य साधून घेऊन तुर्कस्थानांत कलह उत्पन्न केला. त्या कलहांत सरासरी उघडपणें हात घातला आणि शेवटीं तुर्कस्थानावर लढाई करण्याची सक्ती केली. परंतु योग्य कारणावाचून व इतर सरकारांच्या संमतीवाचून उघड लढाई करण्यास एकदम प्रवृत्त होववेना. तेव्हां सर्व बड्या सरकारांच्या वकिलांची सभा कान्स्टांटिनोपल एथें व्हावी असें ठरलें. इंग्लंडचा पहिला रोख तुर्कस्थानच्या पक्षाचा होता व इतर सरकारांचे विचारही कांहां निरनिराळे होते आणि रशियाचा उघड लढाई करण्याचा होता. त्याप्रमाणें रशियाचे बादशहा यांनीं आपल्या मस्कौ एथील भाषणांत कोणाची पर्वा नकरतां स्वतंत्र रीतीनें तुर्कस्थानच्या घोटाळ्यांत आपण हात घालूं असें बोलून देखील दाखविलें परंतु हल्लीं युरोपच्या राजकारस्थानाची किल्ली प्रिन्स बिस्मार्क यांच्या हातीं पडली याजमुळें त्यांचा रोख कळल्यावांचून कोणाची कांहीं कारणाविषयीं हिंमत होत नाहीं. याजमुळें इंग्लंडचे वकील लार्ड सालिसबरी कान्स्टांटिनोपल एथें जातांनां वाटेंत त्या बिस्मार्क साहेबांस भेटले. तेव्हां त्यांचा रोख तुर्कस्थान व रशिया या सरकारांमध्यें लढाईचा प्रसंग आल्यास दुसऱ्यांनीं आंत पडतां कामा नये असा दृष्टीस पडला याजमुळें इंग्लंडचें धोरण तुर्कस्थानाकडून वळून रशियाच्या शंकास वळलें. इकडे रशियाच्या बादशहाचा कल पाहून प्रिन्स बिस्मार्क यांनीं आपल्या देशच्या पार्लमेंट मध्यें भाषण केलें त्यांत रशियास आवरण्यासारखा चटका दिला. जर्मनीच्या लोकांना रशियाविरुद्ध कल आहे असें थोडें धोरण दाखवून नंतर तुर्कस्थानचा भाग घेण्याचें रशियानें नाव घेऊं नये आणि आस्त्रियाच्या हितास धोका त्यांजकडून बसू नये असें उद्गार बाहेर पडल्यामुळें रशियास चुकित आपला पाय हळू हळू मागें घ्यावा लागला. तुर्कस्थानच्या सरकारानें हें सर्व व साधारण धोरण पाहून वकील लोकांच्या सभेचें ह्मणणें अमान्य केलें. तेव्हां इंग्लंडांत गृहकलह रशियाचा मूळचा दांडगेपणा. त्याजवर प्रिन्स बिस्मार्क यांचें साधारण पण संदिग्ध धोरण याच्या योगानें सर्व जागच्या जागीं थिजलें. तुर्कस्थान सरकारानें सर्वांचे ह्मणणें अमान्य केलें, तथापि आंतील युरोपाच्या सरकारांच्या मतभेदामुळें व वेगवेगळ्या हित व डाव याजमुळें एकंदर मिळून लढाई करवत नाहीं. रशियाचीं वर्तमानपत्रें देखील ह्मणतात कीं तुर्कस्थान बाहेरच्या लोकांच्या प्रयत्नापेक्षां आंतील अव्यवस्थेनेंच लवकर लयास जाईल. याजवरून तूर्त तुर्कस्थानच्या संबंधानें युरोपांत लढाई होईल असें वाटत नाहीं.

हा मजकूर लिहिल्यानंतर ता. १९ फेब्रुवारीची लंडन एथील तार आली तिजवरून कळतें कीं रशिया सरकारानें तुर्कस्थानावर चाल करण्याचे उद्देशानें त्या देशाचे उत्तर सरहद्दीवर २ लक्ष फौज व ७२० तोफा पाठविल्या आहेत. आतां ही बातमी कितपत आधारभूत आहे हें कळत नाहीं. ने. ओ.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.खा. प्र.